# आनंदलहरी

## श्री दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने

भाग ४ था

# आनंदलहरी

श्री दत्तमहाराज कवीश्वर

यांची

प्रवचने

भाग - ४

मधुकर दळवी २०/२/०८

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस
गुरुप्रतिपदा (माघ वद्य १ शके १९२९)
शुक्रवार, दि. २२ फेब्रुवारी, २००८

मुखपृष्ठ
आमोद दामले

मुद्रक
रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

प्रकाशक
श्री दत्त आश्रम संस्थान
प.पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्‌गुरु नगर, प्रशांती नगर समोर,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२ २३६८०५

## ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

आचार्य श्री जगन्नाथ शास्त्रीजी पदे यांच्या पुण्यदिनानिमित्त हा उत्सव प्रतिवर्षाप्रमाणे चालू झालेला आहे. या प्रसंगी व्यवस्थापकांनी काही सेवा करण्याकरता आम्हालाही याच्यामध्ये सहभागी केलं. या बद्दल प्रथमत: त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करून विषयाचा परामर्श घ्यायचाय.

***आचिनोतिच शास्त्रार्थान् आचारे स्थापयत्यपि: ।***
***स्वयमाचरतेयस्तु स आचार्य इति स्मृत: ॥***

'आचार्य' शब्दाची व्याख्या शास्त्रकारांनी या प्रमाणे केली आहे. संपूर्ण शास्त्रार्थ संग्रह करणं, शास्त्रार्थाचं ज्ञान घेणं ही पहिली भूमिका आहे, आचार्यांची. आणि त्या ज्ञान प्रभावाने ***''आचार्य स्थापयत्यपि''*** व्यक्तीला मिळालेलं ज्ञान या ज्ञानाचा उपयोग सर्वही अज्ञानी जीवांना होणं योग्य आहे. त्या करता इतर जे लोक आहेत त्यांना त्यांचे त्यांचे आचार समजावून देऊन त्यांच्या त्यांच्या कर्तव्याच्या ठिकाणी स्थिर करणं, ही दुसरी आचार्य भूमिका आहे. आणि याच्यापेक्षा तिसरी महत्त्वाची म्हणजे ***''स्वयमपि आचरे''*** स्वत: त्या ज्ञानाप्रमाणे आचरण करणं. ***''ज्ञान कर्म समुच्चय''*** हा सिद्धान्त दृष्ट्या मान्य नाहीये आचार्यांना, परंतु ते ज्ञान निराळं आहे. कर्माचं ज्ञान तर आवश्यक पाहिजे प्रथमत:, त्या शिवाय कर्मानुष्ठान व्यवस्थित होऊ शकत नाही. जर तपानुष्ठान झालं तरच ***''वीर्यवत्तरे भवति''*** असं त्याच फल उपनिषदामध्ये सांगितलं आहे.

हा ज्ञानकर्मसमुच्चय आवश्यक आहे. कर्माचं व्यवस्थित ज्ञान

संपादन करून आणि त्या प्रमाणे कर्मानुष्ठान जर झालं तर त्याचं फल हे पदरामध्ये पडू शकत.

तर हे आचार्य म्हणून जे झालेले आहेत; आचार्य शब्दाचं महत्त्व सांगितलं आहे, शास्त्रकारांनी. त्या इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती आणि क्रियाशक्ती या तिघांचाही समन्वय या आचार्यांच्या मध्ये झालेला आहे. ज्ञानार्जन करताना तर इच्छाशक्ती पाहिजे, जिज्ञासा ज्याला म्हणतात. तीव्र जिज्ञासा असल्याशिवाय ज्ञानार्जन होऊ शकत नाही. सध्या जिज्ञासाच कमी कमी होत चालली आहे भारतामध्ये, ही फार खेदाची गोष्ट आहे. प्राचीन काली अनेक बुद्धीशक्तींचा विकास करून घेऊन जितकं ज्ञान आपल्याला मिळवता येईल तितकं ज्ञान मिळविणं, ज्ञानघन होणं या करता प्रयत्न होत असत. तर ती जिज्ञासाही त्याला तितकीच पाहिजे. 'संक्षेप शारीरक' वरती मधुसूदन सरस्वतींनी टीका केलेली आहे. त्या ठिकाणी एका श्लोकात उल्लेख करताना शबर स्वामींबद्दल त्यांनी सांगितलय

***'सहस्त्र शाखा: अर्थतोपि वेत्ति***
***शबरस्वामि इति ऐतिह्यम् ।'***

***सहस्त्रशाखा अर्थत: अपिवेत्ति*** म्हणजे शब्दाचं तर ज्ञान आहेच आहे परंतु अर्थाचही रहस्य ज्ञान शबरस्वामींना होतं असं म्हणतात. तर ही जी बुद्धीची शक्ती आहे,ही ज्ञानशक्ती वाढिवण्याकरता जिज्ञासा-इच्छाशक्ती जिला म्हणतात तीही पाहिजे.

आणि त्या नंतर त्या इच्छाशक्तीच्या प्रभावाने ज्ञान प्राप्त करून घेऊन आणि ज्ञानशक्तीनं सर्वही लोकांच अज्ञान दूर करायच, त्यांच्या बुद्धीचं परिवर्तन करायच, आणि त्यांच्या कर्तव्याच्या ठिकाणी त्यांना

स्थिर करायच, ही दुसरी अवस्था. आणि स्वत:ही त्या प्रमाणे आचरण करायच.

आदर्श म्हणून पाहिजे. या दृष्टीने 'आचार्य' शब्दाचा अर्थ आचार्य जगन्नाथ शास्त्रीजी पदे यांच्या ठिकाणी अत्यंत योग्य लागतो आहे. त्यांनी मिळवलेल ज्ञान, आणि ते ज्ञान मिळवण्याकरता त्यांना मिळालेली ईश्वरदत्त अशी बुद्धिशक्ती. बुद्धिशक्तीशिवाय ज्ञानार्जन तरी होणार कस? सांगणारे जरी असले तरीसुद्धा

***''विपरती गुरू प्राज्ञे विद्याम् यथैव तथा जडे।''***

म्हणून भवभूतींनी सांगितलेल आहे. ज्ञान देणारे समर्थ जरी असले तरी ग्रहण करणारी बुद्धी ज्याप्रमाणे असेल त्याप्रमाणे ज्ञानसंक्रमण होत. पण यांच्या जवळ निसर्गत:च ईश्वरदत्त बुद्धी आहे. इतरही त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे, सर्वही विषयांच मर्मज्ञान त्यांनी मिळवलं होतं., त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून घेत, आणि स्वत:ही त्याप्रमाणे आचरण करत. ह्या आचार्य शब्दात सांगितलेल्या तीन भूमिका त्यांच्या ठिकाणी असल्यामुळे संपूर्ण भारतामध्ये त्यांचं अशा प्रकारचं वैशिष्ट्य होतं. सर्व लोकांना ते कळून आलेल नाही म्हणा, तरी ही सर्व मंडळी त्यांच्या ह्या भूमिका जाणणारी आहेत. ह्या जाणिवेप्रमाणे त्यांच स्मरण प्रतिवर्षी आपल्याला राहाव म्हणून या उत्सवाची योजना त्यांनी केलेली आहे.

***'विद्याभ्यासनं व्यसनं***
***अथवा हरिपाद सेवनं व्यसनं ॥'***

असे जे सांगतात अभियुक्त ही दोन व्यसन आचार्य भूमिका जर प्राप्त करून घ्यायची असेल, केवल दुसऱ्याला सांगण्याकरता वाक्शक्ती किंवा ज्ञानशक्तीचा उपयोग नाहीये. ''सर्वां मुखी मंगल बोलवावे''


समर्थांनी जरी सांगितलेलं असलं तरी स्वत: त्याप्रमाणे आचरण केलं पाहिजे. त्याला विशेष महत्व आहे. मिळवलेली ज्ञानशक्ती ही तेजस्वी राहाण्याकरता म्हणूनही स्वत: त्याप्रमाणे आचरण केलं पाहिजे. त्यालाही प्रयोजन आहे. ज्ञान शब्दाची व्याख्या आचार्य महाराजांनी-

***'तद् ज्ञानं प्रशमकरं यद् इंद्रियाणां ।'***


अशी केलेली आहे. ही भूमिका प्राप्त करून घेण्याकरता आचार्य भूमिका प्रयोदय आहे. यात प्रयाच समर्थन केल पाहिजे. तरी ही भूमिका प्राप्त करून घेण्याकरता- 'विद्याभ्यसनं व्यसनं अथवा हरिपाद सेवनं व्यसनं' हे मुख्य त्यांनी सांगितलं आहे. यालाही व्यसन शब्द वापरला आहे त्यांनी. पण या 'व्यसन' शब्दाचा अर्थ थोडा निराळा आहे. लौकिक व्यवहारात 'व्यसन' शब्दाचा अर्थ वेगळा आहे.


***'अस्य ते विशेषेण अस्य ते क्षिप्यते अनेन'***

श्रेयत: क्षिप्यते असलं व्यसन हे व्यावहारिक व्यसन आहे. आणि विद्या व्यसन किंवा हरिपादसेवनं हे जे व्यसन आहे, ***''अश्रेयस: अस्य ते अनेन''*** अशा प्रकारच आहे. विद्या व्यसन किंवा हरिपादसेवनं हे व्यसन अश्रेयसापासून दूर करणारे. तेव्हां ही अशी दोन्हीही व्यसन पदेशास्त्रीजींना होती. हे सर्वांना माहीती आहे. पूर्ण भगवद्भक्ती त्यांच्या ठिकाणी होती. म्हणून भगवद्गीतेचा विशेष अभ्यास करून पुष्कळ वर्षे या ठिकाणी प्रवचने वगैरे केली, अस सर्व मंडळींनी सांगितलेल आहे. जिज्ञासू मंडळी, आत्ताच व्यवस्थापकांनी सांगितल्याप्रमाणे, मुख्य श्रोते म्हणून बसत होती. अशा जिज्ञासू मंडळींची जिज्ञासा व्यवस्थित रीतीने पूर्ण करून भगवद्गीतेचे मर्म समजावून सांगता येईल अशी ज्ञानशक्ती त्यांनी मिळवली होती. त्यामुळे त्यांच्या या स्मृतिदिनी यथामती काही









तरी वाङ्मय सेवा करायची. ते विभूतीरूप मानायला हरकत नाहीये. ही जी ज्ञान शक्ती त्यांनी ईश्वराकडून मिळवली आहे, त्याचा उपयोग इतरांच्या करताही त्यांनी शेवटपर्यंत केलेला आहे. आणखी अमानित्व कायम राखून केलेला आहे. त्याला विशेष महत्त्व आहे. हे विभूतीचेच लक्षण आहे. त्या करता तीन दिवस, हा जो विषय निवडलेला आहे - भगवद्गीता आणि भागवत याच्यामध्ये जो ईश्वर स्वरूपाचा विचार केलेला आहे - त्याबद्दल काही तरी थोडस चिंतन करायचं आहे.

मोठ मोठी ज्ञानी मंडळी जी होऊन गेली, तार्किक असो वा असो ईश्वराबद्दल निष्ठा सर्वांच्या चित्तामध्ये आहे. उदाहरणार्थ, वेदान्त शास्त्रामध्ये सर्वही ग्रंथकार प्राय: संन्याशी झालेले आहेत. काही थोडेसे गृहस्थाश्रमी असतील - वाचस्पति मिश्र म्हणा, अपय्या दीक्षित वगैरे - परंतु संन्यास घेऊन, सर्वसंग परित्याग करून अखंड वेदान्ताचे चिंतन करणारी अशी मंडळीच पुष्कळ आहेत. म्हणून ही सगळीही संन्यासी मंडळी व्यवहार सोडून देऊन केवळ ज्ञान मिळवणं, ज्ञान भूमिका - श्रवण, मनन, निदिध्यासन, साक्षात्कार अशा क्रमानं - प्राप्त करून घेण्यासाठी यांचे प्रयत्न सारखे चालले आहेत.

तर उदाहरणार्थ - अद्वैतसिद्धीचे टीकाकार ब्रह्मानंद सरस्वती म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी ''**ब्रह्मानंदी**'' ग्रंथ लिहून झाल्यावर शेवटच्या श्लोकात असे म्हटले आहे -

*य: पूर्णानंदमग्नोऽप्यनुगतमनसोबल्लवीतांविधेयो ।*
*यश्च श्रीश:सुदाम्न:पृथुकरुणगणास्वादनाभ्य......*
*यश्चेंद्रादेनियन्त विजयहपतनूमार्जतेसत्वधान: ।*
*तस्य श्री पादुकाया:भवतुकृतिर्गृयं मालिका मल्लिकाया:*

ब्रह्मानंदी या मोठ्या ग्रंथात कितीतरी महत्वाचे विचार त्यांनी मांडले आहेत. अद्वैतसिद्धी सारख्या ग्रंथावर टीका लिहायची म्हणजे तो काही सामान्य ग्रंथ नाही. परंतु इतकं ज्ञान ज्यांच आहे त्यांनी आपली ही सगळी कृती परमेश्वराच्या चरणी अर्पण केलेली आहे. म्हणजे ही जी काही ईश्वर भावना त्यांच्या अंत:करणामध्ये आहे त्या ईश्वरभावनेमुळे निर्माण झालेलं सर्व वाङ्मय त्यांनी ईश्वराला अर्पण केलं आहे. असे मोठे मोठे अनुभवी तर्कनिष्णात, शाब्दज्ञाननिपुण ग्रंथकार - ***''शाब्दे परेच निष्णातौ''*** अशी जी भूमिका आचार्य महाराजांची सांगितलेली आहे - त्या भूमिकेवर असणारी ही मंडळी; प्रतिपक्षाचे संपूर्ण खंडन करूनही ते आपलं वाङ्मय त्यांनी ईश्वराला अर्पण केलं आहे.

ही अशी पुष्कळ मंडळी आहेत, तार्किक मंडळी आहेत, वेदान्ती मंडळी आहेत. तर असे जे मोठ मोठे पंडित, ग्रंथकार होऊन गेले, सर्व दर्शनांचा समन्वय, अभ्यास त्यांनी केलेला आहे. अशा मंडळींची प्रथम पासूनच ईश्वर निष्ठा आहे. आणि शेवटी सुद्धा सर्व कृती त्यांनी ईश्वराला अर्पण केलेली आहे.

तर भगवद्गीतेमध्ये भगवंताचे स्वरूप कसं आहे? भागवतामध्ये काय स्वरूप आहे याचा आपल्याला या दोन तीन दिवसांमध्ये विचार करायचा आहे. भगवद्गीता ही भागवतच आहे - ***भगवंतात् प्रोक्तं भागवतम्*** - या दृष्टीनं. भगवद्गीता भगवंतांनीच सांगितली आहे त्यालाही भागवत म्हणता येईल. आणि भागवताला भगवद्गीता म्हणता येईल. भागवतहि भगवतात् प्रोक्तं. भगवंतांनीच तो उपदेश आरंभाला ब्रह्मदेवाला केला. त्यांच्यापासून नारदाला असे सांप्रदाय

त्यात दाखिवले आहेत.

या दृष्टीने निरनिराळी नांव जरी प्रसिद्ध असली तरीसुद्धा भगवद्गीता ही भागवत होऊ शकते. आणि भागवतही भगवद्गीता होईल. रूढीच्या दृष्टीनं भगवद्गीता निराळी, भागवत निराळं, असं आपण समजतो. परंतु प्रमेयाच्या दृष्टीनं विचार केला असता दोन्ही ठिकाणचं प्रमेय एक आहे.

भगवद्गीतेचं प्रमेय काय आहे? भगवद्गीतेमध्ये काय सांगितलं आहे? याचा आरंभाला बहिरंग विचार आपल्याला करायचा आहे. भगवद्गीतेमध्ये गीता सांगितल्या नंतर तो जो श्रोता आहे अर्जुन हा मोहमुक्त झालेला आहे, शेवटी. 'नष्टो मोह:' अशी त्याने कबुली दिलेली आहे.

आणि भागवत श्रवण करणारा जो परीक्षित राजा आहे तो विदेहमुक्त झाला आहे. मोहमुक्ती एकाच प्रयोजन आपल्याला दिसतं आणि विदेहमुक्ती हे दुसर प्रयोजन आपल्याला दिसतं. विदेहमुक्त होण म्हणजे अत्यंत कठीण काम आहे. देहसंबंध अजिबात सुटण हे अतिशय कठीण आहे. गौतम महर्षींनी सांगितल्याप्रमाणे देहसंबंध सुटण्याला म्हणजे कर्माचा संबंध सुटला पाहिजे. जीवाची जी कर्म आहेत त्याचा संबंध सुटल्या शिवाय देहसंबंध सुटू शकत नाही.

तर ही सगळी जी कर्म आहेत ती संपायची कशी? मानव जन्मामध्ये कर्म संबंध सुटण्याकरता काहीतरी साधन वगैरे करता येण्यासारखं आहे. शास्त्र मानवांच्या करता निर्माण झालेलं आहे. तो सगळा कर्मांचा संबंध सुटणं अतिशय कठीण आहे. तर हा कर्मसंबंध जो पर्यंत आहे तो पर्यंत देह संबंध अनिवार्य असल्यामुळे आणि

देहाच्या संबंधातून कायमचं मुक्त होणं हे जे फळ मिळालेल दिसतय त्या परीक्षित राजाला हेही काही विलक्षण आहे.

ही जी कर्मफलमुक्ती जीवाच्या प्रयत्नांनी होईल असं सांगता येत नाही. मोहनिवृत्ती जी अर्जुनाची झाली ती काही त्याच्या प्रयत्नांनी नव्हे. कारण जास्ती जास्ती मोहामध्ये मनुष्य सापडत जातो.

वनवासात गेल्यावर प्रत्यक्ष व्यास महर्षींनी धर्मराजाला सांगितलं, ''तुम्हाला पुढे युद्ध करण्याचा प्रसंग आहे, राज्य मिळवायचं आहे त्या करता अर्जुनाने काही उपासना करावी, देवांच्या पासून अस्त्रविद्या संपादन केली पाहिजे.'' अस व्यासमहर्षींनी पांडवांकडे जाऊन मुद्दाम सांगितलं. आणि धर्मराजाला उपदेश करुन त्याच्याद्वारे अर्जुनाला मंत्रदीक्षा द्यायला लावली आणि नंतर अर्जुन देवलोकाला अस्त्रविद्या शिकण्यासाठी गेलेला आहे. शंकरांची उपासना त्याने केली. शंकर प्रसन्न झाले. इंद्रादिक देव प्रसन्न झाले आणि त्यामुळे स्वर्ग-लोकात तो जाऊन राहिला अशी कथा आहे महाभारतामध्ये.

तिथ चार पांच वर्ष राहून सर्व देवांच्यापासून अस्त्रविद्या त्याने संपादन केली. देवांनाही सहाय्य केल. संगीत विद्याही तो तिथे शिकला असं वर्णन आहे.

कशा बद्दल वैराग्य पाहिजे आणि कशाबद्दल नको हाही मोठा एक विवेकाचा प्रश्न आहे. ***आम्हाला ज्ञानाबद्दलचं वैराग्य उत्पन्न झालेल आहे.*** संस्कृत भाषेमध्ये जे ज्ञान आहे त्या संस्कृत भाषेबद्दलच वैराग्य उत्पन्न झालेलं आहे. आणि ते सुद्धा स्वातंत्र्य मिळाल्या नंतर उत्पन्न झालेलं आहे. ही एक विशेष आश्चर्याची गोष्ट आहे.

तर ज्ञानाबद्दल वैराग्य उपयोगी नाही. ज्या ज्ञानाने आपल्या चित्ताला शांती मिळविता येती, इतरांनाही शांती मिळवून देता येती, ते ज्ञान जितकं जितकं आपल्याला मिळेल तेवढे कल्याणकारकच आहे. शाब्दज्ञान असूं दे. पण जर ते शाब्दज्ञान दृढ असेल तर त्या शाब्दज्ञानाचा आपल्याला पुष्कळ उपयोग करुन घेता येतो.

म्हणून अर्जुनाने तिथे ज्ञान मिळवल. देवांचीही त्याच्यावर कृपा झाली. आणि इतकं सगळं ज्ञान मिळवून तो परत आलेला आहे. ते ज्ञान, ती अस्त्रविद्या कशी होती हे त्याने अज्ञातवासाच्या शेवटी दाखवून दिलेलं आहे.

भीष्म, द्रोण अशी मोठमोठी मंडळी असलेलं कौरवांच सैन्य आलेलं असताना सुद्धा तसच अयोग्य सारथी त्याला मिळाला असताना देखील एकट्या अर्जुनाने सर्वांचा पराजय केला. सर्व कौरव सैन्याला परत जावं लागल. मिळवलेल्या ज्ञानाचे काय फल मिळत हे यावरून त्याने दाखिवलेल आहे. म्हणजे त्याच्या मनामध्ये पूर्ण आत्मविश्वास आहे आणि आपण शत्रूचा पराजय करू अशी खात्री आहे.

अशी सर्व अनुकूल स्थिती आहे. परंतु ज्या वेळेस पुन्हा प्रत्यक्ष युद्धाला आरंभ होण्याचा प्रसंग आलेला आहे. अशा वेळी एकदा नुसत त्या लोकांकडे पाहिल्यावर त्याच्या मनामध्ये मोह उत्पन्न झाला. अविनय ज्याला म्हणतात. मोहवैचित्य आहे. चित्तवृत्ती एकदम आणखी मोहग्रस्त झाली आहे. हे सगळे माझेच आप्तेष्ट लोक आहेत, या लोकांना मीच मारायच, वगैरे निरनिराळे विचार त्याच्या मनामध्ये, विवेक नाहीसा झाल्यामुळे उत्पन्न झाले. आणि आपल्या बुद्धीने त्याने

निर्णय घेतला-हे युद्ध करुन उपयोग नाही. श्रीकृष्णांसमोर त्याने आपले हे मत, विचार मांडलेले आहेत. एक तर ह्या सर्व स्त्रियांच्या ठिकाणी दोष उत्पन्न होईल. स्त्रियांच संरक्षण करणारं जर कोणी राहिलं नाही तर स्त्रिया नष्ट होतील.

**'स्त्रीसु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकर:'**

हे सगळं त्याने आणखी मत प्रतिपादन केलं. त्या करता मीच युद्ध करायचं बंद केलं म्हणजे हे युद्ध थांबेल. कोणाचाही नाश होणार नाही अशी समजूत त्याने करून घेतली. स्वत:चेच विचार. त्याच्या मनावर झालेल्या परिणामांमुळे आपले हे विचार बरोबर आहेत, आपलाच बुद्धिवाद बरोबर आहे, अहिंसा परमो धर्म: हेच बरोबर आहे असं भगवान् श्रीकृष्णांना त्याने सांगितले.

इतकी स्थिती झाल्यावर झालं. ***''विसृज्य सशरं चापं''*** धनुष्य बाण खाली ठेवून स्वस्थ बसून राहिला. ***''रथोपस्थ उपाविशत्''*** अशी स्थिती झाली. इतका मोह उत्पन्न झाला. इतक्या सगळ्या लोकांचा नाश आपल्याकडून होईल या विचाराने शोक उत्पन्न झाला. ह्या दोन दोषांमुळे-मोह आणि शोक- अर्जुनाची कर्तव्यबुद्धी दूर झाली आहे. भिक्षा मागून राहाणं चांगलं आहे पण हे युद्ध बरे नाही. क्षत्रियांचं कर्तव्य हे युद्ध करणं असताना सुद्धा आणि ज्याने आत्तापर्यंत ते युद्ध करायच असं ठरवून देवलोकामध्ये जाऊन सर्व अस्त्रविद्या मिळवली ती त्याची बुद्धी एकदम गेलेली आहे. सामर्थ्य असताना तो सांगतो आहे युद्ध करायच नाही. त्या करता त्याला भगवंतांनी उपदेश केलेला आहे. भगवंतांनासुद्धा वस्तुत: उपदेश करण्याचं काही कारण नव्हत. परंतु अर्जुनाची जर तशी आग्रही वृत्ती असती, अहंकार जर त्याचा

पराकोटीला गेला असता तर भगवंतांनी सांगितली असती की नाही गीता कोणास ठाऊक. परंतु शेवटी त्याने जरी आपल्या बुद्धी प्रमाणे ठरवून आपल मी युद्ध करणार नाही हे मत मांडल तरी अखेरीस त्याच्या मनाला वाटायला लागलेल आहे -

***कार्पण्य दोषोपहतस्वभाव:***
***पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेता: ।***
***यच्छ्रेय: स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे***
***शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥२.७॥***

शेवटी आणखी शिष्यभाव धारण करून तो भगवंतांना शरण गेलेला आहे. मला हे समजत नाही, म्हणाला. अगोदर सगळं अहंकाराने प्रतिपादन केलेलं आहे - हे सगळं सदोष आहे, शास्त्र प्रमाणानं जरी आणखी सांगितल असलं तरी युद्ध करणं बरोबर नाही. शास्त्रप्रमाण सुद्धा त्याला बरोबर वाटेना. स्वत:ची बुद्धी श्रेष्ठ आहे आणि आपल्या बुद्धीने त्याने निर्णय घेतलेला आहे. तरी आपल्या बुद्धीने जरी त्याने निर्णय घेतला असला तरी शेवटी त्याने कबूल केलय, मला काही समजत नाहीये. स्वत:च अज्ञान त्याने त्या वेळेला कबूल केलं. खरा सेव्यभाव त्याने जेव्हां प्रगट केला त्या वेळेला गीतेच्या उपदेशाला सुरवात झालेली आहे. नाही तर असे किती अर्जुन आले आणि गेले. हा एक अर्जुन गेला म्हणून काय युद्ध थांबल असत असं थोडच आहे ! भगवंताची इच्छा होतीच. ते सर्व गीतेच्या पुढल्या अध्यायात सर्व दाखवलेलं आहे.

तर अर्जुनाला निर्माण झालेला हा जो मोह आहे आणि त्यामुळे उत्पन्न झालेला शोक. त्यामुळे चातुर्य भ्रष्ट झालेला अर्जुन त्याची

मोह निवृत्ती करायची आहे. आणि त्या मोहातून तो शेवटी मुक्त झाला. ही जी मोहमुक्ती ही काही जीवाकडून शक्य नाही. सर्वांच्या करता गीताज्ञान सांगितल असं आचार्य महाराज सांगताहेत. अर्जुन नुसता निमित्त आहे. सर्वही जीव शोकमोह ग्रस्त होतात त्यावेळी ते स्वधर्मत्याग आणि परधर्म स्वीकार करायला प्रवृत्त होताहेत. त्यांना आणखी योग्य मार्ग दाखविण्या करता त्यांचा मोह दूर करण्याकरता, अशा सर्वांच्या करता गीता सांगितली आहे. अर्जुन एक निमित्त झालेला आहे.

बाह्य दृष्टीनं जरी आपण विचार केला तरी अर्जुन हा मोहातून दूर होऊ शकतो. गीताज्ञानाचं प्रयोजन जे आहे-जो मोहामध्ये सांपडलेला अर्जुन आणि हेच माझं बरोबर आहे असं म्हणणारा परंतु तो शेवटी कबूल झालेला आहे की मला मोह झाला होता आणि तो मोह आता माझा दूर झालेला आहे, कर्तव्यबुद्धी मला उत्पन्न झालेली आहे. ***''करिष्ये वचनं तव'' १८.४३*** हे आणखी त्याने शेवटी सांगितलेलं आहे.

म्हणजे अर्जुना सारख्याची बुद्धी बदलेली होती. त्या बुद्धीची सुधारणा करण्याकरता त्याला उपदेश करणारी जी व्यक्ती आहे ती व्यक्ती जीवकोटीतली असली पाहिजे की दुसऱ्या कोणच्या कोटीतली असली पाहिजे हाही विचार करण्यासारखा होता. की एवढा मोठा अर्जुन एकदा त्याच्या बुद्धीने झालेला निर्णय दुसऱ्या कोणाचं तो ऐकणार होता, दुसरा त्याला सांगणारा तरी कोण होता, आणि तो तरी मी शरण आलेलो आहे, तुमचा शिष्य आहे असं दुसऱ्या कोणाला कशाला म्हणायला जाईल? ते शक्य तरी आहे का? म्हणून या

दृष्टीने आणखी ईश्वरानेच हा उपदेश केलेला आहे आणि त्या उपदेशाप्रमाणे त्याच्या बुद्धीचं आणखी परिवर्तन होऊन गेलेलं आहे. ईश्वराने आपल्या शक्तीचा उपयोग केला असं म्हणायला हरकत नाही.

तर या बहिरंग दृष्टीनंसुद्धा मोह निवृत्ती करण्याचं कार्य इतर कोणी करू शकणार नाही. हा एक विषय आहे.

महाभारतामध्ये सुद्धा परीक्षित राजासारखा अत्यंत सुकृतसंपन्न महात्मा आहे; जन्माला येताना ज्याच्या वरती अश्वत्थाम्याने ब्रह्मास्त्राचा प्रयोग केलेला आहे. मनामध्ये उत्पन्न झालेले रागद्वेषादिक विकार-या विकारांमुळे मिळविलेल ज्ञानसुद्धा कसं प्रतिबद्ध होत, त्याच हे उदाहरण आहे.

साक्षात् द्रोणाचार्यांचा पुत्र अश्वत्थामा. उत्तम वेदशास्त्रांचं ज्ञान त्याला मिळालं असतानासुद्धा त्याची बुद्धी इतकी द्वेषमय बनून गेलीये की पांडवांचा वंशसुद्धा ठेवायचा नाही. वास्तविक द्रौपदीने त्याला जीवदान दिलेलं आहे. पांडवांची सगळी मुलं द्वेषाने त्याने शेवटच्या दिवशी मारली. दुसऱ्या दिवशी ते समजल्यावर द्रौपदीला किती शोक झाला असेल ! परंतु शेवटी सर्व पांडवांनी आणि श्रीकृष्णांनी तिलाच विचारल-ह्याला शिक्षा काय करायची? त्या वेळेला द्रौपदीनं सांगितलं, याला तुम्ही मारु नका, सोडून द्या.

त्याची कारणे सांगतानाही तिने सांगितलय-की सर्वही अस्त्रविद्या धनुर्वेद ज्यांच्यापासून आपण मिळविलत ते साक्षात द्रोणाचार्यच याच्या रुपानं तुमच्या पुढे उभे आहेत. याचा नाश करण म्हणजे द्रोणाचार्यांचा नाश केल्यासारख होईल. हे तुमचं कर्तव्य नाही.

शोक आवरुन तिन हे सांगितल. पुत्रशोक ज्याच्यामुळे उत्पन्न

झाला तो शोक बाजूला ठेवून कर्तव्यबुद्धी जी आहे-दैवी संपत्ती ज्याला म्हणतात-ती दैवी संपत्ती द्रौपदीच्या ठिकाणी आहे. तिने सांगितल्यामुळे सर्व पांडवांनी अश्वत्थाम्याला सोडून दिलं.

परंतु जीवदान मिळाल्यानंतर सुद्धा त्याची बुद्धी काही बदलली नाही. कारण काय तर- ***''प्रकृति यान्ति भूतानि''*** म्हणून भगवान सांगताहेत. जी प्रकृती घेऊन जन्माला आलाय जीव त्या प्रकृतीप्रमाणेच कार्य होणार. कोणी कितीही उपकार करो त्याचा काहीही परिणाम बुद्धीवर होत नाही. त्या द्रौपदीनं जीवदान दिलं तरी त्याचा द्वेष कायम राहिला. आणि पांडववंशातला एक जीव शिल्लक राहिला तोही नाहीसा करण्याकरता ब्रह्मास्त्राचा प्रयोग त्याने गर्भावर केलेला आहे.

वस्तुत: पूर्ण ब्रह्मास्त्राच संपूर्ण ज्ञान त्याला नव्हतं. प्रत्यक्ष अस्त्र प्रयोग करणं वेगळं. प्रयोग करणं आणि उपसंहार करणं या दोन्हींच ज्ञान पाहिजे असं जे सांगितलय कालीदासांनी, ते दोन्हींच ज्ञान अश्वत्थाम्याला नव्हत. तरीसुद्धा त्याने त्याचा प्रयोग केला द्वेष बुद्धीने.

पण भगवंतांनी त्या गर्भाला त्या अस्त्रापासून मुक्त केलं. ईश्वराला कोणचही कर्म नाही, कर्मविपाक नाही. अशा ईश्वरानेसुद्धा, कर्म नसताना गर्भामध्ये प्रवेश केला, गर्भवास स्वत: पत्करला हे कशा करता तर त्या परीक्षित राजाला जिवंत ठेवण्याकरता. पांडवांच संरक्षण करायचय. ***''न मे भक्त: प्रणश्यति''*** या प्रतिज्ञेप्रमाणे पांडवांचा वंश सुरक्षित ठेवण्या करता स्वत:ला गर्भवास नसतानाही गर्भवास पत्करला.

म्हणजे परीक्षित राजा किती पुण्यवान आहे त्याच हे निदर्शक

आहे. ईश्वर गर्भापासून त्याच्या बरोबर राहिला, गर्भापासून ईश्वराचा साक्षात्कार त्याला झाला. हे त्याच एक सुकृत आहे. शेवटी त्याला आणखी ज्या वेळेला शाप त्या वेळी प्रायोपवेशन करुन, सगळं राज्य मुलांच्या ताब्यात देऊन, गंगातीरावर जाऊन बसला. सातव्या दिवशी आपला नाश होणार.

अशा परिस्थितीमध्ये प्रत्यक्ष शुकाचार्यांसारखा ब्रह्मज्ञानी महात्मा त्याला मुक्त करण्याकरता आपण होऊन त्याच्याकडे आला. म्हणजे हेही त्याच केवढ पुण्य आहे ! मृत्युच्या वेळेला ब्रह्मज्ञानी सद्‌गुरू आपण होऊन त्याच्याकडे येतात. जन्माच्या वेळेला त्याच संरक्षण करण्याकरता प्रत्यक्ष परमेश्वर गर्भात शिरून त्याचे प्रतिबंध दूर करतात. इतका तो परीक्षित राजा सुकृतसंपन्न आहे. त्या परीक्षित राजाची बुद्धी बदलल्यामुळे त्याला शाप झाला. प्रसिद्ध आहे ती कथा. त्या परीक्षित राजाला शुकाचार्य महाराजांनी सर्व भागवत सांगितलं आणि त्या भागवताच्या श्रवणाने परीक्षित राजाला विदेही मुक्ती मिळाली आहे.

विदेही मुक्ती होण्याकरता सर्व कर्मक्षय सुद्धा त्याचा झाला. सर्व ज्ञान मिळाल. परोक्ष ज्ञान तर त्याला होतच होत. भगवद् भजन, पुण्यकर्म तो करीतच होता. आणि ती भक्ती त्याच्या चित्तामध्ये इतकी होती की कृष्णचरित्र श्रवण करण्याच्या वेळेस त्याने सांगितले मला संपूर्ण कृष्णचरित्र आपण सांगा, तहान नाही, भूक नाही.

*नैषाति दु:सा: क्षुन्माम् त्यक्तोतम अपि बाधते ।*
*पिवन्तम् तन्मुखामभोजच्युतम हरिकथामृतम् ।।*

तर ही ज्याची भूमिका आहे. अशा प्रकारचा परीक्षित राजा.

भगवद्‌भक्ती, भगवद् प्रेमामुळे भगवत् चरित्र श्रवण करण्याच्या वेळेला त्याच देहाकडेही लक्ष नव्हत. म्हणजे क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक ज्याला म्हणतात ती मोठी भूमिका त्याला मिळालेली आहे. ईश्वराची कृपा आहे. सद्‌गुरू शुकदेवांची कृपा आहे. त्या कृपेमुळे क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक ज्ञान पूर्ण झाल्यामुळे सांगू लागलेला आहे. आरंभाला मृगयेहून परत आला असता तहान लागली. पाणी मागतोय. शेवटी ऋषींच्या बद्दल त्याला राग आला. त्यांच्या गळ्यात साप घातला वगैरे कथा आहे. आणि म्हणून त्या ऋषी कुमाराने शाप दिला.

म्हणजे क्षुधातृषा याच्यामध्ये सांपडलेला तो होता. आनंदमय, प्राणमय, मनोमय कोशांपैकी अन्नमय कोशामध्येही होता. तृषा ज्याअर्थी तो सहन करू शकत नाही त्याअर्थी त्या प्राणमय कोशाशी त्याचे तादाम्य टिकूनच राहिले आहे. आणि अन्नमय कोशाशी तर तादाम्य आहेच आहे. अशा स्थितीत असतानासुद्धा एकदम त्याच सुकृत म्हणा, सद्‌गुरू शुकदेवांची कृपा म्हणा त्यामुळे त्या कोशातून तो बाजूला झाला. मला तहान नाही, मला भूक नाही, मला संपूर्ण कृष्णचरित्र सांगा असं म्हणतो आहे. दोन चार दिवसात एवढी भूमिका तयार झाली कशी?

तर ही स्थिती जी आहे. शुकदेव साक्षात् भगवत् स्वरूप आहेत. भगवंताचीच ती कृपा आहे. सामान्य जीवभाव ज्यांचा नाहीसा झालेला आहे अशा प्रकारचे हे महात्मे आहेत. स्थितप्रज्ञाची लक्षण भगवंतांनी सांगितली आहेत दुसऱ्या अध्यायात भगवत् गीतेच्या. त्या लक्षणांच प्रतिपादन करीत असताना आचार्य महाराजांनी सांगितलय, ही स्थितप्रज्ञांची लक्षण म्हणजे स्थितप्रज्ञांची साधन

नाहीयेत, स्वाभाविक आहेत. ज्ञान प्राप्त झाल्यानंतर निसर्गत:च

*प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान्*

*आत्मन्येवात्मना तुष्ट: स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ २.५५ ॥*

सर्व काम निवृत्ती ! कोणचीच वृत्ती नाही.

*दु:खेषु अनुद्विग्नमन:*

*सुखेषु विगतस्पृह:*

ही जी सर्व लक्षण आहेत, ही ज्ञानी महात्म्याची नैसर्गिकच लक्षण आहेत. ईश्वराचं जसं स्वरूप आहे त्याप्रमाणे ज्ञानी मनुष्य असतो.

सुरेश्वराचार्यांनी जे वर्णन केल आहे एका ठिकाणी

*'अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्र: करूण एव च ।'*

ही जी भगवद् भक्ताची लक्षण सांगितली आहेत बाराव्या अध्यायात. याचा अभ्यास करायला किती दिवस लागतील? योग शास्त्रामध्ये अहिंसा, अपरिग्रह, अस्तेय हे जे यम नियम सांगितले आहेत - त्या एकेकाचा अभ्यास करून ते सिद्ध व्हायला किती काल लागेल काही सांगता येईल आपल्याला? हा काय महाविद्यालयातला पांच सहा वर्षांचा कोर्स आहे का ! की झाली अहिंसा सिद्धी, झाली अपरिग्रह सिद्धी. *''अहिंसाप्रतिष्ठायां तत्संनिधौ वैर त्याग:''* वगैरे जी फल दिलेली आहेत म्हणजे ते ते सिद्ध झाल्याच एक गमक आहे. तर इतकी सिद्धी होण्याला किती काळ गेला पाहिजे. मनोभूमिकेप्रमाणे दोष दूर होत गेले पाहिजेत. त्याच्या करता काय काय सहाय्य कोणाचं घ्याव लागेल. प्रयत्न किती करावा लागेल !

तर हे सगळेही जे गुण आहेत; स्थितप्रज्ञाची लक्षणं, भगवद् भक्ताची लक्षणं, गुणातीताची लक्षणं, ही सर्वही लक्षणं आचार्य

महाराजांनी सांगितली. ही साधकांची साधने आहेत आणि ती मिळवण्याकरता साधकांनी प्रयत्न केला पाहिजे. आणि ईश्वरस्वरूप झालेले सिद्ध महात्मे जे आहेत, त्यांची स्वयंसिद्धी नैसर्गिक अशी आहे.

***उत्पन्नात्मा वनोधस्य ह्यद्वेष्ट्रत्व दयो गुणा:***
***अयत्नतो भवन्तस्य नतु साधनरूपिण: ।***

सुरेश्वराचार्य सांगताहेत. ...........हे गुण म्हणतात ते अयत्नत: म्हणजे निसर्गत:च त्यांच्या ठिकाणी आहेत. त्यासाठी त्यांना प्रयत्न करावा लागत नाही. म्हणजे अज्ञानी साधक जे आहेत त्या अज्ञानी साधकांकरता ही सर्व साधन म्हणून आहेत. आणि ज्ञानी जो महात्मा आहे तो ईश्वररूप झालेला आहे. ब्रह्मरूप झाल्यामुळे तो स्वयंसिद्ध आहे. ज्ञानाचं हे फल आहे. ज्ञानाचाच हा विकास आहे. हे सगळे गुण म्हणजे साक्षात्काराचा विकास म्हणून झालेले आहेत.

शुकाचार्य महाराज म्हणजे असे ब्रह्मज्ञानी महात्मे आहेत. आरंभापासून ते निर्गुण निर्विकार अशा परमात्म चिंतनामध्ये निमग्न होते.. परन्तु व्यास महर्षींनी त्यांना आणखी सगुण साकार समाधीमध्ये, सगुण भक्तीमध्ये आणलेलं आहे. तिकडेही ते आणखी रंगून गेलेले आहेत. तर साक्षात् ईश्वरस्वरूप झालेले शुकाचार्य आहेत, त्यांनी आणखी परीक्षित राजाला उपदेश केल्यामुळे तो विदेहमुक्त स्थितीला प्राप्त झालेला आहे.

चार दिवसापूर्वी आणखी तहान लागून अन्नमय, प्राणमय कोशाच्या पलीकडे तो जाऊ शकत नाहीये, राग लोभ निर्माण होतोय, पाणी न दिल्याने ऋषींच्या बद्दल मत्सर निर्माण होतोय, माझा तहानेने

व्याकूळ होऊन प्राण जावा म्हणून मुद्दाम हे समाधी लावून बसलेत असं ज्याला वाटत; तोच परीक्षित राजा चार दिवसानंतर एकदम असा कसा झाला? एकदम त्याची बुद्धी अशी शुद्ध झाली कशी? मग हे ईश्वर कृपेचे निदर्शक वाटत. शुकाचार्यांच्या उपदेशाने आणखी तो सुद्धा विदेहमुक्त होऊन गेला. अर्जुनसुद्धा मोहात सांपडल्यामुळे धर्मत्याग करायला प्रवृत्त झाला.

आचार्य महाराज सांगतात ही मोहाची स्थिती त्याला मिळालेली आहे.

*गुरूनहत्व हि महानुभावान्*
*श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ॥ २.५ ॥*

असं म्हणायला लागला. तर या बहिरंग दृष्टीनं जरी विचार केला तरी हा उपदेश ज्याला मिळाला त्यापैकी एक मोहमुक्त झाला, एक विदेहमुक्त झाला. तर हे जे फल त्यांना मिळाल ते देणारा असामान्य कोणी तरी असला पाहिजे, असं एक आपल्याला मानावं लागत. साधारण मनुष्य कोणी असला तरी तो अशा प्रकारच काही करू शकत नाही. दीपच दुसरा दीप निर्माण करू शकतो ना ! जो स्वत: पंचकोशात, देहत्रयामध्ये सांपडलाय तो दुसऱ्याची मोहमुक्ती, देहमुक्ती कशी करू शकणार? विदेह मुक्ती सारख मोठ फल त्याला कसं देऊ शकणार? म्हणून या केवळ बहिरंग दृष्टीनं जरी आपण विचार केला तरीसुद्धा ईश्वराचं स्वरूप याच्या मध्ये व्यक्त होतय, अस म्हणायला हरकत नाही.

आता भगवद् गीतेमध्ये ईश्वराच्या स्वरूपाबद्दल, हे बहिरंग दृष्टीनं पाहिलं आपण, श्री भगवानुवाच म्हणून प्रत्येक वेळेला व्यास

महर्षींनी मुद्दाम उल्लेख केलेला आहे. काही काही पदार्थांची सिद्धी करण्याकरता प्रत्यक्ष प्रमाणे जी आहेत. त्या प्रमाणे आणखी शब्द प्रमाण हे तर आहेच आहे. ईश्वर स्वरूपाबद्दल उपनिषद म्हणा, पुराण म्हणा ही तर आहेच आहेत. परंतु व्यवहारामध्ये जे शब्द आहेत त्या शब्दांवरूनसुद्धा काही काही पदार्थांची सिद्धी करता येते.

न्यायशास्त्रामध्ये काल तत्व किंवा दिक् तत्व सांगताना त्यांनी लक्षण जी सांगितली आहेत - अती तादि व्यवहार हे कार: व्यवहार शब्द प्रयोग: अतीत: अनागत: हा जो शब्द प्रयोग रूढ आहे लोकांमध्ये, हा शब्द प्रयोग ज्याच्यामुळे रूढ झालेला आहे असे एक काल तत्व मानायच आहे. अशीच त्यांनी व्याख्या केली. कार्यकारण भावावरूनच व्याख्या केली जाते शब्दाची. कोणचही लक्षण कार्यकारण भावावरून करतात. तसाच कार्यकारण भाव मांडताना त्यांनी हा जो लोकांमध्ये रूढ असलेला शब्दप्रयोग ज्याच्यामुळे होतो तो काल.

दिक् व्यवहार म्हणून दिक् तत्वाची त्यांनी व्याख्या केली. 'प्राच्य: अतिच्य:' हा जो व्यवहार केला जातो, शब्दप्रयोग, त्या शब्दप्रयोगावरूनच त्यांनी अशा प्रकारचे दिक् तत्व आहे हीच व्याख्या शिकवली आहे.

म्हणजे भगवानुवाच हा जो शब्द प्रयोग आहे आणि भगवद् शब्दाची व्याख्या शास्त्रकारांनी केलेली आहे ***''ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशस: श्रिय: । ज्ञान वैराग्ययोश्चैव शष्णाम् भगद्वतीगणा:''*** हे जे सहा गुण आहेत, सर्व ऐश्वर्य आहे, संपूर्ण नियामक शक्ती आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण ज्ञान. संपूर्ण धर्म, संपूर्ण वैराग्य, यश हे ज्याच्या

ठिकाणी आहे, यत्किंचितही न्यूनता जिथे नाही, त्याला भगवान म्हणावं. हा जो भगवान शब्द शास्त्रामध्ये रूढ आहे चालू आहे, शास्त्रीय व्यवहारामध्ये का असेना. तो जो रूढ झालेला आहे. त्या वरूनही केवळ भगवानुवाच या शब्दावरूनसुद्धा अशा प्रकारचं ईश्वर स्वरूप काहीतरी असलं पाहिजे हे मान्य केलं जातं, न्यायशास्त्रात त्यांनी व्याख्या केल्या आहेत त्या प्रमाणे.

आणखी आता अर्जुनासारखा योद्धा मोहग्रस्त झालेला आहे. त्याला उपदेश करण्याकरता गीताशास्त्राची प्रवृत्ती सुरू झाली. सांगता सांगता चौथ्या अध्यायाच्या आरंभी भगवान् सांगताहेत -

***इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।***
***विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥***

हा जो योग आहे तुला सांगितलेला - कर्मनिष्ठा, ज्ञाननिष्ठारूपी योग - हा योग मी पूर्वी सूर्य नारायणाला सांगितला. म्हणजे संप्रदाय आहे हा. नवीन काही सांगितलेल नाही. असाच संप्रदाय चालत आलेला आहे पूर्वीपासून. संरक्षण करणारा मी आहे.

आता अर्जुनाच्या मनांत शंका उत्पन्न झाली. गीता काय एकाने सांगितली की दोघांनी सांगितली की तिघांनी सांगितली असे विचार मनामध्ये येतात. त्याच कारण हे आहे की इथ हे सांगतात - ''***प्रोक्तवानहमव्ययम्***'' हा अहम् पदार्थ कोण आहे? बोलणारे जे आहेत ते श्रीकृष्ण समोर दिसताहेत. त्या श्रीकृष्णांच दर्शन अर्जुनालाही झालं, त्याच्याही मनामध्ये ही शंका आली. श्रीकृष्णांच्या बद्दल अर्जुनाच्या मनांत भक्ती पूर्ण आहे. परमेश्वर आहे ही भावना नाही अस नाही. परंतु आज मात्र यांनी सांगितलं की मी

सूर्यनारायणाला उपदेश केलाय. हा ''अहम्'' कोण? पण समोर दिसणारे श्रीकृष्ण म्हणजे ''अपरं भवतो जन्म'' देहबुद्धीने तो विचारतो आहे, आक्षेप घेतो आहे. ''तुमचा जन्म तर अलीकडचा आहे. आणि सूर्यनारायणाचा जन्म तर किती तरी प्राचीन आहे. आणि या देहाने तुम्ही सूर्य नारायणाला उपदेश केलात?'' म्हणजे या देहालाच तो ''तुम्ही'' समजतो आहे. ''अहम्'' पदार्थ म्हणजे देह आहे. त्या देहबुद्धीनेच तो आणखी विचारतो आहे. तर क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक ज्याला म्हणतात, देह बुद्धी. विवेकाचे अनेक पुष्कळ प्रकार आहेत. नित्यानित्य विवेक आहे, क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक आहे, हेयोपादेय विवेक आहे. अनेक प्रकारचे विवेक आहेत.

तर या अर्जुनाला क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक नाहीये. त्यामुळे तो म्हणतो आहे, ''तुमचा जन्म अलीकडचा, तुम्ही (वयाने) लहान आहात आणि तो सूर्य नारायण किती तरी मोठा आहे. हा जो लहान मोठेपणा आपण म्हणतो आहोत तो शरीराच्या दृष्टीनं आहे. जास्ती काल देह संबंध ज्या शरीराला झालेला आहे तो मोठा समजतो. आणि कमी काल संबंध ज्या देहाला आलेला आहे तो लहान समजतो. कोणीही मोठा मनुष्य त्याच्यापेक्षा वयान लहान असणाऱ्या माणसाला म्हणतो, तुझ्यापेक्षा चार पावसाळे जास्त पाहिले आहेत. मी काय सांगतो ते ऐकून घे.

त्याचा अर्थ असाच आहे. हे जे परत्व अपरत्व उत्पन्न झालेलं आहे हे शरीराच्या दृष्टीनं आहे. ज्येष्ठ कनिष्ठ भाव हा शरीर दृष्टीनं उत्पन्न झालेला आहे. आणि शरीर दृष्टीनं ज्येष्ठ कनिष्ठ भाव समजून व्यवहार करतो याचाच अर्थ त्याला क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक झालेला नाही.

क्षेत्रज्ञाला बाजूला ठेवून केवळ क्षेत्रप्रधान दृष्टीनं त्याचा विचार चालू आहे. चांगदेवांसारख्यांना अशा प्रकारची स्थिती उत्पन्न झाली. नामदेवांना म्हणा, चांगदेवांना म्हणा. त्यांना सुद्धा क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक संपादन करण्यासाठी प्रयास पडलेले आहेत. त्यांच अज्ञान आड आलेल आहे. विवेक नाहीये. क्षेत्रप्रधान दृष्टी कायम राहिल्याने ज्ञानेश्वर महाराज आपल्यापेक्षा लहान आहेत त्यांना नमस्कार कसा लिहायचा आणि त्यांना मोठं म्हणायचं तर मी त्यांच्यापेक्षा (वयानं) मोठा आहे. ज्ञानेश्वर तर लहान. लहानाला नमस्कार सुद्धा करता येत नाही. वर ज्यांना शरण जायचय, ज्यांच्यापासून ज्ञान घ्यायचय त्यांना आशीर्वाद तरी कसा लिहायचा? ज्ञान त्यांच्याकडे आहे मान्य आहे पण त्यांचे वय लहान आहे.

तेव्हां ज्ञान मिळवण्याची इच्छा असून सुद्धा वयानं लहान म्हणून त्यांना नमस्कार कसा लिहायचा? केवळ शरीर दृष्टीनं ते लहान आहेत आणि शरीर दृष्टीनं मी मोठा आहे. ही बुद्धी धारण करून त्यांनी कोराच कागद पाठवून दिला ती कथा प्रसिद्ध आहे. मग निवृत्तीनाथांच्या आदेशा प्रमाणे ज्ञानेश्वर महाराजांनी लिहून टाकल. त्यांची दृष्टी अशी नाहीये. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक पूर्ण ज्यांना झालेला आहे अशा प्रकारचे ज्ञानी महात्मे त्यांचा व्यवहार होण्याला काहीही प्रतिबंध आड येत नाहीत. अहंकारादि दोष नसतातच त्यांच्यात. त्यामुळे ज्ञानेश्वर महाराजांनी लिहून पाठवल - वटेश्वर चांगदेवांचं स्वस्ति असो. इथ लहान मोठा हा भेद सगळा बाजूलाच काढलेला आहे. वटेश्वर चांगदेव मोठे असले तरी त्यांच स्वस्ति चिंतन करणं लहानांना वावग नाहीये. लहान जरी समजत असले तरी मोठ्यांनी लहानाचं स्वस्ति चिंतन

करणं चांगलच आहे.

तेव्हां व्यावहारिक दृष्टीनं सुद्धा त्यांनी स्वस्तिचा उल्लेख केलेला आहे. आणि दृष्टी त्यांची देह दृष्टी नाहीये. ***''जो लपोनि जगदा भासू दावि मज ग्रासू प्रगटीला करी''*** असं ज्ञानेश्वर महाराज लिहितात. म्हणजे वटेश्वर चांगदेवांच्याकडे आत्मस्वरूपाच्या दृष्टीनं ते पहाताहेत. आत्मस्वरूप जर आच्छादित आहे अस लक्षात घेतलं तर जगदाभास निर्माण होतो. आणि जर आत्मस्वरूप प्रगट झाल तर ***''दावि मज ग्रासु प्रगटीला करी''*** जगदाभासाचा ग्रास होऊन जातो. म्हणजे ज्ञानी माणसाची दृष्टी ही अशी आहे. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक पूर्ण आहे. हे जे नित्यसिद्ध आहे त्यामुळे त्यांना कोणच्याही प्रकारचा संदेह निर्माण होत नाही.

अर्जुन म्हणतो आहे, ''तुम्ही सूर्यनारायणाला उपदेश केला, तुम्ही माझ्या बरोबरीचे आहात, लहान आहात. लहान आहे तुमच वय आणि तुम्ही सूर्यनारायणाला उपदेश कसा केलात?'' म्हणजे फक्त देह दृष्टीनच तो पहातो आहे.

परंतु भगवान सांगताहेत ***''प्रोक्तावानहमव्ययम्''. ''अहम्''*** पदार्थ भावाने श्रीकृष्ण हा देह समजायचा का, ईश्वरभाव वेगळा समजायचा? ईश्वरभावाने गीता ज्ञानाचा उपदेश केला आहे, अशी प्रसिद्धी आहे. प्रत्यक्ष भगवानांनी त्याच्याकरता ईश्वरभाव धारण करून तो उपदेश केलेला आहे.

तर हा ''अहम्'' पदार्थ अर्जुन समजू शकलेला नाही. त्यामुळे श्रीकृष्णांना स्पष्टपणे सांगाव लागलं -

*बहुनि मे व्यतीतानि जन्मानि तव अर्जुन ।*
*तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ ४.५ ॥*

तुझेही पुष्कळ जन्म झाले, माझेही पुष्कळ जन्म झाले, तसेच इतरांचे सर्वही जन्म मला माहीत आहेत. हे स्पष्ट कराव लागलं भगवंतांना. म्हणजे अर्जुनाची भूमिका ही अद्यापि ''क्षेत्रक्षेत्रज्ञविवेकशून्य'' आहे. त्यामुळे तर तो मोह उत्पन्न झाला ना ! त्याला मारणार म्हणजे शरीरालाच मारणार ना तो. म्हणजे भीष्म द्रोण शरीररूपी आहेत त्यांची हत्या होणार माझ्याकडून. म्हणून त्याला वाईट वाटल. नरकात जावे लागेल वगैरे वाटल त्याला. परंतु भगवंतांची - उपदेश करणाऱ्याची भूमिका मात्र पूर्ण विवेकसंपन्न आहे. आणि पूर्ण ज्ञान आहे.

तर या ठिकाणी या दृष्टीनं भगवंतांच सांगणं झालेलं आहे. ते क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेकयुक्त आहे. आणि तशा रूपाने मी सूर्याला उपदेश केलेला आहे, असं भगवान सांगताहेत. अर्जुनाला ते स्पष्ट करून सांगायची पाळी आलेली आहे.

दुसरी नदीची गोष्ट आलेली आहे आरंभाला. भागवताची रचना व्यासांनी कशा करता केली ते सांगण्याकरता त्यांनी ती कथा सांगितली आहे. व्यास महर्षींनी वेद विभाग केलेले आहेत. बुद्धीशक्ती कालमानाप्रमाणे कमी कमी झाल्यामुळे वेदसंप्रदाय तर राहिलाच पाहिजे पण एक संपूर्ण वेद होता त्याचा अभ्यास सगळ्यांकडून होईल असे नाही. म्हणून वेदांचे चार विभाग करून शिष्यांना उपदेश वगैरे केला. त्यांच्या त्यांच्या बुद्धीशक्ती प्रमाणे त्यांनी त्या त्या विभागाचा अभ्यास केला, तरच हा संप्रदाय राहील म्हणून ही व्यवस्था

वेदव्यासांनी केली. म्हणजे संपूर्ण वेदाचे विभाग त्यांनी करून दिले. हे मोठ कार्य आहे. केवढी ज्ञानशक्ती आहे.

त्याच्या नंतर सगळ्या एकंदर वेदार्थाचं प्रतिपादन करण्याकरता, स्पष्टीकरण करण्याकरता इतिहास पुराणादि ग्रंथ लिहिले आहेत. वेदांचा अभ्यास करण्याकरता इतिहास पुराणांच्या अभ्यासाचीही जरूरी आहे. वेदाभ्यास पूर्ण होण्याकरता म्हणून त्या इतिहास पुराणरूपी अंगांचा अभ्यासही आवश्यक आहे. इतिहास पुराणाच्या अभ्यासाची परंपरा पुरातन काळी होती. काशीला सांगत असत काही प्रवचनकार की आमच्याकडे पुराणांचाही अभ्यास करणारे विद्यार्थी असायचे. निरनिराळ्या शास्त्रांबरोबर पुराणांचाही अभ्यास करणारे विद्यार्थी आणि त्याचप्रमाणे त्या पुराणांचे रहस्य समजावून सांगणाऱ्या योग्य अध्यापकांची परंपरा आमच्या इकडे होती. ती आता परंपरा संपलेली आहे. केवळ आपलं विकल्पित मनाने पुराणांचा अभ्यास करणं आणि त्याप्रमाणे आपल्या बुद्धीने त्याचा निर्णय घेणं वगैरे असा प्रघात सध्या सुरू झालेला आहे.

त्यामुळे पुराणांबद्दल निर्माण होणारे जे संशय आहेत ते दूर होण अत्यंत कठीण आहे. धर्मशास्त्राचा अभ्यास करतानासुद्धा जी पद्धती आहे - धर्मसिंधु वगैरे ग्रंथांचा अभ्यास गुरूंजवळ राहून गुरूमुखातून ते ज्ञान श्रवण करून केला तर उपयोग होऊ शकतो. स्वतःच्या बुद्धीने आणखी समजायला वेळ लागतो. समजून येणार नाही अस नाही. पुष्कळ अभ्यास करायला पाहिजे. परंतु गुरूंच्या जवळ राहून केल्यामुळे लगेच त्याच स्पष्टीकरण होऊ शकत. तर अशी ही परंपरा प्राचीनकाळी होती. पुराणांची निरनिराळी रहस्य

सांगणारे ग्रंथ त्यांनी केले आहेत. वेदार्थ निर्णय करण्याकरता हे त्यांनी लिहिलं आहे. हा उद्देश त्यांनी सांगितला आहे. तर वेदव्यासांनी अभ्यास समजून वेदाचे चारी विभाग केले आहेत. अभ्यास करण्याची परंपरा राहावी हा त्याचा उद्देश आहे.

एका ठिकाणी सर्व ज्ञान राहील की नाही ते मात्र सांगता येत नाही. त्याच्यानंतर वेदांचा अभ्यास सुकर व्हावा म्हणून पुराणांची रचना केली. महाभारतासारखा ग्रंथही त्यांनी आरंभी करून ठेवलेला आहे. तरी सुद्धा त्यांच्या मनाला शांती मिळाली नाही असा त्यांनी उल्लेख केला आहे. आता इथ 'शांती' पदार्थ काय आहे? हाच मोठा प्रश्न आहे.

***'तूष्णिम् अवस्था परमोपशांति:'***

हे आचार्य महाराज सांगताहेत. चित्ताची तूष्णिम् अवस्था, मनोनाश म्हणून जो एक प्रकार आहे, अभ्यास करण्याचा. ज्ञाना नंतरसुद्धा तत्वज्ञान 'मनोनाश: वासनाक्षय एव च' हा अभ्यास विदेही मुक्ती प्राप्त होई पर्यंत. जीवन्मुक्त ही अवस्था जर प्राप्त करून घ्यायची असेल तर या तिन्हींचा अभ्यास झाला पाहिजे.

चतुर्थ भूमिकेवरती ज्ञानप्राप्ती होते तरी ते ज्ञान दृढ होण्याकरता म्हणून पुढेही तो अभ्यास चालू ठेवला पाहिजे. वासनांमुळे निरनिराळ्या मनाच्या वृत्ती निर्माण होतात. आणि जीवनमुक्ती सुख काही प्राप्त होत नाही. पुन्हा जन्म नाही हे सगळ खरं आहे. परंतु जीवन असे पर्यंत ***'दु:खेषु अनुद्विग्नमन: सुखेषु विगत: स्पृह:'*** ही भूमिका दृढ होण्याकरता मनोनाश, तत्वज्ञानाचा अभ्यास पुढेही अखंड चालू ठेवावा लागतो. त्या करता योगाभ्यासही पाहिजे.

तर या दृष्टीनं यांना शांती मिळाली नाही म्हणजे मनोनाश झालेला नाही असं म्हणायला हरकत नाही. मनामध्ये आणखी हे विचार उत्पन्न झाले. अशांती उत्पन्न झाली अशा वेळेला नारद महर्षी तिथ आले. नारदांनी विचारलं, 'तुम्ही दु:खी दिसताहात. तुमच्यासारख्यांना आणखी कसल दु:ख आहे?' शाब्दज्ञान जर मिळालेल असेल तर ही स्थिती संभवते कारण शाब्दज्ञानामध्ये शांतीचा संबंध नाहीये. शब्दाने आणखी ज्ञान मिळाल्यानंतर कदाचित पूर्व सुकृतवशात् श्रद्धाधान हे होऊ शकेल. शब्दांनी का होईना उत्तम ज्ञान झालेलं असेल तर श्रद्धा ही दृढ होऊ शकेल. हे एक त्याच प्रयोजन मानायला हरकत नाही.

धर्मराजांनी इतके कष्ट पडले, इतकं दु:ख झालं तरी धर्मनिष्ठा त्यांची कायम राहिलेली आहे. त्यांना काही अपरोक्षज्ञान झालेलं नाहीये परंतु परोक्षज्ञान असताना सुद्धा त्यांची श्रद्धा इतकी दृढ आहे की शेवटपर्यंत आपल्या धर्मापासून ते बाजूला झालेले नाहीत. द्रौपदीने वारंवार त्यांना म्हणावं, 'तुमच्या धर्माचरणाचा काय उपयोग झाला? अधर्माने वागणाऱ्या दुर्योधनाने सगळं साम्राज्य मिळवलेल आहे. मग तुमच्या धर्माचरणाचा काय उपयोग?'

हाच सवाल आहे. सध्या आपण असेच आक्षेप ऐकतो. धर्माचा काय उपयोग? धर्माने काय सुख मिळालय? व्यक्तीला काय किंवा समुदायाला काय. म्हणून तर धर्मातीत राज्याचा विचार चाललेला आहे. तर अशा स्थितीत द्रौपदीने वारंवार असा आक्षेप घ्यावा. पण धर्मराजांची निष्ठा अशी आहे - ''धर्माच काही फल मिळाव म्हणून मी धर्माच पालन करीत नाही. हे धर्माच वाणिज्य केल्यासारखं

होईल'', म्हणाले.

खरे जे धर्मवादी पुरूष आहेत, धर्मज्ञ, धर्मशील महात्मे आहेत त्यांच्या दृष्टीनं फलाच्या आशेने धर्माचरण करायचं नाहीये. ही जी दृढ भूमिका धर्मराजाला उत्पन्न झालेली आहे, धर्मशील जो बनलेला आहे, ही धर्मशील वृत्ती जी त्याला मिळाली त्याचं कारण म्हणजे त्याने मिळवलेले ज्ञान आहे. अनेक ऋषी मंडळी भेटायची. आणि त्या ऋषी मंडळींच्या जवळ जिज्ञासू बुद्धीने आणखी चर्चा करायची आहे. ज्ञानप्राप्ती करता चर्चेचाही उपयोग सांगितला आहे भगवंतांनी. चर्चेनेसुद्धा ज्ञान उत्पन्न होऊ शकत.

तर हा ज्ञानसंग्रह ह्यांनी पुष्कळ केलेला आहे. आणि त्या ज्ञानाचा उपयोग म्हणजे त्याची धर्मश्रद्धा बळकट झालेली आहे. नास्तिक बुद्धी त्याला उत्पन्न झालेली नाही. बुद्धीभेद होण्याचा प्रयत्न होत होता. भीमही बोलायचा, द्रौपदीही बोलायची. तरी सुद्धा त्याची धर्मनिष्ठा जी कायम राहिलेली आहे, त्याला कारण म्हणजे योग्य प्रकाराने त्याने मिळवलेलं परोक्ष ज्ञान. आणखी त्याप्रमाणे विचार केलेला असेल तर त्याची श्रद्धाही उत्पन्न होते.

तर इथ नारदांनी व्यासमहर्षींना विचारल ''तुम्ही परोक्ष ज्ञान मिळवलं असताना सुद्धा तुमच्या मनाला शांती मिळाली नाही हे कसं काय?'' हा प्रश्न त्यांनी केला. त्या वेळी व्यासांनी सांगितल, ''आहे, स्थिती आहे तशी. का झालं नाही मला काही सांगता येत नाही. पण शांती मला मिळाली नाही.'' अद्यापि मनोनाश वगैरे झालेला नाही. योगाभ्यास त्यांचा झालेला होता. समाधी अवस्था केव्हांही त्यांना प्राप्त करून घेता आली असती. परंतु व्युत्थानदशेमध्ये

अशी ही अशांती आहे. समाधी अवस्थेमध्ये कशाचाच काही संबंध नाहीये. चित्तवृत्तीचा निरोध केला असल्याने त्यावेळी दुसर काहीच नाही. शांती आहेच आहे.

परंतु शांती अशांती हा जो विचार आहे तो समाधी व्युत्थान दशेमध्ये आहे. 'दु:खेषु अनुद्विग्नमना: सुखेषु विगत स्पृह:' ह्या विचार बलाने तो राहू शकतो, विवेकबलाने. किंवा समाधीचा लाभ जर त्याला करता आला, तशी जर त्याची तयारी असेल तर त्यातही तो राहू शकतो.

तर अशा परिस्थितीमध्ये व्यास महर्षी नारदांना म्हणताहेत, ''मला मिळालेली नाही शांती. काय उपाय आहे? न्यून काय आहे?'' त्यावेळी नारदांनी सांगितल - ''तुम्ही धर्मार्थ काम मोक्षांचा पुष्कळ विचार केला आहे. महाभारतासारखा दिव्य ग्रंथ केला आहे. सर्वही विषय त्याच्यामध्ये घातले आहेत. परंतु वासुदेवाचा महिमा तुम्ही वर्णन केलेला नाही.'' हे नारदांनी त्यांना मार्गदर्शन केलं. आणि तशी स्थिती झालेली होती. भागवत अद्यापि तयार झालेलं नाहीये. बाकीची सगळी पुराण, महाभारतासारखे ग्रंथ, वेद विभाग वगैरे सगळे तयार झाले आहेत.

इतक वाङ्मय तयार करून ठेवलेलं आहे, त्यांच्या मनाला शांती का मिळाली नाही याच कारण नारद महर्षी सांगताहेत - ''वासुदेवाचा महिमा तुमच्या हातून वर्णन केला गेलेला नाही.'' ''समाधी अवस्थेत जाऊन वासुदेवाच्या संपूर्ण चरित्राच चिंतन तुम्ही करा आणि नंतर ते चरित्र लिहा म्हणजे तुमच्या मनाला शांती मिळेल.'' असा उपदेश त्यांनी केला आणि वासुदेवाच्या चिंतनाने

मला शांती कशी मिळाली, सिद्धावस्था कशी प्राप्त झाली हे सांगण्याकरता स्वत:चेही चरित्र त्यांनी त्या वेळेला सांगितलेल आहे.

नारद म्हणाले, ''पूर्व जन्मामध्ये एका खेडेगांवामध्ये एका दासीचा पुत्र होतो. पांच वर्षांच वय माझं होत. आणखी काही सज्जन मंडळी चातुर्मास्याकरता आमच्या गांवाबाहेर उतरली होती. मी रोज त्यांच्याकडे जात होतो. हे सगळ चरित्र, आत्मानात्म विचार वगैरे मला त्यांच्या तोंडून ऐकायला मिळाले.'' अधिकार होताच त्यांना. तसा नाही अस नाही. ''त्यामुळे मला आणखी पूर्ण समाधान झालं. चातुर्मास्य संपल्यानंतर ती मंडळी निघून गेली. मला जरी त्यांच्या बरोबर जाण्याची इच्छा असली तरी माझी आई असल्यामुळे मला काही जाता आले नाही. आईला सोडून जाता येईना. मग काही दिवसांनी सर्पदंश होऊन माझ्या मातेला मृत्यु आला. मग म्हणाले मी इकडे आलो. निघालो. सर्पदंश झाला त्यावेळचे त्यांचे उद्‌गार आहेत -

***तदा तदहमीशस्य भक्तानां शमभीप्सत: ।***
***अनुग्रहं मन्यमान: प्रातिष्ठं दिशमुत्तराम् ॥ १.६.१० ॥***

ईश्वराचा मला अनुग्रह झाला अस मी समजलो. हे माझं जे कर्तव्य होतं मातृसेवा करण्याचं, त्या कर्तव्यातून ईश्वरानं मला वाचवलं. असं त्यांनी सांगितलं. कर्तव्यत्याग करून नारद जाऊ शकले नाहीत. राहिले. त्या संत मंडळींच्या बरोबर राहाण्याची इच्छा होती, त्यांच्यात राहिले. नंतर मात्र ते गेले. तर ईश्वरानेच मला त्यातून मुक्त केलं असं ते म्हणताहेत. म्हणजे आई मरावी अशी नारदांची इच्छा होती असा अर्थ नाहीये.

धर्माचरण करणं, कर्तव्य कर्म करणं, वैराग्य यालासुद्धा काही मर्यादा आहेत. ते असलं वैराग्य नारदांच्या जवळ नाहीये. कर्मत्याग अधिकार नसताना येणारं वैराग्य शास्त्रकारांना मान्य नाहीये.

आणि नंतर निघालो, म्हणाले, उत्तर दिशेला जाता जाता अरण्यामध्ये एका ठिकाणी मी राहीलो. आणखी आसनस्थ बसलो असताना ईश्वर दर्शन मला झालं, म्हणाले. ध्यानामध्ये ईश्वर स्वरूपाचं दर्शन मला झालं. आनंद झाला मला. तशाच अवस्थेमध्ये मी एकदा उठलो आणि ते स्वरूप अदृष्य झालं. पण परत आपल्याला त्याचं दर्शन व्हावं म्हणून मी पुन्हा प्रयत्न करायला लागलो. पण त्यावेळेला मला काही दर्शन झाल नाही. त्यावेळी आकाशवाणी झाली आणि सांगितलं -

***'हन्तास्मिञ्जन्मनि भवान्मा मां द्रष्टुमिहार्हति ।'***

आता या जन्मात तुला पुन्हा माझं दर्शन होणार नाही.

***'अविपक्वकषायाणां दुर्दर्शोऽहं कुयोगिनाम् ॥'***

ईश्वरस्वरूप प्रत्यक्ष नाही आहे म्हणून ईश्वर स्वरूप नाही अस म्हणतो. हा तर्क काही बरोबर नाही. जे दिसत नाही ते नाही. जे दिसण्याच्या योग्यतेच असतं ते तरी कुठ दिसत आपल्याला? प्रत्यक्ष प्रमाणांच्या इंद्रियांची शक्तीसुद्धा पुष्कळ मर्यादित आहे. इंद्रियांच्या समोर जो विषय असेल त्याच्याशी संबंध आल्यावाचून त्याच दर्शन होत नाही.

त्यांनी जे सांगितलय सांख्यकारिकेमध्ये, पदार्थ नाही म्हणून दर्शन होत नाही, असं जे एकदम आपण मत प्रगट करतो ते चुकीचं आहे. पदार्थ प्रत्यक्ष अस्तित्वात असतानासुद्धा इतके प्रतिबंध असतील तर आपल्याला त्या पदार्थाचे ज्ञान होऊ शकत नाही.

सीतेच्या शोधासाठी चांगली चांगली मंडळी दक्षिण दिशेला पाठवली. ''बुद्धिमतां वरिष्ठम्'' त्याच्या मध्ये एक होते. त्यांच्यावर विशेष विश्वास होता रामरायांचा. त्यांच्या जवळ आपली मुद्रिका दिली. आणि ''सीतेचं दर्शन झालं तर तिला ही मुद्रिका दाखवा म्हणजे तिचा तुमच्यावर विश्वास बसेल. नाहीतर पुन्हा रावणच तुमच्या रूपाने आला आहे असं वाटलं तर बोलणारसुद्धा नाही तुमच्या बरोबर.'' असं त्यांना सांगितल. अशा रीतीने चांगली चांगली मंडळी दक्षिण दिशेकडे पाठवली आहेत. ती त्या दक्षिण समुद्राच्या किनाऱ्यावर येऊन बसली आहेत. समोर अथांग सागर पसरलेला आहे. आता कुठ जायच कुठ? चारी दिशांना वानर पाठवले होते. वानर राजाची ताकीद आहे. एक महिन्याच्या आत तुम्ही परत यायला पाहिजे. शोध लागला किंवा न लागला. काय असेल ते परत येऊन सांगा. नाही तर तुमचा शिरच्छेद केला जाईल. महीना तर संपून गेलाय. आता आपण प्रायोपवेशन करून देहत्याग करावा म्हणून ही मंडळी इथ बसली आहेत.

एवढ्यात तो, जटायूचा बंधू, संपाती तिथे आला. त्याने चौकशी केली, कशासाठी आलात? ते म्हणाले, सीतेच्या शोधासाठी आम्ही आलोय. तो म्हणाला, समोर सीता दिसतेय मला. रावणाची राजधानी आहे त्यातल्या उद्यानात अशोक वनात एका झाडाखाली ती बसलीये. तिच्या सभोवती सगळ्या राक्षसींचा पहारा आहे. तुम्हा कोणाला जायच असेल तर जा, म्हणाला.

आता त्याला काय म्हणायच? नाही म्हणायच? तो पाहून सांगतो आहे. आमचं बहुमत आहे. आम्हाला कोणाला दिसत नाही

तुला एकट्याला कशावरून दिसली? बहुमताने इथे निर्णय कसा करणार? तो म्हणतोय, मला दिसतेय म्हणून तुम्हाला मी सांगतोय.

म्हणजे प्रत्यक्ष दर्शी जो महात्मा आहे त्याचा जो शब्द आहे. दूरचा पदार्थ आपल्याला दिसत नाहीये. पण ह्याला ती दिसतेय. ह्या बाकीच्यांना लंका राजधानीसुद्धा दिसत नव्हती मग सीता कुठली दिसायला. पण त्या संपातीला ईश्वराने दूरदृष्टी दिलेली आहे त्यामुळे तो पाहून सांगतो आहे. पण त्याच्या शब्दावर विश्वास ठेवल्यामुळे ह्यांच कार्य होऊ शकले ना ! नाहीतर हे कुठे पाहू शकत होते.

तर केवळ प्रत्यक्ष प्रमाणाने आणखी ईश्वरसिद्धी होत नाही. ईश्वर दिसत नाही म्हणून प्रत्यक्ष नाही, असं जे आपण समजतो ते चुकीच आहे. असलेला पदार्थसुद्धा दूरत्व सामीप्य वगैरे दोषांमुळे दिसू शकत नाही, हा अनुभव आहे असं शास्त्रकार सांगतात.

त्याप्रमाणे आणखी नारदाला सांगितले, तुला पुन्हा दर्शन नाही. ज्यांच्या मनामध्ये असलेल्या वासना दूर झालेल्या नाहीत आणि ज्यांच अंत:करण निर्दोष झालेलं नाही त्यांना मी दिसणार नाही एवढच सांगितल. तर नारद म्हणाले, ईश्वराचे नामस्मरण करीत मी जन्म घालिवला. नंतर मग ब्रह्मदेवांचा पुत्र होऊन मी आलो. म्हणजे भगवंतांची कृपा झाल्यानंतर माझा उद्धार झालेला आहे. आणि ज्या ज्या वेळी मी ध्यानाला बसतो त्या त्या वेळी -

***'आहूत इव मे शीघ्रं दर्शनं याति चेतसि ॥'***

हा त्यांनी आपला अनुभव सांगितला.

त्या करता सर्वही लोकांच्या पुढं ईश्वराचा महिमा तुम्ही वर्णन करा, असं व्यासांना सांगून नारद गेले आणि नंतर व्यासमहर्षींनी

समाधी अवस्थे मध्ये राहून संपूर्ण भगवच्चरित्राच चिंतन केलेल आहे. ईश्वराच्या मायाशक्तीचं चिंतन केलेल आहे. आणि त्या नंतर भागवत् तयार झालं अशी त्या भागवत् चरित्राची हकिकत व्यासांनी लिहिली आहे.

म्हणजे व्यास महर्षींसारख्यांच्यासुद्धा मनामध्ये कोलाहल सुरू झालेला होता. पण नारदांसारख्यांनी येऊन त्यांना हे मार्गदर्शन केलेल आहे. तेव्हां ईश्वराचं चरित्र जे आहे त्याच चिंतन करण्याची शक्ती व्यास महर्षींजवळ होती. ती त्यांनी वापरली. समाधी अवस्था त्यांनी प्राप्त करून घेतली होती.

वाल्मिकी महर्षींनी रामायण लिहिलेल आहे - म्हणजे मारूती राय त्या लंकेमध्ये गेले, अंत:पुरामध्ये जाऊन सगळ्या स्त्रिया पाहू लागले, त्यांच्या मनामध्ये काय विचार आले हा जो सगळा मनोवृत्तींचा परिणाम वाल्मिकी महर्षींनी लिहिलेला आहे, हे काय केवळ कार्य आहे काय ! बरोबर त्यांच्या मनामध्ये असलेले विचार वर्णन केलेले आहेत. ज्यांना अशा प्रकारची स्थिती प्राप्त झालेली आहे, ज्ञान शक्ती ज्यांनी मिळवलेली आहे, निर्दोष अंत:करण झाल्यामुळे सगळं ज्ञान ज्यांना झालेलं आहे, त्यामुळे संयमाने अशा तऱ्हेच सर्व ज्ञान त्यांना होऊ शकत. त्या माहात्म्यांनी ही चरित्र लिहिलेली आहेत. त्यामुळे ही सर्व काल्पनिक काव्य रचना आहे असं कसं म्हणता येईल?

काही लोक म्हणतात ***''दु:खेषु अनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृहा:''*** हे सगळ काल्पनिक पुरूषाचे वर्णन आहे. काल्पनिक पुरूषाचे वर्णन करायला गीता म्हणजे काय काव्य आहे की कादंबरी आहे? प्रत्यक्ष भगवंतांनी वर्णन केलेली भूमिका आहे ती काल्पनिक

कशी होणार?

तर व्यास महर्षी हे समाधी अवस्थेपर्यंत जाऊ शकत होते. पूर्ण योगसिद्धी त्यांना होती. आणि त्या समाधी अवस्थेमध्ये जाऊ शकत असतानासुद्धा त्यांची अवस्था कशी आहे. ईश्वराची संपूर्ण लीला वर्णन करून ईश्वराचं स्वरूप समोर मांडायच आहे. हे जे त्यांनी भागवताचे वर्णन केलं आहे हरीची लीला फक्त आहे. सृष्टी, स्थिती, प्रलय वगैरे सगळं भागवतामध्ये आलेलं आहे. तर ही सगळी हरीलीला वर्णन करायची आहे. आणि ही आनंद स्वरूप हरीची लीला वर्णन करण्याकरता भागवत आहे.

तेव्हां ईश्वराचं स्वरूप जे आहे ते कोणच स्वरूप आहे? आरंभापासून कोणच स्वरूप लागत आणि मुख्य ईश्वराचं स्वरूप कसं आहे वगैरे सगळं समजावून सांगण्याकरता भागवताची रचना व्यास महर्षींनी केली आहे. आणि नंतर त्यांना शांती मिळाली असं उदाहरण त्यांनी मुद्दाम दिलं आहे, की भगवान् ईश्वराचं स्वरूप कसं आहे त्याचं चिंतन करणं, त्याच्याबद्दल भक्ती अंत:करणामध्ये उत्पन्न होण, त्याची वृद्धी होणं या योगानेही शांती प्राप्त होते हे सुद्धा आरंभाला आपल चरित्र व्यास महर्षींनी भागवता मध्ये मुद्दाम सांगितल आहे. यावरूनही भागवता मध्ये आरंभापासूनच ईश्वरस्वरूपा संबंधी दिग्दर्शन आहे. पहिला श्लोकच मुळी ईश्वर स्वरूप व्यक्त करणारा आहे.

आता बराच वेळ झालेला आहे. उद्यापासून आणखी भागवतामध्ये ईश्वरस्वरूपा संबंधी, ईश्वरशक्ती संबंधी काय काय उल्लेख आहेत, ते आणखी तर्कसिद्ध आहेत की नाहीत, प्रमाणसिद्ध

होऊ शकतील की नाही त्याचाही विचार तसेच भगवद् गीतेमध्ये काय आहे ह्या दोन्ही दृष्टींनं, उद्या आणि परवा, यथामती चिंतन आपल्याला करायचं आहे.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त ॥**

अहमदाबाद.

***या श्रीः स्वयं सुकृतिनां भवनेष्वलक्ष्मीः ।***
***पापात्मनां कृतधियां हृदयेषु बुद्धिः ।***
***श्रद्धा सतां कुलजनः प्रभवस्य लज्जा ।***
***तां त्वां नताः स्म परिपालय देवि विश्वम् ॥***

श्रीमत् भागवतामध्ये ईश्वरस्वरूपाचं प्रतिपादन सर्वत्र आलेलं आहे. परीक्षित राजासारखा विवेक वैराग्य संपन्न श्रोता मिळाल्यामुळे शुकाचार्य महाराजांना त्याला संपूर्ण भागवत सांगायची इच्छा झाली. त्यांनी आपला नियम सोडला. गायीची धार काढण्याला जेवढा वेळ लागेल इतकाच वेळ थांबायच, कुठही थांबायच झालं त्री.

***स गो दोहनमात्रंहि, गृहेषु गृहमेदिनाम् ।***
***अविक्षते महाभागः तीर्थी कुर्वंसदाश्रमम् ॥***

'संगः सर्वात्मनात्याज्यः' या प्रमाणे वागणारे शुकाचार्य महाराज भागवताचा अभ्यास केल्यानंतर त्या भागवताच श्रवण करणारा कोणी मिळतो का ते पहात पहात जात असताना परीक्षित राजाची भेट झाली. आणि त्यानेही आपली इच्छा प्रगट केली. सर्वही अवतारांची चरित्र सांगितली, मोठे मोठे राजऋषी, विभूतीरूप असणारे, प्रत्येक मन्वंतरात उत्पन्न झालेले, त्यांचीही चरित्र सांगितली.

सदाचार कसा असतो हे दाखवण्याकरता सगळे राजर्षी विभूतीरूप अशा प्रकारचे आहेत, भगवताज्ञा पालन करणारे. त्यांचीही चरित्र सांगून झाल्यानंतर शेवटी कृष्णचरित्र सांगितल. त्याची फार मोठी इच्छा होती, भगवान् श्रीकृष्णांच संपूर्ण चरित्र मला सांगा अशी

त्याने प्रार्थना केली. श्रीकृष्णांनी पांडवांच्यावर तर उपकार केलेलेच आहेत. पांडवांना विजय मिळावा, धर्मराज राजा व्हायला पाहिजे असा श्रीकृष्णांचा अभिप्राय आहे.

दुर्योधनाला राज्य का मिळू दिलं किंवा त्याला राजा का होऊ दिलं या प्रश्नाचं उत्तर त्यांनी दिलेलं आहे. विदुरांची आणि उद्धवांची भेट झाली त्या वेळेला विदुरांनीच या प्रश्नाचं उत्तर दिलेलं आहे. द्रौपदीची विटंबना होताना द्रौपदीच संरक्षण केल भगवंतांनी. परंतु हे घडल कसं? का झाल? त्या वेळेलाच त्यांना शासन का झाल नाही? तर विदुरजींनी आपले त्याबद्दलचे विचार मांडले आहे. एकाच वेळेला सगळेही दुर्वर्तनी प्रवृत्तीचे लोक आहेत किंवा दुर्वर्तनी प्रवृत्तीच्या लोकांना सहाय्य करणारे जितके लोक आहेत, त्या सर्वांचा एकदम नाश करावा, अशी भगवंतांना इच्छा उत्पन्न झाली. म्हणून त्यांनी त्या वेळेला उपेक्षा केली, म्हणाले.

दुर्योधनाच्या पक्षाला पुष्कळ राजे लोक मिळाले. कोणच्या पक्षाला कोणी जावं आणि काय जावं याचा काही नियम नाही. पण पक्ष मात्र सोडता येत नव्हता त्या वेळेला. किंवा सोडत नव्हते लोक. एकदा एक पक्ष घेतल्या नंतर, युद्धाच्या आरंभालाच त्यावेळेला सांगितलेलं आहे. ''कोणाला या वेळेला कोणाच्या पक्षाला जायचं त्यांनी आत्ताच जाव नंतर नाही जाता येणार.'' तो एक धृतराष्ट्राचा एक कोणी मुलगा इकडं आला म्हणतात. तर अशी सगळी मंडळी जी दुर्योधनानं जमा केली होती. प्रयत्नवादी होता दुर्योधन. पांडवांना कायमच वनवासाला पाठवण्याची त्याने योजना केली होती. बारा वर्षे हे आणखी नुसत वर वर होत. एक वर्ष अज्ञातवासाची जी अट

घातली होती त्या अटीमध्ये जन्मभर पांडवांनी आणखी वनामध्ये रहावं अशी व्यवस्था केलेली आहे.

एक वर्ष अज्ञातवासात असताना पांडव जर ज्ञात झाले तर पुन्हा बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास. हा चक्रव्यूह त्यांनी तयारच केलेला होता. आणि पांडव हे अज्ञात राहू शकणार नाहीत यालाही त्यांनी त्याचवेळेला मान्यता दिली हे दिसतं. पांडवांचे गुण असे आहेत की ते अज्ञात राहू शकणार नाहीत. प्रयत्न त्याचा होता. पांडव वनवासाला निघाल्यापासून त्यांच्या मागे त्याने हेर ठेवलेच होते. परंतु पांडवांचे गुणच असे आहेत की ते काही अज्ञात राहू शकणार नाहीत. एक वर्षामध्ये ते सांपडणार आणि ज्ञात आणि पुन्हा त्यांना बारा वर्ष वनवास. हा आपल्या बुद्धीचा उपयोग कौरवांनी केला होता. जरी तेरा वर्ष झाली तरी ती काय थोडी झाली काय !

साम्राज्य सगळं ताब्यामध्ये आहे. सत्ता सगळी ताब्यामध्ये आहे. सर्व सैन्य ताब्यामध्ये आहे. सगळा खजिना ताब्यामध्ये आहे. भीष्म द्रोणांसारखे अनुकूल अशा प्रकारचे अनुकूल करून घेतले आहेत लोक. अंत:करणातून ते पांडवांच्या बाजूने होते असं दुर्योधनही म्हणत होता. तो म्हणाला तरी त्यांना त्याच काही वाटत नव्हत. इतक्या मोठ्या अतिरथी महारथी मंडळींचा संग्रह त्याने केला. तेरा वर्षा नंतर पांडव जरी आले तरी सुद्धा आपण विजयी होऊ ***''अजरामरवत् प्राज्ञ विद्यामर्थंच साधयेत्''*** या प्रमाणे त्याच वागणं होत. प्रयत्नवाद असा होता.

अर्थ कामाबद्दल वैराग्य असावं असं म्हणतात. संतोष कोणाचा गुण आहे आणि कोणाला दोष आहे हेही सांगितलय. त्याला राज्य

करायच होतं. तो क्षत्रिय राजा होता. संतोषानी राहाण हा क्षत्रिय राजाचा राजधर्म नाहीये. संतोष हा गुणही आहे आणि दोषही आहे. याचा विचार केला पाहिजे.

***असंतुष्टात् द्विजा नष्ट:***
***संतुष्टास्य महिव्रत:***

म्हणतात. तर संतोष हा ब्राह्मणांचा गुण आहे. जास्तीत जास्त संतोषवृत्तीनं राहून संतोषाच कार्य म्हणजे अपरिग्रह आपोआप होतोच आहे.

तर अशा दृष्टीनं तो त्यांचा गुण आहे. पण क्षत्रिय राजसत्ता ज्याच्याकडे आहे, क्षत्रिय जो आहे अशा क्षत्रियाने जर संतोष व्यक्त केला तर ! शत्रूने काही जमीन घेतली तर काय हरकत आहे, थोडीशी जमीन गेली म्हणून काय हरकत आहे. असा संतोष जर राज्य करणाऱ्या नेत्या जवळ असला तर तो मोठा दोष आहे. राजनीतीच्या दृष्टीनं त्याला दोष मानलेला आहे. तर तसा हा मोठा क्षत्रिय राजा, दुर्योधन, त्याला हे संतोष वगैरे काही मान्य नाहीये. जास्तीत जास्त आपल हित करून घ्याव, सत्ता आपली आणखी चिरस्थायी करावी या करता त्याने प्रयत्न केलेले आहेत.

म्हणून त्याच्या पक्षाला जमलेले सगळेही राजे लोक अर्थात् त्याच म्हणण त्यांना मान्य आहे. योग्य आहे तो, दुर्योधन नेता योग्य आहे अशी त्यांची समजूत आहे. म्हणून त्याने सगळं सैन्य तयार केलं. त्यावेळेला अनायासे सगळ्यांचा नाश करता येईल आणि भूभार पुष्कळसा नाहीसा होईल. भूभार हरण करण्याकरता श्रीकृष्णांचा अवतार झाला, असं एक मत आहे. भगवान् गोपालकृष्ण ज्यावेळी

द्वारकेला जायला निघाले, पांडवांना राज्य मिळालं, सगळी व्यवस्था लावली आणि धर्मराजांचाही समाधान केलं. अर्जुनाची जशी युद्धाच्या आरंभी स्थिती झालेली होती - शोक, मोह वगैरे, दोषग्रस्त त्याच चित्त झालं - तशीच स्थिती धर्मराजांची युद्ध झाल्यानंतर झालेली आहे. तोही म्हणायला लागला माझ्या हातून फार मोठा अन्याय झालेला आहे. हिंसा घडलेली आहे. आणि ती राज्य लोभानी घडलेली आहे. मी काही राजा नव्हतो. राज्य मिळविण्याकरता म्हणजे लोभाने माझ्या हातून हे युद्ध झालेलं आहे. अर्थात् मला काही सद्गती नाही. त्यापेक्षा हे सर्व राज्य टाकून देऊन वनामध्ये जाऊन रहाव अशा प्रकारचे विचार त्याच्या मनामध्ये आलेले आहेत.

त्याला पुन्हा उपदेश करण्याकरता पुन्हा दुसरी भगवद्गीता भगवंतांनी काही सांगितली नाही. पण भीष्माचार्यांच्या द्वारे त्याला उपदेश केला आणि त्याच मन स्थित केलेलं आहे. तर धर्मराजाने राजा व्हायला पाहिजे असा भगवान श्रीकृष्णांचा अभिप्राय होता. त्यामुळे आणखी दुर्योधनादि जे आहेत त्यांचा नाश झालेला आहे. पुष्कळ प्रयत्न केला दुर्योधनाने पण त्याला काही यश मिळाल नाही.

भगवद् गीतेमध्ये नवव्या अध्यायात भगवंतांनी आणखी मुद्दाम उल्लेख केलेला आहे.

*मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ।*
*राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ॥ १२ ॥*
*गतेभीष्मे हते द्रोणे कर्णेच विनिपाविते ।*
*आशा बलवंती राजन ........ ज्येष्यति पांडवान् ॥*

इतके मोठमोठे महारथी गेले तरी त्याची आशा सुटली नाही. परंतु

शेवटी सगळी निराशा झालेली आहे. तेव्हां अशा प्रकारची स्थिती या लोकांची होते असं भगवान् सांगताहेत.

प्रकृतीच आणखी नियंत्रण होऊ शकत नाही असही त्यांनी सांगितलेल आहे. 'प्रकृतिं यांति भूतानि निग्रह: किं करिष्यति' असही भगवान सांगताहेत. याची व्याख्या करताना आचार्य महाराजांनी स्पष्ट लिहिल आहे - 'विग्रह किं करिष्यसि' यात थोडासा श्लेष काढून 'मया वा अन्येन क्रियमाणोपि निग्रह किं करिष्यसि' म्हणतात. मी जर निग्रह करायच मनावर घेतल तरीसुद्धा निग्रह होणार नाही. किंवा दुसऱ्या कोणीही निग्रह केला तरी होणार नाही.

शिष्टाईच्या वेळेला काय झाल काय ! दुर्योधनाने युद्ध करू नये या करता किती लोकांनी त्याला सांगितलं असेल. भीष्म, द्रोण यांनी तर सांगितलच. धृतराष्ट्राने सांगितलं, त्याच्या आईने सांगितलं. शेवटी श्रीकृष्णांनीही सांगितलं. तेव्हां सगळ्यांनी युद्ध न करण्याचा प्रयत्न केला असताना सुद्धा त्याची प्रकृती काही बदलली नाही.

तर या प्रमाणे जरी प्रकृतीचं नियंत्रण होऊ शकत नाही, असा एक सिद्धान्त भगवान् मांडताहेत. परंतु त्या प्रकृतीचं सुद्धा नियंत्रण करण्याच सामर्थ्य ईश्वराजवळ आहे. 'मया वा अन्येन क्रियमाणोपि' अशी जरी व्याख्या आचार्य महाराजांनी केली तरी 'प्रकृति निग्रह' किती कठीण आहे एवढाच त्यातला अभिप्राय असावा. तर हाही सिद्धान्त मांडला भगवंतांनी तरीसुद्धा -

***'मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतांतरन्ति ते ।'***

असही सांगताहेत. तेव्हा आणखी दहाव्या अकराव्या अध्यायामध्ये विश्वरूप दर्शन दाखवल, सगळं झालं आणखी ***''ददामि बुद्धियोगं***

***तं येन मामुपयान्ति ते''*** हाही साधनमार्ग त्यांनी सांगून दिलेला आहे, बुद्धियोग म्हणून जो आहे. तोही देतो, म्हणाले. म्हणजे बुद्धीप्रदान करणं विभूती अध्यायामध्ये आरंभाला सांगितलं आहे - 'बुद्धिर्ज्ञानमसंमोह:' हे सगळं माझ्यापासून मिळू शकत, मीच देऊ शकतो असही सांगितलं आहे.

तर श्रीमत् भागवतामध्ये कौरवांचा, त्यांच्या पक्षाला मिळालेल्या सर्वांचा संहार करण्याची इच्छा होती. भूभार हरण करण्याची प्रार्थना केल्यामुळे श्रीकृष्ण अवतार घेऊन आले असं त्या कुंतीने स्तुती करताना सांगितलं. त्या अवताराची प्रयोजन अनेक सांगितली आहेत. त्यापैकी भूभार हरण करण्या करताही कृष्णावतार झाला असही काही लोक म्हणतात. त्याच प्रमाणे परम-हंस परिव्राजकाचार्य, शुद्ध ज्यांच चित्त झाल आहे अशा प्रकारचे ज्ञानी महात्मे त्यांना भक्तियोग सांगण्याकरता कृष्णावतार झाला असं ती कुंती म्हणते आहे. हे कृष्णावताराचे अत्यंत विलक्षण प्रयोजन आहे.

ज्ञानी पुरूषांना भक्ती शिकवावी लागती असं म्हणतात. तत्वज्ञान झाल्यानंतर सुद्धा त्याच्या ज्या भूमिका वसिष्ठांनी सांगितल्या आहेत. चौथ्या भूमिकेवर ज्ञान झालेलं आहे परंतु अद्यापि जीवन मुक्ती प्राप्त करून घ्यायची असेल तर त्याला तो प्रयत्न सुद्धा करावा लागतो. वासनाक्षय, मनोनाश आणि तत्वज्ञान या तिघांचाही अभ्यास आणखी त्याला करावा लागतो. त्याशिवाय पूर्ण जीवन्मुक्ती सुख प्राप्त होऊ शकत नाही. विदेहमुक्ती म्हणजे पुढे काहीच नाही; देह संबंधच सुटला आहे. परंतु देह संबंध असेल तो पर्यंत सौख्य मिळवायच असेल तर ते सौख्य मिळविण्याकरता म्हणून त्यालाही

प्रयत्न करावा लागतो.

अशा प्रयत्नात असणारे तत्वज्ञानी महात्मे त्यांनाही भक्ति योग शिकवायचा आहे. तो शिकविण्याकरता हा अवतार झाला आहे. भगवंताच चरित्र व्यास महर्षींनी लिहिलं. आपल्या मुलाने याव आणि याचा अभ्यास करावा अशी त्यांनाही इच्छा होती. जे चरित्र आपण लिहिल्यामुळे आपल्या चित्ताला शांती मिळाली त्याचा हा अधिकारी आहे. भागवताचा अधिकारी आपला पुत्र आहे म्हणून त्याला आणण्याकरता म्हणून कृष्ण चरित्रातील काही श्लोक त्याच्या कानावर पडावेत अशी व्यवस्था आपल्या शिष्यांमार्फत आणि त्यामुळे त्यांच्या चित्ताचेही आकर्षण झाले म्हणतात.

आणि ते संपूर्ण कृष्णचरित्र, भगवद्गुण ऐकल्याबरोबर त्यांच्या मनाचं आकर्षण झालं आणि शुकाचार्य आपल्या पिताजींच्या जवळ आले. आणि मग संपूर्ण भागवताचा त्यांनी अभ्यास केला म्हणतात. हा अभ्यास केल्यानंतर नित्य त्याचं अखंड चिंतन घडलेल आहे. भागवत पठण अखंड चाललेल आहे, आचार्य महाराज त्यांच वर्णन करताहेत. आणि त्यांना श्रोत्याची जरूरी होती. कोणी तरी असा अधिकारी श्रोता पाहिजे की त्याला हे भागवत आपण सांगावं असं त्यांना वाटत होता. म्हणून ते मुद्दाम आले आणि परीक्षित राजाची भेट झाल्यानंतर त्याला संपूर्ण भागवत त्यांनी सांगितलेल आहे.

तर या भागवतामध्ये किती तरी वेगळ्या वेगळ्या प्रकारच्या कथा आल्या आहेत, भगवंताच माहात्म्य काय आहे, ईश्वराची शक्ती काय आहे हे दाखिवणाऱ्या. एक सामान्य गजेंद्र मोक्षाचे आख्यान, त्याच्या बद्दल जरी विचार केला तरी ईश्वर शक्ती काय आहे ते

आपल्याला कळून येत.

गजेंद्र सांपडलेला आहे, त्या मगराने त्याच्या पायाला धरलेल आहे. तो आंत ओढतो आहे हा बाहेर पडण्याचा प्रयत्न करतो आहे. शेवटी ह्याची शक्ती संपली. आणि ती संपल्या नंतर शेवटी त्याला अस वाटायला लागल की संरक्षक परमेश्वराशिवाय आपला संरक्षक कोणीही नाही. अशी त्याला बुद्धी उत्पन्न झाली. त्या बुद्धीने त्याने भगवंताची स्तुती केलेली आहे.

***ॐ नमो भगवते तस्मै यत एतच्चिदात्मकम् ।***

***पुरूषायादिबीजाय परेशायामिधीमहि ॥ ८.३.२ ॥***

'नमो भगवते तस्मै यत एतत् चिदात्मकम्' सामान्य नावाचा, रूपाचा, गुणाचा आणखी काहीही उल्लेख त्या स्तुतीमध्ये नाहीये. सामान्य रूपाने स्तुती आहे. म्हणजे सामान्य जे भगवंताचं स्वरूप आहे - देश काल मर्यादा रहित - अशा स्वरूपाच आणखी मनामध्ये चिंतन करून तो गजेंद्र जो आहे तो स्तुती करतो आहे.

विशेष नामरूपात्मक उल्लेख करून केलेली स्तुती, वेदान्तशास्त्रामध्ये 'तत् पदार्थ शुद्धि', 'त्वम् पदार्थ शुद्धि' आणि नंतर 'वाक्यार्थ ज्ञान' असा क्रम सांगितलेला आहे. श्रवण, मनन, निदिध्यासन या सगळ्याही साधनांच्या बरोबर तत् पदार्थ बरोबर समजला पाहिजे.

***विराडादिस्थावरान्ता ईश्वरा बहव: श्रुता: ।***

***एतेबु कतमोऽच्योंऽत्र मोक्षसिद्धि प्रदश्च क: ॥ २.२ ॥***

सद्‌गुरू वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी सत्यदत्त कथेमध्ये एक कथा जिज्ञासूची लिहिताना हा प्रश्न त्या जिज्ञासूच्या मुखामध्ये

घातला आहे.

कोणच्या ईश्वराची पूजा करायची म्हणाले. म्हणजे ईश्वर दर्शन याचा अर्थ ईश्वराचं ज्ञान जे व्हायच आहे ते ही जी परिच्छिन्न रूप जी आहेत ती वास्तविक ईश्वराचीच आहेत. परंतु सगळ्याच ईश्वर स्वरूपांची भक्ती काही होऊ शकत नाहीये. कुठ तरी बुद्धी स्थिर होणार, त्याच्यामध्ये कमी जास्ती पणा मनामध्ये उत्पन्न होणार; तो कमी जास्ती पणा उत्पन्न झाला किंवा एका कोणत्या तरी स्वरूपाच्या ठिकाणी आपली बुद्धी स्थिर झाली तरी हरकत नाही. पण ते सर्व एकत्र जाणून एका विशिष्ट ठिकाणी बुद्धी स्थिर झाली तरी दोष नाहीये.

***पुराशैच मुराशैच न भेद पारमार्थिक:***
***तथापि मामकी बुद्धी: चंद्रचूडे अधावति ।***

अप्पय्या दीक्षित सांगतात भेद नाहीये.

***'तथापि मामकी भक्ति: चंद्रचूडे प्रभावति ।'***

मी चंद्रचूडाची भक्ती करतो आहे. त्याला काही आणखी शास्त्रकारांचा प्रतिबंध नाहीये. पण एकत्र ज्ञान आहे. पारमार्थिक म्हणून आहे. आज समोर भेद आहे. वेगळी वेगळी रूप आहेत. नांव वेगळी वेगळी आहेत. कर्म वेगळी वेगळी आहेत. अशा दृष्टीनं हा व्यावहारिक भेद आहे.

तर पारमार्थिक भेद नाहीये हे जाणणारे आहेत ते, त्यामुळे त्यांची जरी एका ठिकाणी भक्ती असली तरी ती काही दोषास्पद नाहीये. केवल बाह्य रूप पाहून, पारमार्थिक भेद आहे की अभेद आहे इकडे लक्षच नाहीये; हा विचारच मनामध्ये नाहीये. फक्त जर अनेक ईश्वराची स्वरूप पाहिली की इतर - ह्या भारतीय संस्कृतीच्या बाहेरची - मंडळी ते भारतीय संस्कृतीला दोष देताना हेच सांगतात.

किती ईश्वर आहेत तुमच्यात ! असे काही काही दोष काढतात ते. कोणालाही ईश्वर म्हणता, नदीलाही ईश्वर मानता. आता अलीकडे भारतीय संस्कृतीतले लोकही असच म्हणतात. हे ईश्वर स्वरूप मान्य नाही, ते ईश्वर स्वरूप मान्य नाही. कोणचच ईश्वर स्वरूप मान्य नसत त्यांना. पण सांगताना मात्र हे बरोबर नाही, ते बरोबर नाही असे काहीतरी आक्षेप घेतात.

तर मनामध्ये, केवळ बाह्यनामरूप वेगळी वेगळी आपल्या समोर आली असताना, गोंधळ होणं शक्य आहे. मग कोणाची भक्ती करायची? इथून प्रश्न सुरवात होतो. वस्तुत: भगवंतांनी सांगितलेल आहे,

***यो यो यां यां तनुं भक्त: श्रद्धयार्चितुमिच्छति ।***

***तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ ७.२१ ॥***

माझ्या कोणच्याही स्वरूपाची भक्ती करावी . ज्या स्वरूपाबद्दल मनामध्ये श्रेष्ठ अनुराग असेल त्या ठिकाणी त्याची भक्ती योग्य आहे. तथापि सुद्धा मनाचा गोंधळ होतो आहे. अनेक स्वरूप ईश्वराची आहेत. एकच स्वरूप समजून घ्यायच म्हणजे किती, अनेक जन्म घालवावे लागतात.

महान् आत्मा व्हायचा म्हणजे 'वासुदेव: सर्वम्' ही बुद्धी ज्याला उत्पन्न झाली तो महात्मा आहे. आणि हा अत्यंत दुर्लभ आहे असं भगवान् सांगतात. ही भूमिका प्राप्त होण्याला 'बहुनां जन्मनां अन्ते' पण ही भूमिका तर मिळालेली नाहीये. भक्ती करावीशी वाटतेय पण उपास्य कोणचं इथ गोंधळ उडालेला आहे. हा गोंधळ उत्पन्न झाला आणि खरी भक्ती कधी उत्पन्न होते ते सांगताना भगवान् म्हणतात -

***येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।***
***ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रता: ॥ ७.२८ ॥***

भक्तियोगाचा आरंभ पण फार कठीण आहे. भक्ती योग फार सुलभ आहे असं लोक म्हणतात. कर्ममार्गामध्ये पुष्कळ प्रतिबंध आहेत. सकाळी अमक्या वेळेला उठा, तमक्या वेळेला हे करा, अमुक करा तमूक करा, कशाला पाहिजे हे? त्यापेक्षा आपला भक्तिमार्ग बरा आहे. पण ह्या भक्तीची सुरवात काही सामान्य लोकांची होत नाही, म्हणाले. तर सर्व पापक्षय होणं हे जस ज्ञानाला आवश्यक आहे, त्याशिवाय ज्ञान उत्पन्नच होणार नाही. तशीच पापक्षयाची आवश्यकता भक्तियोगाला सुद्धा आहे भगवान् सांगतात. आणि त्या करता कर्मयोग हे साधन सांगितले आहे.

आणि त्या कर्मयोगाने पापक्षय झाला याचा अर्थ द्वंद्व मोह निर्मुक्त ते होतात. जरी बाह्य स्वरुप अनेक असली, तरी त्यांच्या अंत:करणामध्ये एकत्र बुद्धी - परोक्ष का होईना - उत्पन्न झाल्यामुळे कुठ तरी एका स्वरुपाच्या ठिकाणी त्यांच चित्त स्थिर होत. मग जास्तीत जास्त त्याचा विकास होतो आहे, महात्मा जे होतात वासुदेव: सर्वम् ह्या भूमिके पर्यंत ते जाऊ शकतात. तर ***परमहंसानां तथा परमहंसानां ऋषिणां अमलात्मनाम् । भक्तियोग विधानार्थं कथं पश्ये महिस्त्रिय: ॥*** आम्हाला कस समजणार बाबा तुझं कोण स्वरुप आहे ते? कोणची भक्ती आहे? तर परमहंस असलेले ज्ञानी महात्मे, शुद्ध चित्त ज्यांच झाल आहे त्यांना भक्तियोग शिकवण्याकरता कृष्णावतार झाला म्हणतात. हे एक प्रयोजन मुद्दाम सांगितले आहे. म्हणजे किती कठीण आहे. वस्तुत: भक्ति योग समजून सांगायची

त्यांची योग्यता आहे कारण अस आहे की दैवी प्रकृतीचं वर्णन करताना नवव्या अध्यायामध्ये भगवंतांनी म्हटल आहे - आसुरी प्रकृतीच्या लोकांची काय अवस्था होते हे सांगून झालं आणि पुढे -

***महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिता: ।***

***भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥ १३ ॥***

दैवी प्रकृतीचे लोक माझ भजन करतात. पण भजन कसं केलं पाहिजे - 'अनन्य मनसा:' हे त्यांनी मुद्दाम सांगितलेल आहे. चित्तामध्ये, मनामध्ये परमेश्वराशिवाय ज्यांच्या दुसरे कोणीही येत नाही. दुसरं काहीही नाही. 'द्वंद्वमोहनिर्मुक्ता:' म्हटलेल आहे. द्वंद्वमोहापासून मुक्त झाल्याशिवाय जीव खऱ्या भक्तियोगाचा अधिकारी होऊ शकत नाही.

तर अनन्य मनस्क झाल पाहिजे ! आणि दुसरी गोष्ट - 'ज्ञात्वा भूतादिमव्ययम्' . सर्व विश्वास सर्वहि भूतांचा आदि कारण परमात्मा आहे हे त्यांना कळलेल असत म्हणून ते भक्ती करतात. अनन्य मनस्क होतात. अनन्य कार्य आहे त्याच. आभासात्मक आहे. तेव्हा सगळ्याही एकंदर विश्वाला कारण असलेला परमात्मा म्हणजे केवढी त्याची शक्ती असेल ! हे त्यांना ज्ञान असल्यामुळे त्यांच मन दुसरीकडं जातच नाही आणि ज्ञानपूर्वक त्यांची भक्ती आहे.

तर ही स्थिती ईश्वरस्वरुपाचं जितकं जितकं ज्ञान होत जाईल, परिच्छेद जितका जितका जाईल आपल्या मनातला आणि सर्वही विश्व हे परमात्म्याचं स्वरूप आहे हे जितकं जितकं आपल्या मनामध्ये आणखी पटेल तितकी तितकी भक्ती ही जास्ती जास्ती होत जाती आहे. म्हणून दैवी प्रकृतीचे लोक भगवंताच भजन करतात आणि त्यांची भूमिका अशी असते म्हणतात. त्यांच्या मनामध्ये कोणचाही

विषय नाही आणि त्यांना ईश्वरस्वरुपाचं असं ज्ञान आहे, की सर्वांना कारण तो आहे, सर्व विश्व त्याच्यापासून निर्माण झालेलं आहे. ही सर्व त्याची लीला आहे. हे समजल्यामुळे त्यांची बुद्धी दुसरीकडं जातच नाहीये.

तेव्हां अशा एकंदर श्रेष्ठ पुरुषांनासुद्धा भक्तियोगाच स्वरुप काय आहे, त्याची साधन काय आहेत, त्याच फल काय आहे हे सगळं समजावून सांगाव लागत म्हणतात. शुकाचार्य महाराजांना हे सगळही भागवताचा अभ्यास केल्यानंतर कळून आलेलं आहे. त्यामुळे निर्गुण निराकार परमात्म तत्व आहे, कशाला पाहिजे हे...... नामरुपात्मक विश्वाचा संबंधच नको आपल्याला असं मनामध्ये ठरवून, जन्मत:च, मातापित्यांचा त्याग करुन वनात निघून गेलेले शुकाचार्य पुन्हा परत आलेले आहेत. आणि त्यांनी ज्यावेळेला हा सगळा अभ्यास केला भागवताचा त्यामुळे त्यांना ईश्वराचं हे सर्व स्वरूप कळलेल आहे. शुद्ध स्वरुप समजलेलं आहे. सगुण स्वरूप जे आहे त्या सगुण स्वरुपाच्या लीलाही त्यांना समजल्या त्यामुळे त्यांच अंत:करण भक्ती पूर्ण असं झालेल आहे.

ही जी ज्ञानोत्तर भक्ती आहे ती शिकण्याकरता याव लागत म्हणतात भगवंताला. कारण निर्गुणाचा एक प्रकारचा मनामध्ये अभिनिवेश उत्पन्न झाला. नामरुपात्मक विश्वाचा परित्याग करायचा. नामरुपात्मक विश्व निर्माण करणारा परमात्मा, अनेक अवतार धारण करुन त्या विश्वाचं संरक्षण करण्याचे त्याचे प्रयत्न चाललेले आहेत. मग त्या ईश्वरस्वरुपाचं ज्यांना यथार्थ ज्ञान झालेलं आहे अशा प्रकारच्या महात्म्यांनी तरी विश्वाची उपेक्षा का करायची. भक्तियोग

जर सिद्ध झाला - तर सगुण स्वरुपही त्याचच अंतर नाहीये. बाह्यरुपाने शास्त्रीय दृष्टीने पूर्व पक्ष उत्तर पक्ष असे होतील म्हणा, परंतु वस्तुत: सगुण स्वरूप आणि निगुर्ण स्वरूप ह्यांच्यामध्ये काहीच अंतर नाही. सगुण स्वरूप जे आहे ईश्वराचं ह्याच्याकडे लक्ष दिल म्हणून काय बिघडल, निर्गुण समाधीमध्ये कशाला राहायला पाहिजे. तेव्हां असा कोणत्याही प्रकारचा अभिनिवेश अंत:करणामध्ये न राहताना आणि अंत:करणामध्ये सगुण भगवद् भक्ती का असेना ती उत्पन्न झाल्यामुळे त्यांच अंत:करण शांत होत आहे. या करता भगवंतांचा अवतार झाला असही एक प्रयोजन सांगितलेलं आहे.

तर ही भक्ती आणि त्या स्वरुपाच ज्ञान हे परीक्षित राजाला करुन द्यायच आहे म्हणून शुकाचार्यांनी संपूर्ण भागवत त्याला सांगितलं आहे. त्यानेही अत्यंत श्रद्धेनं, सर्व अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय वगैरे सर्व कोशांपासून अलिप्त राहून ते श्रवण केलेलं आहे. कारण अन्नपाणी त्याने वर्ज्य केलय म्हणजे अन्नमय कोश जिंकला आहे त्याने. त्याच्या पलीकडे गेल्याशिवाय क्षुधा, तृषा यांचा जय कसा होईल. म्हणून अशा स्थितीमध्ये या भूमिकेवरून त्याने ऐकल ते आणि त्याच फल त्याला तत्काल मिळालेलही आहे. तो मुक्त झाला. देहाची चिंता त्याला राहिलेली नाही. सगळे शास्त्रीय सिद्धान्त त्याच्या लक्षामध्ये आलेले आहेत. आणि त्यामुळे त्या समाधी अवस्थेमध्येच तो लीन झाला आणि शेवटी त्याचा सर्पदंश होऊन त्याचा नाश झाला वगैरे ती कथा प्रसिद्ध आहे.

या भागवतामध्यें गजेंद्राच्या आख्यान्याबद्दल जो विचार चाललेला आहे. ईश्वरशक्तीच एकंदर कार्य काय आहे. तो गजेंद्र असं

म्हणायला लागला, आता आपण जाणार. मग त्याने ईश्वराची प्रार्थना केली, ईश्वरस्वरुप जे त्याने आपल्यापुढे ठेवलेले आहे ते असं आहे. नामरुप तर सोडून दिल त्याने. आणि नांवरुप सोडून केवळ सर्व विश्व व्यापक अशा प्रकारच जे आहे, ज्याच्या अस्तित्वामुळे सर्व चैतन्य भासते आहे, जगामध्ये सर्व व्यवहार चाललेले आहेत, त्या ईश्वराला नमस्कार असो.

शेवट पर्यंत त्याने अशा प्रकारची स्तुती केलेली आहे. म्हणजे त्या गजेंद्राची बुद्धी सुद्धा, त्या बुद्धीमध्ये तत् पदार्थ समजलेला आहे, अस म्हणायला हरकत नाही. कारण नावरुपाने ब्रह्मदेव म्हणा, विष्णू, शिव, इंद्र वगैरे कोणाच्याही नांवाचा उल्लेख त्याने केलेला नाही. आणि तेच लिहिल शुकाचार्यांनी. कोणीही देव आले नाहीत, म्हणाले. याने आमच नांव घेऊन कुठ हाक मारली आहे म्हणून त्यांनासुद्धा वाटल म्हणे. आपल्या नांवरुपाचा अभिमान असणारे कोणीही देव त्याच्या संरक्षणाकरता आले नाहीत. म्हणून शेवटी भगवान् आले सांगतात.

तर त्या गजेंद्राच्या बुद्धीमध्ये ही जी इतकी भूमिका मिळवली त्याने पशु जन्मामध्ये ही कशी मिळवली हाच मोठा प्रश्न आहे. आता त्याच समाधान करण्याकरता हा कथाभाग अयोग्यच आहे असा एकदम शेरा दिला म्हणजे संपल. त्याचा विचार करण्याचं कारणच नाहीये. कारण बुद्धीला पटत नाही आमच्या. हत्तीच्या जन्माला गेलेला आणखी स्तुती काय करतो, शक्य तरी आहे काय ! सर्व वेदान्त सिद्धान्त ज्याच्यामध्ये मांडलेले आहेत हे त्या हत्तीला कसं शक्य आहे? त्याला कळत का ? तर अशा प्रकारचा आमच्या मनामध्ये एक संदेह निर्माण होतो, हा जो बुद्धिवाद आहे. त्या बुद्धिवादाला

त्यांनी सांगितलं - त्याला उत्तरही शुकाचार्यांनी दिल आहे.

तो पूर्वकर्मामध्ये असलेला राजा आणखी अगस्ती ऋषींच्या शापामुळे हत्तीच्या जन्माला आलेला आहे. हत्तीचं - पांच भौतिक - शरीर वेगळं आहे. ते उत्पत्ती विनाशशाली आहे. उत्पन्न होणार शरीर पुन्हा नष्ट होत. परंतु या शरीरामध्ये बुद्धितत्व म्हणून जे आहे इंद्रिय वगैरे जे आहे. हे बुद्धितत्व वगैरे तेच कायम आहे. पूर्व प्रज्ञा त्याला अनुसरण करतील. विद्या, कर्मा, पूर्व प्रज्ञा तिन्हीही त्याच्या बरोबर जे येतात असं उपनिषदामध्ये सांगितलेलं आहे, त्याने केलेली उपासना, त्याने केलेली कर्म, त्याने संपादन केलेली प्रज्ञा ही सगळी त्या जीवात्म्याच्या बरोबर असती.

तर जीवात्मा आणि त्याचा हा सगळा परिवार सूक्ष्म शरीरात्मक, हे सगळही त्याच्या बरोबर आहेत. हा जर सिद्धान्त मान्य असेल तर हत्तीनं स्तुती कशी केली हा मनामध्ये संशय येणारच नाही. हत्तीचं शरीर आलेल आहे पण हत्तीच्या शरीरात येणारा जीवात्मा त्याचा बुद्धितत्वरुपादि परिवार तोच आहे. त्यामुळे पूर्वी ज्याने आपल्या बुद्धीमध्ये संस्कार निर्माण केलेले आहेत, ईश्वरस्वरूपाचं अनुसंधान ज्याने पूर्वीच्या शरीरामध्ये असताना केलेल आहे, त्या बुद्धीमध्ये या जन्मात ईश्वराचं ज्ञान होणार नाही कशावरून? अभ्यास, त्या बुद्धीवर संस्कार करण्याकरता तर मानवजन्म आहे.

क्रियमाण कर्म कसं करायच या करता शास्त्र आहे. केलेल कर्म कसं आहे असू द्या म्हणाले. परंतु क्रियमाण कर्म जर अशा प्रकारचं शास्त्रानुसार घडलं, आणि त्याप्रमाणे बुद्धीवर जर चांगले संस्कार झाले तर तीच बुद्धी पुढच्याही शरीरामध्ये येणारी आहे. तर हा जो

शास्त्रीय बुद्धिवाद आहे त्या बुद्धिवादाने विचार केलेला असताना तो हत्ती जरी असला तरी आणखी त्यालासुद्धा ज्ञान असायला हरकत नाही, ईश्वरस्वरूपाचं ज्ञान त्याला आहे. त्यामुळे त्याने तशी स्तुती केली आहे. बुद्धीला असं कळणच शक्य नाही, पशुच्या बुद्धीमध्ये आणखी असं असणच शक्य नाही वगैरे वगैरे हा जो बुद्धिवाद आहे, यामुळे बुद्धीची किंमत कमी केल्याप्रमाणे होत आहे.

बुद्धीची किंमत जास्ती वाढवण्या करता आधुनिक बुद्धिवाद आहे ना ! बुद्धी श्रेष्ठ आहे, बुद्धी श्रेष्ठ आहे. मग पशुच्या बुद्धीला कळत नाही, अमक्याच्या बुद्धीला कळत असं म्हणणं किंवा बुद्धीचा विकास कोणच्याही स्थितीमध्ये ज्यांनी करून घेतलेला आहे, ते कोणच्याही जन्मात, कोणच्याही देहात असताना त्यांची बुद्धी कार्य करू शकते या म्हणण्यावर बुद्धीच श्रेष्ठत्व आहे.

तर त्या गजेंद्राने केलेल्या स्तुतीमध्ये हेही दिसलय की मोठ्या मोठ्यांना हे साध्य होत नाहीये. तत् पदार्थ शुद्ध होणं. शहरातून सगळीकडे गणपतीचे उत्सव होत असतात. गणपती पहायला पुष्कळ मंडळी जातात. येतात जातात. आणि बोलत बोलत निघाली असता ''काय हो, तो गणपती किती चांगला होता, ह्या पेठेतला गणपती काही तेवढा चांगला नाही. आता गणपती एकच आहे ना !'' पण तिथ सुद्धा अगदी बाह्य दृष्टीने तो गणपती चांगला आणि हा गणपती चांगला नाही अशा प्रकारची बुद्धी उत्पन्न होती.

तर मग इथे सबंध विश्वामध्ये अनेक स्वरूप ईश्वराची म्हणून सांगितली आहेत. त्या ईश्वर स्वरुपामध्ये भेद बुद्धी सोडून द्यायची आणखी एक तत्व आहे. सर्वत्र एक तत्व आहे अशा प्रकारची भूमिका

प्राप्त करून घेण हे किती तरी कठीण काम आहे. तर त्याला सगळही मिळालेल आहे. हरीचं अर्चन त्याच्याकडून पूर्व जन्मामध्ये झालेलं आहे. त्यामुळे गजयोनीमध्ये तो आलेला असताना सुद्धा त्याची बुद्धी अशा प्रकारची समर्थ ठरलेली आहे. हे त्याने उत्तर दिलेले आहे.

तेव्हां या प्रमाणे ईश्वराच्या कृपेने ज्यांनी आपल्या बुद्धीला सुसंस्कृत केलेलं आहे, ती संस्कृत बुद्धी त्याच्या बरोबर असताना - कोणच्याही जन्मामध्ये का जाईना - बाह्य रूपाने जरी जो पशु असला तरी बुद्धी त्याची वेगळी आहे. म्हणून जन्मत:च आणखी बाकीच स्मरण होत आहे. ह्याला कारण म्हणजे पूर्व जन्मामध्ये जो अभ्यास झाला आहे, ज्या अभ्यासाने त्यांनी आपल्या बुद्धीचा विकास करून घेतल्यामुळे त्या बुद्धीने अशा प्रकारच कार्य झालेलं आहे. आणि गजेंद्राचा उद्धार होऊन गेलेला आहे.

तर अशा ईश्वरकृपेच्या द्योतक अनेक कथा भागवतामध्ये आहेत. श्रीकृष्णांच अवतार चरित्र अत्यंत श्रद्धेनं परीक्षित राजानं ऐकलेल आहे. आणखी शेवटी भगवंतांनी लांब जायच्या वेळेला उद्धवजींना जो उपदेश केलेला आहे तोही ज्या परीक्षित राजाला सांगितला. ईश्वराची ज्ञानशक्ती कशी आहे, क्रियाशक्ती कशी आहे; ईश्वराच्या शक्ती बद्दल विश्वास आहे, नाही  असे नाही. श्रद्धा आहे म्हणतो आपण. भक्ती आहे अस समजतो, परंतु ती भक्ती द्वंद्वमोहनिर्मुक्त होऊन करणं हा भक्तीचा आरंभ आहे म्हणतात भगवान्. द्वंद्व मोह गेला पाहिजे, पापक्षय झाला पाहिजे. जरी नसल तरीसुद्धा असुरांच्या मनामध्ये हे आहे, की उत्पत्ती आणि नाश शक्ती जी आहे ती ईश्वराची आहे. नवीन काही तरी उत्पन्न करणं,

आपल्याला जे पाहिजे हे सगळं मिळणं, आपल्या इच्छे प्रमाणे आणखी त्याचा नाश होऊ नये या करता काही तरी व्यवस्था केली पाहिजे.

म्हणजे उत्पत्तीशक्ती आणि नाशशक्ती ह्या दोन शक्ती ईश्वराच्या आहेत या बद्दल काही वाद नाही अस वाटतय. हिरण्यकश्यपू आणि प्रल्हादजींच जे आख्यान सांगितलेल आहे त्यात हिरण्यकश्यपू हा तपश्चर्या करण्या करता गेलेला आहे. तपश्चर्या करून ईश्वराच्या कृपेनं आपल्याला नवीन पाहिजे ते मिळवाव आणि आपला नाश होऊ नये या करता काही तरी प्रयत्न करावा म्हणजे मग मिळालेल्या सगळ्याचा आपल्याला भोग घेता येईल. तर उत्पत्तीशक्ती आणि संहारशक्ती ह्या दोन्हीही ईश्वराधीन आहेत हे हिरण्यकश्यपूला देखील पटलेल आहे. पण संरक्षणशक्ती ही आमची आहे अस आम्ही समजतो. पण गर्भामध्ये असणाऱ्या गर्भाचं आम्ही संरक्षण करू शकणार नाही.

'न मातु: परदैवतम्' हे योग्य आहे म्हणाले नाही अस नाही. पण जन्माला आल्या नंतर आपल्या देहाच्या सुखाकडे वगैरे न पाहाताना अपत्याच संगोपन ती माता करते आहे. हे श्रेष्ठ, बरोबर आहे म्हणाले. परंतु गर्भात असलेल्या आपल्या अपत्याच संरक्षण माता करू शकते काय? शक्य नाहीये. त्या गर्भात असलेल्या अपत्याच संरक्षण करणारा कोण आहे? तर त्या ठिकाणी जो संरक्षण करतो तोच बाहेरही संरक्षण करणारा आहे. ही जाणीव त्यांच्या अंत:करणामध्ये विचारांनी झाल्यामुळे ते निश्चिंत असतात.

तुलसीदासांच जे उदाहरण सांगतात. त्यांच्या घराचे दरवाजे नेहमी उघडे असायचे म्हणतात. कधीही झाकलेले नाहीत. एकदा

शेजारती झाल्यावर सगळे निघून गेले. दरवाजे उघडे पाहून काही चोर आंत शिरले. सगळे निजलेले आहेत. आंत जाऊन मूर्तीवरचे सगळे दागिने कपडे वगैरे काढलेले आहेत. त्यांची गांठोडी बांधली आणखी निघाले. बाहेर निघाल्या नंतर दरवाजाजवळ त्यांना दोन पहारेकरी दिसले. धनुष्यबाण घेतलेले आहेत. म्हणून त्यांनी ठरवल आपण पाठी मागच्या दुसऱ्या दरवाजाने जाण्याचा प्रयत्न करु. तिकडे जाऊन बघतात तो तिकडेही पहारेकरी आहेत.सारखे फिरताहेत. पहाटे कांकड आरतीची वेळ झाली. तुलसीदासजी उठलेले आहेत. शरण आले ते चोर, पश्चाताप झाला त्यांना. ''क्षमा करा महाराज'' तुलसीदासजींनी विचारले, ''काय झालं?'' ते म्हणाले, ''आम्ही चोरी करण्याकरता आलो. दागदागिने, द्रव्य वगैरे घेतलं आम्ही आपलं. पण बाहेर आम्हाला जाता येईना. बाहेर पहारेकरी आहेत.''

तुलसीदासजींनी विचारल, ''पहारेकरी कोण? इथ पहारेकरी वगैरे कोणी नाही'' ते चोर म्हणाले,''आहेत. ***तरुणौ रूप संपन्नौ सुकुमारौ महाबलौ ! पुंडरीक विशालाक्षौ चिर कृष्णाजिनांबरौ***' हे दोन पहारेकरी सर्व दरवाजांवर आहेत. कुठही आम्हाला जाता येत नाही.''

तुलसीदासजी म्हणाले, ''बाबांनो काय तुमचे भाग्य आहे ! मलासुद्धा दर्शन झालं नाही आणि तुम्हाला दर्शन झालं.'' म्हणजे ज्यांच्या मनामध्ये काहीही नाही. सर्वही संसार हा परमेश्वराचा आहे, ही भावना ज्यांच्या अंत:करणामध्ये निर्माण झालेली आहे. आणि संरक्षण करणाराही तोच आहे. सर्वत्र संरक्षण शक्ती त्याचीच आहे. ही बुद्धी ज्यांच्या मनामध्ये उत्पन्न झाली तेच ज्ञानी, संत होऊ

शकतात.

आमच्या मनामध्ये ईश्वराबद्दल अर्धवट आदर आहे. उत्पन्न आम्ही करु शकत नाही, संहार करणं आमच्या ताब्यामध्ये नाहीं ते ईश्वराच्या ताब्यात आहे मान्य करतो आम्ही. परंतु संरक्षण मात्र आमचं आम्ही करण्याला समर्थ आहोत हा जो भ्रम आहे त्यामुळे सगळा घोटाळा झालेला आहे.

तर व्यासमहर्षींनी तेच सांगितलं आहे. उत्पत्ती, स्थिती आणि लय, तिन्ही त्याच्यापासूनच चाललेल आहे. हाच सिद्धांत भागवताच्या पहिल्या श्लोकामध्ये त्यांनी दाखिवलेला आहे. तर अशा रीतीनं ही आणखी ईश्वरभक्ती ज्यांनी मिळविली त्यांना शिकवण्या करताच अवतार होताहेत असं कुंतीच्या सांगण्यावरून दिसत आहे. तर भगवंताच्या कृपेन ही भक्ती ज्यांला मिळाली, शुकाचार्यांसारखे सद्‌गुरू भेटून त्यांच्या बुद्धीमध्ये ईश्वरस्वरूपाचा खरा आविर्भाव होतो आहे. खरं अमर्याद जे ईश्वरस्वरूप आहे की ज्याला देश मर्यादा नाही, काल मर्यादा नाही, वस्तु मर्यादा नाही, सर्वस्वरूपच तो आहे.

हे ईश्वरस्वरूपाचं जे ज्ञान आहे, पूर्ण दृष्टी ज्याला म्हणतात, शास्त्रामध्ये पुष्कळ दृष्टी सांगितल्या आहेत- ईश्वररुपाने झालेली माया सत्य आहे. ही पहिली भूमिका आहे. सगळ खर आहे. व्यवहार सगळा खरा आहे. असूं दे, म्हणाले. खर माना. त्याच प्रमाणे आणखी अनिर्वचनीय आहे हाही वाद आहे. सांगता येत नाहीये. समाधी अवस्थेमध्ये जो गेलेला आहे. त्याच्या दृष्टीनं संसार नाही काही नाही. ***अगा जे झालेची नाही। त्याची वार्ता पुससी काही॥*** कुठला तो प्रसंग आणि कुठल काय. त्यांच्या दृष्टीनं काही नाहीच आहे.

तर भगवंतांनी जे भगवद् गीतेच्या दुसऱ्या अध्यायामध्ये सांगितले आहे -

***या निशा सर्व भूतानाम् तस्यां जागर्ति संयमी।***

***यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यते मुनेः॥***

ज्ञानी आणि अज्ञानी ह्यांच्यातला त्यांनी भेद दाखवला आहे. सर्व भूतांच्या दृष्टीनं जी निशा आहे, आत्मस्वरूप म्हणजे अंधार आहे अंधाराला आत्मस्वरूप आम्ही समजतो. नाही आम्हाला आत्मस्वरूप नाही. मनाच्या पलीकडे आम्ही जाऊच शकत नाहीये त्यामुळे सर्व व्यवहार तेवढा खरा आहे आत्मस्वरूप नाहीच आमच्या दृष्टीनं. पण 'तस्यां जागर्ति संयमी'. तो जागा आहे.ज्ञानी महात्मा त्याला आत्मस्वरूप माहीत आहे. आणि 'यस्याम् जाग्रति भूतानि' आम्ही जागे आहोत असं समजतात म्हणाले. जागे असतात असं नाही. जागे आहेत असं आम्ही समजतो, आम्हाला हे सगळ दिसत,हा व्यवहार पहातो; सगळ खरं आहे. 'सा निशा पश्यतो मुनेः' ज्ञानी महात्म्याच्या दृष्टीनं संपूर्ण व्यवहार म्हणजे रात्र आहे. काहीच नाही त्याच्या दृष्टीनं.

तरी ही जी भूमिका ज्ञानी पुरूषाला प्राप्त झालेली आहे त्यामुळे त्या परमात्म स्वरूपाच्या ठिकाणी त्याच चित्त अत्यंत स्थिर झालेल आहे. त्याच्या शक्तीची पूर्ण जाणीव ज्याला झालेली आहे त्याच्या मनामध्ये चिंता वगैरे काहीही राहू शकत नाही. तर ती भगवद् भक्ती कशी असती याच्याबद्दल आचार्य महाराजांची एक कथा सांगून आज आपला समारोप करायचा आहे.

भगवान् शंकराचार्यांचा अवतार केरळ देशात कालडीं गावामध्ये

झालेला आहे. शिवगुरू त्यांचे पिताजी, आर्यांबा त्यांच्या मातेच नांव आहे. दोघांनीही पुष्कळ तपश्चर्या केली. भगवान् शंकर प्रसन्न झाले. आणखी आचार्य महाराजांचा जन्म झाला. तीन चार वर्षे वयाची झाली आहेत. त्यांचे पिताजी शिवगुरू गांवाच्या बाहेर एक देवीच मंदिर होत. तिची पूजा करण्याकरता रोज जात असत. पूजा करून परत यायचे.

एकदा त्यांना कुठं तरी दुसऱ्या गांवाला जाण्याचा प्रसंग आला. त्यांनी आपल्या मुलाला सांगितलं, ''बाळ, उद्या तू जाऊन भगवतीची पूजा करून ये. मला गांवाला जायचय.'' त्यालाही आनंद झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी सर्वही पूजा सामुग्री तयार करून दिली. घेऊन गेलेले आहेत. आता पूजा काय करणार काय. मंत्रपठण वगैरे काही तरी केल. पण साक्षात् भगवती या ठिकाणी आहे ही भावना आहे. काय पाणी घातल असेल, पुसल असेल. गंधबिंध, हळद कुंकू काही तरी लावल असेल. फुलाची माळ घातलेली आहे. निरांजन ओवाळून ठेवलेल आहे. धूप दीप दाखवला आणि दुधाची वाटी पुढं ठेवली आहे.

आणि प्रार्थना सुरू झाली. ''आई साहेब, एवढ दूध घ्या आपण.'' आता आई साहेब दूध घ्या. आम्ही नैवेद्य म्हणजे नैवेद्य दाखवा असाच प्रयोग करतो. आम्ही नैवेद्य दाखिवला असच म्हणतो. खर आहे ते. देवांची नुसत्या पहाण्यानेच तृप्ती होते. तर आमचाही तोच समज आहे. देवाला दाखवायचा नुसता नैवेद्य. इथ तस नाहीये. पूजा करायची म्हणजे आई प्रत्यक्ष याठिकाणी आहे आणि आईनं हे दूध घेतलं म्हणजे बर वाटेल. ''घ्या आईसाहेब दूध घ्या.'' झाली. पांच

मिनिट झाली. काही नाही. तसाचा तसाच दुधाचा प्याला . मग मात्र आता काय करायच? रडायला लागले आचार्य महाराज. तीनं चार वर्षाच वय आहे. काय म्हणाले, ''आईसाहेब ! माझा हातून काही चुकणं शक्य आहे. लहान आहे मी. अज्ञान आहे माझं. आमचे पिताजी रोज तुमची व्यवस्थित पूजा करतात. आज तशी झाली नाही म्हणून ***'कुपुत्रो जायते क्वचिदपि कुमाता न भवति'*** हे आपल सामर्थ्य आहे. आणि अशारीतीनं हे सगळं लक्षात आणून माझी चूक झाली म्हणून आपण दुधच प्यायच नाही अस कसं?''

म्हणजे या ठिकाणी मूर्ती आहे ही भावना नाहीये. साक्षात भगवती आहे. आणि माझ्याकडून काही चूक झाल्यामुळे हे दूध नाही म्हणून रडायला लागले आचार्य महाराज. मग भगवती प्रगट झालेली आहे. आणि ते सगळ दूध प्यायली. आचार्य महाराजांनी पाहिलं. दूधाचा प्याला रिकामा झालेला आहे. जास्तीच रडायला सुरवात केली त्यांनी. देवीनं विचारल, बाळ तू रडायला लागलास म्हणून सगळं दूध तुझ्या सांगण्याप्रमाणे मी प्यायले.आणि आता रडण्याचे कारण काय?

आचार्य म्हणाले, ''मला आत्तापर्यंत वाटत होत माझी आई माझ्यावर फार प्रेम करणारी आहे. रोज पिताजी पूजा करून यायचे. आणि मला ते वाटीतल दूध द्यायचे. मला वाटल माझी आई सगळं दूध पित नाही. माझ्याकरता थोड शिल्लक ठेवते आणि पाठवून देते. आणि आज इतका वेळ थांबलो, रडलो आणि सगळं दूध तुम्ही पिऊन टाकलं !''

आता दुसरं दूध कुठल द्यायच? मग स्तनातल दूध काढल

भगवतीन आणि ते मग त्यांना पाजलं म्हणतात. तो आचार्यांचा श्लोक प्रसिद्ध आहे -

***तव स्तन्यं मन्ये धरणिधरकन्ये हृदयत:***
***पय: पारावार: परिवहति सारस्वत इव।***
***दयावत्या दत्तं द्रविडशिशुरास्वाद्य तव***
***यत्कवीनां प्रौढानामजनि कमनीय: कवयिता ॥***

जगामध्ये जे मोठे मोठे क्रान्तदर्शी महात्मे होऊन गेलेले आहेत त्या सर्वांनीही मान द्यावा असा जो मी झालो, म्हणाले, ह्याला कारण म्हणजे तुझ दूध आहे. हे दूध म्हणजे सारं ज्ञानच मला दुधाच्या रुपाने मला मिळालं. आणि त्यामुळे ही योग्यता माझी आली आहे.

तर ही जी अंत:करणामध्ये भक्ती, ईश्वर प्रसादाने म्हणा पूर्व संस्काराने म्हणां कशाने का असेना मिळालेली असते त्या भक्तीच्या प्रभावाने मूर्तीच्या ठिकाणी साक्षात् उत्कट भावना जर उत्पन्न झाली तर त्यांचही कार्य होऊ शकत. म्हणून शेवटची प्रार्थना भगवती जवळच करायची आहे. तेव्हां 'ईश्वरीं सर्वभूतानां' अस त्या भगवतीचं प्रतिपादन केल आहे. त्या भगवतीची प्रार्थना देवांनी केलेल्या स्तुती मध्ये आलेली आहे -

***या श्री: स्वयं सुकृतिनां भवनेष्वलक्ष्मी: ।***
***पापात्मनां कृतधियं: हृदयेषु बुद्धि: ।***
***श्रद्धा सतां कुलजनप्रभावस्य लज्जा ।***
***तां त्वां नता: स्म परिपालय देवि विश्वम् ॥***

विश्वाचं परिपालन आपणच करु शकता म्हणून प्रार्थना आहे शेवटी. विश्व परिपालन आपण कराव. तर आपण या रूपानं प्रगट झालात

तर विश्वाचं परिपालन होईल अस देव सुचविताहेत. जगामध्ये आपण या पांच रूपांनी प्रगट व्हायला पाहिजे, तर विश्वाचं संरक्षण होईल. कसं तर या ***'श्री: स्वयंसुकृतीनां भवनेषु'*** उत्कृष्ट ज्यांच कर्म आहे, पुण्यशील अशा महात्म्यांच्या घरामध्ये श्री रूपाने आपलं प्राकट्य असाव. ते संपन्न असावे. चांगल कर्म करणारे लोक संपन्न असावेत. ***'अलक्ष्मी: पापात्मनां भवनेषु'*** या रुपाने आणखी आपला आविर्भाव झाला पाहिजे. यात दया वगैरे काही नाहीये बर ! दया कोणावर करायची. लक्ष्मी मिळतीय पण ती राहू दे.

'कृतधियां'... हे तिसरे स्वरूप आपलं विश्वामध्ये असलं पाहिजे. ज्यांनी आपल्या बुद्धीवरती संस्कार चांगले केले आहेत, सगळे दोष बुद्धीमधले घालवलेले आहेत आणि गुणाधान बुद्धीमध्ये व्हाव यासाठी अहर्निश प्रयत्न ज्यांचे चाललेले आहेत; व्यावहारिक, वैय्यक्तिक सुखाकडे ज्यांच बिल्कुल लक्ष नाहीये पण आपल्या बुद्धीच संरक्षण व्हायला पाहिजे, बुद्धी संस्कृत झाली पाहिजे याकरता प्रयत्न करणारे जे लोक आहेत, त्यांच्या करता बुद्धीरूपाने त्यांच्या ठिकाणी आपण प्रगट व्हा. तर त्यांच्या द्वाराने हे कार्य होईल. हे तिसर रूप आपलं जगा मध्ये असलं पाहिजे.

'श्रद्धा सतां' म्हटलेल आहे. 'असतां श्रद्धा' ती वेगळी असती. नैय्यायिकांनी वेद हे ईश्वराने निर्माण केले असा एक सिद्धांत मांडला. ईश्वराचं वाक्य आहे म्हणून वेद प्रमाण आहे. ईश्वर सर्वज्ञ आहे. आणि त्याने हे वेद केलेले आहेत. लगेच दुसरे म्हणायला लागले, आमचाही हा जो उपदेष्टा आहे हाही सर्वज्ञ आहे. त्याने उच्चारलेल वाक्य का प्रमाण होऊ नये? नैय्यायिकांना गप्प बसाव लागल. तो सर्वज्ञ नाही

हा सर्वज्ञ आहे हे सिद्ध कसं करणार? म्हणून त्यांच प्रामाण्य आणखी स्वतंत्र्य आहे. कोणीतरी उच्चारल म्हणून वेद प्रमाण नाहीये. जगामध्ये सर्वज्ञ कोणीही असू शकत नाही. एवढाच सिद्धान्त त्यांनी सांगून दिला. म्हणजे वादच संपला.

ह्यांनी सांगायच ईश्वर सर्वज्ञ आहे. त्यांनी म्हणायचं आमचाही उपदेष्टा सर्वज्ञ आहे. हा वाद संपायचा केव्हां? म्हणून हा सिद्धान्त मीमांसकारांना मांडावा लागला. पुरूषांचे दोष त्या वेदांमध्ये येऊ शकत नाहीत. म्हणून वेदवाणी हे प्रमाण निर्दोष आहे. हे शब्द प्रामाण्य त्याच सिद्ध केल आहे.

म्हणून कुमार भट्टांनीसुद्धा शंकराचार्य महाराज त्यांना भेटायला गेले असताना त्यांनी कुशाग्री प्रवेश केला होता म्हणतात. धर्मशास्त्र नुसत सांगण्याकरता नाहीये. नुसत आमच्या हातून एवढ्या चुका झाल्या अस व्याख्यानातून सांगण म्हणजे दोष जात नाही. तर त्यांनी स्वत: आणखी कुशाग्री मध्ये प्रवेश केला. आचार्य म्हणाले, वेदमार्गाची स्थापना आपल्या हातून झाली आणि आपण कुशाग्री मध्ये प्रवेश केला आपल्या हातून असा काय दोष घडला?

त्यांनी सांगितल माझ्या हातून दोन दोष घडलेत म्हणाले. श्रुतीप्रमाणाने ईश्वर सिद्ध आहेत. आणि संत महात्मे त्यांचे जे अनुयायी आहेत पूर्व संस्कार, भक्ती संस्कार ज्यांच्या अंत:करणामध्ये आहेत, त्या वेद प्रमाणाने सुद्धा ईश्वरसिद्ध आहे त्याचा मी निरास केला आहे माझ्या शास्त्रामध्ये. ते का तर श्रुती ही सत: प्रमाण आहे हे सिद्ध करायच होत त्या करता मी केलं असं. सर्वज्ञ जगामध्ये कोणीही असू शकत नाही हे मला सिद्ध कराव लागल. हेतु चांगला असला

तरी घडलेल कर्म सदोष झाल आहे.

हा एक दोष. आणि दूसरा दोष म्हणजे बुद्धांच्या आश्रमामध्ये राहून त्यांचे काय विचार आहेत त्या सगळ्याचा मी अभ्यास केला. आणि अभ्यास करून शेवटी त्यांच खंडन केलं. आणि त्यांना या भारतातून बाहेर घालवून दिल म्हणाले. ज्या गुरूपासून एक अक्षर जरी मिळाल तरी त्या गुरूचा द्रोह घडू नये, त्याच्या बद्दल अनादर मनामध्ये येऊ नये अस म्हणतात त्या गुरूंना खंडन करून मी भारता बाहेर घालवून दिल. म्हणजे ईश्वरद्रोह आणि गुरूद्रोह. हेतु चांगला होता. श्रुतींच प्रामाण्य सिद्ध करण्याकरता हे केलेल आहे. पण मी निर्दोष आहे अस भट्टपादांनी कधीच म्हटल नाही. ईश्वर मान्य आहे.

परंतु वेदप्रामाण्य सिद्ध करण्याकरता त्यांनी अस सांगितलं. तर ही श्रद्धा जी आहे ही खरी श्रद्धा आहे. वेदप्रामाण्य मी सिद्ध केल आहे अर्थात मी निर्दोष आहे, अस सांगितलं की ईश्वरद्रोह आणि गुरूद्रोह मोठा दोष आहे. त्याकरता वेदांप्रमाणे वागल पाहिजे ही मोठी श्रद्धा आहे.

श्रद्धा सतां अशा सज्जनांच्या अंत:करणामध्ये अशा दृढश्रद्धारूपाने आपलं वास्तव्य असाव अशी भगवतीची प्रार्थना आहे.

***'कुलजन: प्रभवस्य लज्जा'***

उत्तम कुलात उत्पन्न झालेला जो आहे त्याच्या मनामध्ये लज्जा उत्पन्न झाली पाहिजे. अकार्याबद्दल लज्जा उत्पन्न झाली म्हणजे अकार्य थांबत निदान. घडेल एखादे वेळेला नाही अस नाही, संगती दोषामुळे. परंतु लज्जेमुळे, ''हे काय झालेल आहे ! श्रेष्ठ पुरूष, मानी महात्मे काय म्हणतील मला?'' अस मनाला वाटून कोणाच्या

कुळामध्ये मी आलेलो आहे? कोणच्या देशात जन्म झालेला आहे? आणि मी कोणच्या मार्गाला लागलेलो आहे? ही लज्जा मनातून गेल्यानंतर शासन कायद्यानेसुद्धा मनाची सुधारणा करू शकत नाहीये. म्हणून या लज्जेने आपल्याला पश्चाताप होण्याचा संभव आहे. आणि त्यामुळे अकार्यापासून निवृत्ती होण शक्य आहे. म्हणून भगवतीची प्रार्थना देव करताहेत- कुलजन: प्रभवस्य लज्जा या रुपानेही आपल वास्तव्य जगामध्ये असाव.

अशा पांच रूपानं आपण जगामध्ये रहाव म्हणजे संपूर्ण विश्वाचं परिपालन होईल म्हणून ही प्रार्थना त्यांनी केली आहे.

***या श्री: स्वयं सुकृतिनां भवनेष्वलक्ष्मी:***
***पापात्मनां कृतधियां हृदयेषु बुद्धि: ।***
***श्रद्धा सतां कलजनप्रभवस्य लज्जा***
***तां त्वां नता: स्म परिपालय देवि विश्वम् ॥***

तेव्हां अशा दृष्टीनं 'कृतधियां हृदयेषु बुद्धि:' म्हणून प्रार्थना भगवतीची केली आहे देवांनी.

ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या ज्ञानेश्वरीच्या शेवटी जो बुद्धिविकास सांगितलेला आहे - ते पसायदान म्हणजे बुद्धिविकास आहे. बुद्धी कशी झाली पाहिजे, राष्ट्राला सुद्धा हितकारक असं त्याच्यामध्ये सगळं वर्णन केलेलं आहे. हा बुद्धी विकास आमच्या भारत राष्ट्रामध्ये मुख्य, प्रधान आहे. प्राचीन काळापासून सर्वही मोठ्या मोठ्या ज्ञानी महात्म्यांनी ह्या बुद्धिविकासावर भर दिलेला आहे. विवेक त्याच प्रमाणे वैराग्य हे जे मोठे मोठे गुण आहेत, बौद्धिक गुणच आहेत. त्याग आहे.

कवी कुलगुरूंनी एका नाटकाच्या आरंभी जो श्लोक लिहिलेला आहे त्यामध्ये भगवान् शंकरांच स्वरूप वर्णन केलेल आहे -

***एकैश्वर्य स्थितोपि प्रणत बहुफले***

***तस्य यन् स्वयं कृत्तिवासा:***

संपूर्ण ऐश्वर्य, नियामक शक्ती इतकी आहे की कोणी काही मागायला आला तर वाटेल तितके देण्याची शक्ती आहे. पण स्वत: मात्र त्याचा उपभोग घेत नाहीत. भोगबुद्धी नाहीये. द्याव दुसऱ्याला. त्याग बुद्धी आहे.

दुसरं आणखी भगवंताच वैशिष्ट्य सांगताहेत कालीदास -

***'कान्ता संमिश्र देहोपि मनसा'***

भारतीय संस्कृतीच स्वरूपच कालीदासांनी या श्लोकात मांडलेले आहे. शंकरांच्या वर्णनाच्या रुपाने, ***''कांता संमिश्र देहाय''*** भगवान शंकरांच स्वरूप म्हणजे ***''अर्धांगी कृत दांपत्यम् अति गाढा''*** दांपत्यामध्ये गाढ रागानुराग असावा, नाही असं नाही. कालीदासांना ते मान्य नाहीये. पण नुसत बरोबर जाणं येणं हा गाढानुराग नाही. 'अर्धांगी कृत दांपत्यम्' आपल्या शरीराच्या अर्ध भागावर पार्वतीचा निवास असताना सुद्धा आणखी ***अविषय मनसाम् य: परस्तां यतिनाम्*** म्हणतात. मनाचा निग्रह करणारे जे मोठे मोठे महात्मे त्यांचे अग्रगण्य भगवान शंकर आहेत.

तिसरं सांगताहेत. भारताची संस्कृती संयम प्रधान आहे. संयम हे भारताच्या संस्कृतीचे मुख्य स्वरूप आहे. त्याच प्रमाणे त्याग हे स्वरूप आहे. भोग हे स्वरूप नाहीये. तिसरं भगवंतांच वर्णन करताहेत-

***'अष्टांग'***

आपल्या अष्टकरूंनी भगवान् शंकर जगाच संरक्षण करताहेत. शंकर हे संहार देवता आहेत अशीच पुष्कळ कल्पना आपल्याला आहे. पण शंकर हे जगाचे संरक्षक देवता आहेत. पंचमहाभूत, सूर्य, चंद्र आणि दीक्षित जो आहे अग्नीहोत्री या आठ करुंनी विश्वाचं संरक्षण करण्याच कार्य अखंड चाललेल आहे. परंतु मी संरक्षणकर्ता आहे असा अभिमान उत्पन्न होऊन केलेल संरक्षण म्हणजे केवळ हुकुमशाही आहे. आणि आपल संरक्षण कार्य चालू असतानासुद्धा मी करतो अस काहीही न म्हणण म्हणजे हे खरं सरंक्षण आहे. हे खरं नेतृत्व आहे.

म्हणजे अशा रीतीने निरभिमान कार्य कर्तृत्व कर्मयोग, पूर्ण संयम आणि पूर्ण त्याग अशी ही मूर्ती शंकरांची आहे त्याची प्रार्थना कविकुलगुरू करताहेत

***'सन्मार्ग आलोचनाय तामसी वृत्ति'***

सन्मार्गाचा विचार करण्याची योग्यता येण्याकरता अशा या भगवंतांनी आमची तामसी वृत्ती दूर करावी. मग आम्ही सन्मार्गाचा विचार करण्यास सुरवात करू. विचार केल्यानंतर आचरण फार दूर आहे. आणि आचरण केल्या नंतर ती शेवटची भूमिका- वासुदेवः सर्वम्-ही प्राप्त होण किती तरी दूर आहे. अशी प्रार्थना त्यांनी केलेली आहे.

आपल्या भारतामध्ये बुद्धिविकासाच कार्य ईश्वराच्या कृपेने होत रहाव एवढीच प्रार्थना करून आता समारोप करतो.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरूदेव दत्त ॥**

अहमदाबाद.

॥ श्रीगणेशदत्त गुरुभ्यो नमः ॥

*नमोस्तु ते महादेवि शिवे कल्याणि शांभवि ।*
*प्रसीद वेदविनुते जगदंब नमोस्तु ते ॥*
*जगतामातादिभूता त्वं जगत्वं जगदाश्रया ।*
*एकाप्यनेकरूपासि जगदंब नमोऽस्तु ते ॥*

कालपासून भागवत आणि भगवद् गीतेमधले ईश्वररूप यावर विचार चालू आहे. काही काहीच भागाचा विचार करता येण्यासारखा आहे. भगवद् गीतेमध्ये सांगणारेच प्रत्यक्ष भगवान् आहेत. ईश्वरच आहेत. आणि त्या ईश्वरभावातून ती भगवद्गीता सांगितलेली आहे. अर्जुनाबरोबर बोलण चालण सगळे व्यवहार करणं. इतर देवांच्या प्रमाण कार्य जरी केलं असत तरी त्यांचा ईश्वरभाव जो आहे पूर्णावतार म्हणतात. तर त्यांच्या ईश्वरभावाची जाणीव असणारी मंडळी फार थोडी आहेत.

उद्धवजींनी विदुरांची भेट झाली असताना खेद व्यक्त केलेला आहे. कारण ते म्हणाले, हे सगळेही जीव दुर्दैवी आहेत. त्यातल्या त्यात यादवांच दुर्दैव तर फारच आहे. कारण नेहमी भगवान् गोपालकृष्णांच्या बरोबर राहात असूनसुद्धा कृष्णस्वरूप त्यांना कळून आलेल नाही. ईश्वर प्रत्यक्ष दिसत नाही म्हणून नाही. ईश्वराचं अस्तित्वच नाही, अस आपण समजतो. पण श्रीकृष्णरुपाने भगवान स्वत: ईश्वर प्रत्यक्ष दिसत असूनसुद्धा त्याचे अस्तित्व मानणारे त्यावेळी किती होते?

धर्मराजाच्या आज्ञेप्रमाणे श्रीकृष्ण शिष्टाईसाठी आले असताना दुर्योधनाने त्यांना कैद करण्याचा कट केला होता, असे सांगतात.

तो त्यांना कैद करू शकला नाही ही गोष्ट निराळी. म्हणजे यादवांची श्रीकृष्ण स्वरूपाबद्दलची कल्पना म्हणजे श्रीकृष्ण आमच्यातला एक मोठा पुढारी आहे, मुत्सद्दी आहे, पराक्रमी आहे. एवढीच कल्पना आहे. त्यामुळे त्यांच्यावर प्रेम करत असतील. पण उद्धवजींच्या प्रमाणे त्यांच्या खऱ्या ईश्वरस्वरुपाची कल्पना भीष्माचार्यांसारख्या फारच थोड्या संपन्न मंडळींना होती. म्हणून तर त्यांना म्हणावं लागलं, सर्वांना मार्गदर्शन करावं म्हणून मनुष्यजन्म घेऊन आलो. सर्वांची कार्य करण्याकरता आलो, परंतु हे मुढ लोक माझा अवमान करताहेत. म्हणजे हा त्यांचा अविवेक आहे एवढच त्यांनी सांगितलं. मराठीत मूढ शब्द वेगळ्या अर्थाने वापरतात. 'मूढः अविवेकः' अविवेक अशा अर्थाने वापरतात.

तर त्यांनासुद्धा असं म्हणण्याची पाळी आली. तेव्हां प्रत्यक्ष ईश्वरस्वरूप समजलं किंवा दिसलं म्हणजे ईश्वर आहे अशी भावना झाली की ईश्वरप्रामाण्य मानल जाईल हे काही खरं नाही. वादविवाद करायचा चर्चेमध्ये. प्रत्यक्ष प्रमाण नाही म्हणून नाही. पण बाकीची प्रमाण म्हणून जी मान्य केलेली आहेत, त्या प्रमाणांनी सिद्ध होणारं ईश्वरस्वरूप आहे. फक्त ते प्रत्यक्ष का नाही याचा विचार करायचाय.

दुधामध्ये साखर घातली आणि ती विरघळून गेल्यामुळे दिसत नाहीये. प्रत्यक्ष प्रमाणामध्ये सर्वच इंद्रिय आहेत. त्यात जर आपण डोळ्याला प्राधान्य दिल, डोळ्यांनी साखर दिसत नाही म्हणून जर साखर नाही असं म्हणून जर लहान मुलगा रडायला लागला तर काय करायच त्या वेळेला? त्याला ते दूध चमच्याने पाजलं पाहिजे. म्हणजे दुसऱ्या ज्ञानेंद्रियाने त्याचे अस्तित्व सिद्ध होत. ते प्रत्यक्ष

प्रमाण आहे. आणि ईश्वराचं प्रत्यक्ष प्रमाण जाणून घेण्यासाठी अंत:करण हे घेतलेले आहे. तर त्या अंत:करणाने ईश्वराचं स्वरूप जाणता येत, असा सिद्धान्त शास्त्रकारांनी सांगितलेला आहे. पण ते निर्मल झालं पाहिजे.

बुद्धी निराळी आहे. ईश्वरस्वरूप जाणून घेणारी बुद्धी निराळी आहे. बुद्धिवादाने आपण समजतो, आमच्या बुद्धीला ते आणखी पटत नाही. अनुभव नाहीये. परंतु तो अनुभव नाही म्हणून ते ईश्वरतत्वच नाही असं जर कोणी सांगायला लागल तर ! पण बुद्धीमध्ये काही दोष असतील आणि त्या दोषांमुळे ते आपल्याला दिसत नसेल असा विचारही आमच्या मनांत येत नाही. शास्त्रकारांना बुद्धिवाद मान्य नाही असं नाही. सर्वही बुद्धीनं समजून येत. सांख्यकारांनी बुद्धीचं फार मोठ महत्व वर्णन केलेल आहे.

***सर्वं प्रत्युपभोगं पुरूषस्य साधयति बुद्धि: ।***
***सैवच विशिनष्टि पुन: प्रधानपुरूषान्तरं सुक्ष्मम् ॥***

भोग आणि अपवर्ग दोन्हीही प्राप्त करुन देण्याच सामर्थ्य बुद्धीमध्ये आहे, म्हणून सर्वही करणामध्ये बुद्धितत्व अत्यंत श्रेष्ठ आहे सांख्य शास्त्रकार सांगतात. भोग घेण्यालाही बुद्धीचं सामर्थ्य लागत केवळ इंद्रिय कारण नाहीत. निर्णय झाल्याशिवाय भोग घेऊ शकत नाही. आणि अपवर्गाकरता तर प्रधानपुरूषाच भेद ज्ञान व्हायला पाहिजे. ते भेदज्ञानही केवळ बुद्धीनच होण शक्य आहे. म्हणून बुद्धितत्व हे अत्यंत श्रेष्ठ आहे अस सांख्य शास्त्रकारांचही सांगण आहे.

त्याचप्रमाणे योगशास्त्रकारांच्याही मते सर्वसिद्धी म्हणजे बुद्धितत्वाचाच विकास आहे. बुद्धीचं सात्विक स्वरूप म्हणजे सगळ्या

सिद्धी आहेत. धर्म, अर्थ, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य हे सगळं आणखी बुद्धीच स्वरूप मानलय. त्या बुद्धीनच सर्व निर्णय करता येतो आहे. कृती प्रत्यक्ष बुद्धीनच होऊ शकते आहे. याप्रमाणे सर्व शास्त्रकारांना बुद्धी आणि बुद्धिवाद मान्य आहे.

परंतु ती बुद्धी संस्कृत असली पाहिजे, संस्कृत केली पाहिजे एवढच त्यांच म्हणण आहे. संस्कार शब्दाचा अर्थ जो आचार्य महाराजांनी सांगितला आहे - दोष दूर करण हा एक संस्कार शब्दाचा अर्थ आहे. आणि बुद्धीमध्ये गुणाधान झाला पाहिजे, एवढच म्हणणं आहे. दुसर काही नाही. निर्दोष बुद्धी व्हावी आणि गुणसंपन्न व्हावी. त्या बुद्धितत्वाने आत्मस्वरूपाचसुद्धा ज्ञान करून घेता येण शक्य आहे. बाकी कोणच्याही कारणाने ईश्वरस्वरूपाचं ज्ञान होणार नाही अस ते सांगताहेत. अनुमानप्रमाणे ईश्वरसिद्धी तार्किकांनी केलेली आहे परंतु अनुमानप्रमाण दुसऱ्याही प्रकारच असू शकत.

अनुमान करणारे कुशल लोक जे आहेत त्यांनी एखाद्या पद्धतीने ईश्वराचे अस्तित्व सिद्ध केल तर दुसरेही तार्किक आहेत की ते ईश्वर नाही असं सिद्ध करू शकतात. म्हणून केवळ अनुमान प्रमाणाने ईश्वरसिद्धी होऊ शकत नाही. आचार्य महाराजांची तर्काला मान्यता आहे पण श्रुतिसंमत जर तर्क असेल तर तो तर्क अस्थिर अशा प्रकारचा असू शकत नाही. त्याला श्रुतिप्रमाणाच सहाय्य असल्यामुळे तो अस्थिर असू शकत नाही.

तर केवळ तर्कप्रमाण किंवा अनुमान प्रमाणाने ईश्वरसिद्धी करता येत नाही. म्हणून शब्दप्रमाण हे ईश्वरसिद्धीचे मुख्य प्रमाण मानल गेल आहे. तेव्हां भगवद् गीता किंवा भागवत दोन्हीही शब्दप्रमाण ग्रंथ

आहेत. प्रत्यक्ष भगवंताने सांगितले आहेत. त्यामुळे ती ईश्वरसिद्धी तर्कानुकूल कशी आहे, तर्क सिद्ध कशी आहे हे जाणून नंतर तर्काचा विचार करायचा आहे. शब्दप्रमाणाने सिद्ध झालेल्या ईश्वरतत्वाबद्दल तर्काचा उपयोग होऊ शकतो. नाही अस नाही.

तर केवळ तर्क हा अस्थिर आहे हा तर्काचा दोष भाष्यकारांनी, सूत्रकारांनी सांगितलेला आहे. तेव्हां भगवद् गीतेमध्ये ईश्वरभाव व्यक्त करणारी मध्ये मध्ये काही उदाहरणे आहेत. काल आपण सहज पाहिल, ''सूर्यनारायणाला उपदेश केला पूर्वी आणि तोच योग तुला सांगतो'' असे म्हणून गेले भगवान्. आता सूर्यनारायणाला ह्यांनी उपदेश कसा केला? प्रत्यक्षप्रमाणाने श्रीकृष्णांच स्वरूप हे सूर्यनारायणाला उपदेश करण्यासारखं नाही, असं अर्जुनाला वाटल ते बरोबरच आहे. आणि कोणालाही असं वाटण स्वाभाविक आहे. पण ज्यावेळी त्यांनी ज्याचा खुलासा पुढं केलेला आहे, अर्जुनाला जरास स्पष्ट करून सांगितल त्यांनी की हे सगळं मला माहिती आहे. तुझा जन्म, माझा जन्म, सगळ्यांचे जन्म मला माहिती आहेत. अर्थात् सूर्यनारायणाला उपदेश मीच केला आहे.

तर अशा काही उदाहरणावरून त्या ईश्वरतत्वासंबंधी उल्लेख भगवद्गीतेमध्ये सापडू शकतो. पांचव्या अध्यायाच्या शेवटी, सहाव्या अध्यायामध्ये जो ध्यानयोग सांगायचा आहे त्याला आरंभी उपक्रम जोडून तीन श्लोक पांचव्या अध्यायाच्या शेवटी सांगितले आहेत.

***स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः ।***
***प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ॥५.२७॥***

सगळा योग अगदी थोडक्यात सांगितलेला आहे.

***यतेंद्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायण:***

***विगतेच्छाभयक्रोधो य: सदा मुक्त एव स: ॥ ५.२८ ॥***

शेवटी सांगताहेत असा सगळा योगाभ्यास झाल्यानंतर त्याला ईश्वरस्वरूपाचं ज्ञान होतं ते ईश्वरस्वरूप कसं आहे?

***भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।***

***सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ॥ ५.२९ ॥***

आता हे अवतार पुराणादिकांमध्ये वर्णन केलेले आहेत. ते सगळेही सावर्ण अवतार आहेत. त्या अवतारामध्येही ईश्वरभाव अभिव्यक्त झालेला आहे. विभूती अध्यायामध्ये तेच सर्व वर्णन केलेलं आहे. पण या ठिकाणी ***''ज्ञात्वा मां शांतिमृच्छति''*** हे त्याच फल सांगितल आहे. माझ ज्ञान म्हणजे कसं झाल पाहिजे तर ***''भोक्तारं यज्ञतपसां!''*** ईश्वर हा सर्व कर्मांचा भोक्ता आहे. प्रत्येक कर्माची देवता म्हणूनही तो आहे. आणि सर्व कर्तृत्वही त्याच आहे हे मुद्दाम सांगितल आहे. 'ममैवंशो जीवलोके' या दृष्टीनं 'धि' कर्ता आहे. परंतु ते सुद्धा गौण कर्तृत्व आहे. ***मत्त: सर्वम् प्रवक्तते*** असा एक उल्लेख भगवद् गीतेमध्ये भगवान् करताहेत.

तर या दृष्टीनं सर्वही कर्तृत्व ईश्वराचं असल्यामुळे प्रयोजक परमात्मा आहे म्हणून सगळी कार्य चाललेली आहे. तोच सगळ्या यज्ञांचा, कर्मांचा, तपांचा भोक्ता आहे. कर्मयोगाचं या ठिकाणी प्रतिपादन केलेल आहे. कर्मयोगामध्ये सर्वही कर्मांचा कर्ता म्हणून भोक्ताही तोच आहे. प्रेरक असल्यामुळे कर्तृत्व त्याच मानलेल आहे. आणि कर्तृत्व असल्यामुळे भोक्तृत्वही त्याच्याकडे आहे.

व्याकरणशास्त्राच्या दृष्टीन कदाचित कर्ता जो आहे तो

क्रियाफलभागी होऊ शकत नाही. फल हे सगळही कर्मनिष्ठ असत. आणि फक्त क्रियाश्रेयत्व त्याच्याकडे असल्यामुळे कर्मफलाचा संबंध कर्त्याच्या ठिकाणी असू शकत नाही. असा एक विचार आहे.

परंतु ज्या ठिकाणी व्यापारजन्य जे फल आहे ते विधिष्ठ व्यापारात मानाव लागत. उदाहरणार्थ ''ग्रामं गच्छति'' या ठिकाणी गमन क्रिया म्हणजे काय आहे? ''उत्तरदेश संयोगानुकूल व्यापार:'' व्यापार: हा गमन क्रियेचा अर्थ करतात. गांव आणि पुरूष यांचा संयोग हे जे फल आहे व्यापारच, हे केवळ ग्रामनिष्ठ कसं मानता येईल? त्या पुरूषालाही फलात्ययत्वं मानावे लागेल मग ही व्याख्या कशी बरोबर आहे? फलात्ययत्वं कर्त्यालाही धरलेल आहे या ठिकाणी. मग काही तरी त्या व्याख्येमध्ये कर्मभिन्नत्व वगैरे काहीतरी सुधारणा करावी लागेल कर्माच लक्षण करताना. अशी काही काही उदाहरण आहेत.

तेव्हां प्रवत्तिन जी क्रिया आहे प्रवृत्ती, अंत:करण धर्म म्हणा किंवा तार्किकांच्या दृष्टीन प्रवृत्ती हा आत्मगुरू मानलेला आहे. ती प्रवृत्ती कशाने होते? त्याच प्रतिपादन करीत असताना नैय्यायिकांनी सांगितलेल आहे - प्रवृत्ती केव्हां होते? तर त्या प्रवृत्तीला कारणं इतकी त्यांनी मानली आहेत - करण्याची इच्छा पाहिजे, त्यांच्यानंतर इष्टसाधनत्व आणि कृती साधत्व बुद्धी पाहिजे. ***कृतिसाध्यत्व चंद्रमंडला नयनांत कर्तव्यसिद्धी:*** ही प्रवृत्ती होणच शक्य नाही कारण कृतीसाध्यच नाही ना ते. चांगल आहे चंद्रमंडल आणण पण तिकडे प्रवृत्ती का होत नाही? तर कृतीसाधत्व त्या ठिकाणी नाही. असाध्य आहे म्हणून कृतीसाध्यत्व ज्ञान त्याच्याबरोबर इष्टसाधनत्व

ज्ञानाची आवश्यकता मानली आहे. कार्याची इच्छा पाहिजे आणि उपादानाचं प्रत्यक्ष ज्ञान पाहिजे. कर्त्याच लक्षण करताना सुद्धा त्यांनी त्याच्यामध्ये हे सगळं घातलेल आहे.

तर कर्तृत्व ही जी व्याख्या नैय्ययिकांनी केलेली आहे त्याच्यामध्ये अपरोक्ष ज्ञान पाहिजे, कृतीची इच्छा पाहिजे, कृती पाहिजे किंवा ही तीन कारणं सांगितली आहेत त्या ठिकाणी इष्ट साधनत्वाच ज्ञान पाहिजे. प्रयोजन 'मनुद्दिश्य न मंयोपि प्रवर्तते' हे जे, त्याप्रमाणेच इथ सुद्धा त्यांनी प्रवृत्तीं क्रिया जर व्हायची असेल तर त्या क्रियेला इष्टसाधनत्व बुद्धी पाहिजे. म्हणजे कर्त्याला इष्ट जे आहे, कृतीचा अभिमान जो आहे त्याला इष्ट जी क्रिया आहे, त्याला जे फल इष्ट आहे, त्याच जे साधन आहे, तरच सगळी क्रिया होणार आहे त्याची प्रवृत्ती होणार आहे.

म्हणून शास्त्रीय जे काही 'यजेनेय सर्व कामा: यजेकम्' तर भोक्ता हा आहे त्यानेच तो याग करायचा. या दृष्टीनं कर्तृत्व भोक्तृत्वाच सामान्याधिकरण हे प्रधान मानल गेलेल आहे. काही काही क्रियांच फल कदाचित् नसेल. त्यातही विचार केल्यानंतर प्राप्त होऊ शकेल. म्हणून कर्मयोग करीत असताना त्या कर्मयोगाला भोक्तृत्व हे बाधक नाहीये. कर्तृत्व हे जिथे बाधा नाहीये तिथे भोक्तृत्व हे बाधा कस असणार? म्हणून भोक्तृत्व परमेश्वराचं आहे. याचा अर्थ सर्व कर्म जर ईश्वरार्पण जर केली तर तीच कर्म सिद्धसिद्धीरूप, फलरूप होऊ शकतात हे मुद्दाम त्यांनी सांगितलेल आहे.

***स्वधर्मे प्रवृत्तानामपिर्तधा: वाङ्मनकथानां प्रवृत्ति: ।***
***फलाभिसंधिपूर्विका सांहकाराच भवति ॥***

आचार्य महाराजांनी जे विवेचन केलेल आहे. स्वधर्म प्रवृत्त झालं तरी, कर्मयोगाच आचरण करणारे लोक जरी असले तरी त्यांची प्रवृत्ती ही फलाभिमानपूर्वक आणि अहंकारपूर्वक असते तर, कर्तृत्वाभिमान आणि फलाभिसंधि यामुळे होणारी प्रवृत्ती ही कर्मसिद्धीला कारण होऊ शकत नाही. म्हणून 'भोक्तारं यज्ञतपसां' ही वृत्ती जर उत्पन्न झाली, यारूपाने जर ईश्वराचं ज्ञान झालं म्हणजेच सगळं कर्म ईश्वराला समर्पण झालं, म्हणजे शांती मिळती. कर्मयोगा संबंधी हा एक विशेष उल्लेख ''भोक्तारं यज्ञतपसा'' या रूपाने भगवान करतात.

त्याच्या नंतर ''सर्वलोकमहेश्वरम्'' हे एक स्वरूप सांगताहेत. ईश्वर हा कसा आहे? ''सर्व लोकमहेश्वरम्'' मोठ्या मोठ्या ब्रम्हदेवासारख्यांचा तो नियामक आहे. ''मत्तस्मृर्तिज्ञानमोहनं च'' ही जी शक्ती पुढं सांगितली आहे भगवंतांनी, त्याप्रमाणे सर्वांचा तो नियामक आहे.

महाभारतामध्ये जी कथा आलेली आहे - कर्ण आणि अर्जुन यांच पहिल्यापासून वैर आहे. निदान कर्ण तरी वैर करत होता. आणि अर्जुनाचा संहार करण्यासाठी कर्णच समर्थ आहे अशा समजूतीनं दुर्योधनाने पहिल्यापासून त्याच्याशी मैत्री ठेवली. आता भीष्माचार्यांच दहा दिवस सेनापत्य झाले. नंतर द्रोणाचार्य पांच दिवस सेनापती झाले.पुढे कर्ण सेनापती झाला. आणि कर्णार्जुनाचं युद्ध प्रसंगात झालं. पुन्हा आणखी दोघे बाजूला निघून गेले. कर्णाने ज्या वेळेला आपलं कवच कुंडल दान केलं, त्यावेळेला सूर्यनारायणाने त्याला सांगितल होतं तू देऊ नकोस. तो म्हणाला, अतिथीला मी नाही देत आहे असे

कसे म्हणू. मग सूर्यनारायण म्हणाले, त्याच्याकडून तू शक्ती तरी मागून घे. मग कर्णाला त्यान ती वासवी शक्ती दिली. एक कोणी तरी वीर या शक्तीनं मरेल. आता ती शक्ती अर्जुनाकरताच त्यानं ठेवली आहे. अर्जुन समोर युद्धाकरता आलेला आहे त्यावेळेला त्याने त्या शक्तीचा प्रयोग केला नाही. संध्याकाळी दुर्योधन भेटल्यावर तो म्हणाला, अर्जुन आज युद्धात तुझ्यासमोर आला असता त्याच्यावर त्या वासवी शक्तीचा प्रयोग करून त्याला मारल का नाहीस तू? कर्ण म्हणाला अरेरे, विसरलो मी. हे विसरण शक्य नव्हतं. किती दिवसांच त्यांच वैर होत. ती शक्ती अर्जुनाकरता मागून घेतलेली होती. म्हणजे विसरणसुद्धा प्रयत्न साध्य नाही. प्रयत्नांनी स्मरण वगैरे तर बाजूलाच राहू द्या. नेहमी अर्जुनाची मूर्ती डोळ्यासमोर आहे (अर्थात् वैरबुद्धीने) तो विसरला कसा?

म्हणजे यावरूनही नियामकशक्ती म्हणून काही तरी मानावी लागती असं म्हणता येईल. दुर्योधनाला, पुढे दुसऱ्या दिवशी मारतो वगैरे म्हणाला तो. त्याप्रमाणे शेवटी ती घटोत्कचावरच वापरली गेली. श्रीकृष्णांच्या योगाने ते सर्व झालं. अर्जुन त्याच्यातून मोकळा झालेला आहे. पण लोकमहेश्वरत्व म्हणून जे सांगितलेल आहे ते अशा प्रकारे या गोष्टीवरून व्यक्त होत. हा एक प्रकार. म्हणजे सर्वांची नियामक शक्ती म्हणजे ईश्वर शक्ती. हे एक ईश्वरस्वरूप झालं.

आणि शेवटी ''सुहृदम् सर्वभूतानां'' सर्व भक्तियोग त्याच्यामध्ये आलेला आहे. सर्वांच आणि सुहृद आहे त्याला. म्हणजे ''लोकमहेश्वरत्व'' तर आहेच पण ''सुहृदम् सर्व भूतानां'' हे ईश्वराचं स्वरूप आहे. त्याची व्याख्या आचार्य महाराजांनी केलेली आहे.

***''सुहृदं सर्वभूतानां सर्वप्राणिनां***
***प्रत्युपकारनिरपेक्षतया उपकारिणम् ।''***

ईश्वराला प्रत्युपकाराची अपेक्षा नाहीये.भक्ताचं कार्य करणं; भक्त आर्त आहे, जिज्ञासू आहे, अर्थार्थी आहे, ज्ञानी आहेत; सर्वही भक्तांना जे जे अपेक्षित आहे ते पूर्ण करणं हे कार्य अखंड चाललेल आहे. तरीसुद्धा काही अपेक्षा नाही. ***''प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणम्''***हे स्वरूप आत्यंतिक अस पहायच असेल तर ईश्वराचे स्वरूप आहे.

ही एक जाणीव करून दिली भगवंतांनी स्वत: आणि भक्तियोग प्रगट करून वात्सल्य जे आहे परमेश्वराचे ते व्यक्त केलं आहे. तर अशा रूपानी ईश्वरस्वरूपाचं ज्ञान ज्याला झालेलं आहे त्या ज्ञानानी तो ***''ज्ञात्वा मां शांतिमृच्छति''***मुक्ती म्हणा; हे बाहेर जे वर्णन केलेलं आहे पुराणादिकामध्ये त्याच्यापेक्षा व्यापक अशा प्रकारच मोठ स्वरूप आहे.

अंतर्यामी स्वरूपाच वर्णन जे बृहदारण्यक उपनिषदामध्ये केलेल आहे म्हणजे खरं ईश्वराचं स्वरूप अंतर्यामीरूप आहे. सर्वांच्या आत राहून सर्वांच नियमन करणारी शक्ती म्हणजे ईश्वर शक्ती. असं उपनिषदामध्ये वर्णन केलेल आहे. आपल्या आईचा उद्धार करण्याकरता आचार्य महाराजांनी कृष्णाष्टक जे केलेल आहे - आई अगदी आजारी पडली म्हणतात, आईला वचन दिल होत की तू ज्या वेळेला स्मरण करशील त्यावेळेला मी येईन. मृत्युच्यावेळेला तिनं आपल्या मुलाचं स्मरण केल्याबरोबर आचार्य महाराज तिथ येऊन प्रगट झाले. त्या वेळी त्यांना वाटल आपल्या आईला शंकरांच्या

संनिध कैलास पर्वतावर पाठवाव म्हणून शंकरांची स्तुती त्यांनी अगोदर केलेली आहे. शंकरांचे सगळे गण आलेले आहेत. ते पाहिल्या बरोबर आईने सांगितल, ''नको, नको, बाबा. यांच्या बरोबर मला पाठवू नकोस. त्यांनी गळ्यात साप काय घातलेत, अंगाला सगळ्या राख काय फासली आहे. त्यांच्या बरोबर मला जायच नाही.'' ''बरं'' म्हणाले. ''काही हरकत नाही.'' शंकरांची निंदा केली असा त्याचा अर्थ नाही पण तिला नाही इच्छा. उपासना मार्गामध्ये पुष्कळ स्वातंत्र्य आहे. सगळे नियम व्यवस्थित पाळले पाहिजेत.

तर नंतर भगवान् विष्णुंची स्तुती करायला सुरवात केली. ती स्तुती करत असताना बाह्य स्वरूप पाहिल. ''शांताकारम् भुजगशयनम्'' ही स्तुती निराळी. पण हे जे आचार्य महाराज स्तुती करताहेत -

***पृथिव्यां तिष्ठन् यो यमयति महीं वेद न धरा।***
***यामित्यादौ वेदौ वदति जगतामीशममलम्।***
***नियन्तारं ध्येयं मुनिसुरनृणां मोक्षदमसौ।***
***शरण्यो लोकेशो मम भवतु कृष्णोऽक्षिविषय: ॥***

श्रीकृष्णांच्या स्वरूपाकडे या दृष्टीनं आचार्य महाराज पहाताहेत. अंतर्यामी स्वरूप आहे. तेच या रूपामध्ये आलेलं आहे. वसुदेव देवकी नंदन म्हणा तेच अंतर्यामी स्वरूप आहे. या दृष्टीनं त्यांच पहाण आलं.

तर अशा रीतीनं अंतर्यामी स्वरूप जे आहे भगवंताच ते ईश्वराचं मुख्य स्वरूप म्हणून उपनिषदांमध्ये दाखवलेल आहे. म्हणजे सर्वांतरयामी म्हटल्या नंतर अर्थात ते अत्यंत व्यापक स्वरूप झालं. देश मर्यादा त्याला नाहीये. 'सत्यं ज्ञानं अनन्तं ब्रह्म' म्हणून जे

सांगतात. अंत म्हणजे मर्यादा, परिच्छेद त्याला नाही. देशाची एक मर्यादा सर्वांना आहे आणि कालाचीही मर्यादा सर्वांना आहे. कोणीही असो, चेतन असो अचेतन असो, कोणीही जीवात्मा असो प्रत्येक जण देश मर्यादित आहे. आकाशसुद्धा मर्यादित आहे. त्यापेक्षा त्याचा निर्माणकर्ता जो आहे तो व्यापक आहे. अंतरहित आहे. तर हे जे अंतरहिततत्व जे आहे, देशरहित आहे, कालमर्यादारहित आहे अशा प्रकारच ईश्वरस्वरूप, आपल्याला दिसणारे सर्वही पदार्थ देश मर्यादित आणि कालमर्यादित असल्यामुळे, अशा विपरीत ईश्वरस्वरूपाचे जरी शब्द प्रमाणाने वर्णन केलेल असलं, शब्द प्रामाण्यबुद्धी असली आमच्यामध्ये तरीसुद्धा ते बुद्धीमध्ये आकलन होऊ शकत नाही.

कारण बुद्धीला तशा प्रकारच ज्ञान ग्रहण करण्याच सामर्थ्यच नाही. सर्वही एकंदर पदार्थ हे सान्त पदार्थ परिच्छिन्न पदार्थ आमच्या बुद्धीला मिळाल्यामुळे अपरिच्छिन्न पदार्थ आहेत किंवा नाही असा संशय येतो मनात. त्याच कारण त्यांनी सांगितलेल आहे.-

***पुरूषापराधमलिना धिषणा, निखद्य चक्षुरूदयावि यथा।***
***न फलायभच्छुर्विषया भवति, श्रुतिसंमवापितु तथतपनिधी॥***

निर्दोष प्रमाण म्हणून जी आहे श्रुती या श्रुतीवाक्यापासून उत्पन्न झालेल ज्ञान उत्पन्न होत नाही अस नाही. महावाक्यापासून ते ईश्वरतत्व असं आहे, ते ज्ञानरूप आहे, सत्य आहे, अनंत आहे, परिच्छिन्नरहित आहे, आणि तेच तू आहेस. ही वाक्ये आपण ऐकतो, फल मिळू शकत नाही. ज्ञान झाल्यानंतर अज्ञान दूर झालं पाहिजे. सर्व एकंदर दु:ख निवृत्ती झाली पाहिजे. हे जे काही ज्ञानाच फल आहे ते मिळू शकत नाही.

कारण का तर आपल्या बुद्धीमध्ये अनेक अपराधांमुळे दोष आहेत. त्या दोषांमुळे, ती सदोष बुद्धी असल्यामुळे त्या बुद्धीला होणार ज्ञान हे कार्यकारी होऊ शकत नाहीये. त्याकरता त्यांनी एक कथा सांगितलेली आहे.

एका राजाचा एक मोठा उत्तम ज्ञानी मित्र होता. अर्थात राजाही चांगला गुणग्राहक होता. त्या मित्राची त्याची संगती आहे. त्याच्यावर प्रेम आहे. हे इतर मंडळींना काही पहावल नाही. मग एके दिवशी त्या मंडळींनी त्या मित्राला बाहेर घेऊन जाऊन गावाच्या हद्दीच्या बाहेर घालवून दिले. तू आमच्या हद्दीत आलास तर ठार मारू म्हणून भीती दाखवली. आणि राजवाड्यामध्ये त्याची वस्त्र कोणाच्या तरी रक्तात भिजवून राजाला सांगितलं तुमच्या मित्राला वाघाने मारले. वाईट वाटल.

पुन्हा एके दिवशी राजा शिकारीला निघाला असताना तो आपल्या हद्दीच्या बाहेर गेल्यावर त्याचा हा मित्र एक झाडाखाली स्वस्थ डोळे मिटून बसलेला दिसला. राजा म्हणाला, हा तर जिवंत आहे. मेला कसा? इतक्यात ते कारस्थान करण्याऱ्या बरोबरच्या माणसांपैकी हे पाहिल आणि राजाला सांगितल, ''पहा, राजेसाहेब हा तुमचा मेलेला मित्र पिशाच्च झाला आहे. याठिकाणी दिसतोय की नाही तुम्हाला.'' म्हणजे या वाक्याने राजाच्या मनांत संदेह निर्माण केला. अज्ञान, अंधश्रद्धेपेक्षा संशय हा भयंकर प्रभावी आहे. संशय निर्माण करण्याच कार्य पूर्वीचे जे जेते राजे होते त्यांनी फार मोठं केलेल आहे. त्यामुळे सगळीकडे अगदी गोंधळ निर्माण झालेला आहे.

आमच्या धर्माबद्दल संशय, आमच्या शास्त्रप्रमाणांबद्दल संशय,

आमच्या संस्काराबद्दल संशय, आमच्या धर्माची जी जी अंगे उपांगे आहेत त्या प्रत्येका बद्दल संशय. भेद ज्याला म्हणतात तो त्यांनी निर्माण केला. त्यामुळे तो राजा आपल्या मित्राला प्रत्यक्ष डोळ्यांनी पहात असतानासुद्धा ''हा तुमचा मित्र पिशाच्च झाला आहे'' हे वाक्य ऐकताच त्याच्या बुद्धीत संदेह निर्माण झाला. म्हणून प्रत्यक्ष प्रमाणाने दिसत असूनसुद्धा त्याच फल काही त्याला मिळू शकल नाही. ''चला इथ राहून तरी काय करायचय'' म्हणाला, ''पिशाच्याच्या संगतीत राहून.''

तसच श्रुती वाक्यांनी जरी ज्ञान झाल असल तरी असंभावना, अज्ञान, अश्रद्धा, संशयादि दोष मनामध्ये आहेत तो पर्यंत झालेलं ज्ञानदेखील सफल होऊ शकत नाही. ते सगळे दोष दूर करण्याकरता विचार करायला पाहिजे. चिकित्साही पाहिजे. चिकित्सेचे फल हे त्यांनी सांगितलय. वाद कथा चिकित्सेसाठी चांगली आहे. वाद, आणि वितंड तीन प्रकार, तीन पद्धती नैय्यायिकांनी सांगितलेल्या आहेत. त्या सगळ्याही आपल्या पक्षाच संरक्षण करण्यासाठी उपयुक्त आहेत म्हणूनच त्यांनी मांडलेल्या आहेत.

त्यापैकी वादप्रथा जी आहे- सम वयस्क जे असतील त्यांची चाललेली चर्चा किंवा गुरुशिष्यांची होणारी चर्चा - याला त्यांनी वाद अस नांव दिलेल आहे. 'तत्त्वबुभूत्सेत्कथावाद:' तत्त्व पाहिजे. आपला पक्ष श्रेष्ठ आहे एवढच त्यांना सिद्ध करायच आहे. त्यांच त्यांच मत ठरलेल आहे. आमचच मत खरं आहे सिद्ध करण्याकरता दोघेही प्रवृत्त झालेले आहेत. त्याच्यापासून फल, तत्वनिर्णय होणार नाही काही नाही.

तर ह्या सगळ्या वाद पद्धती त्यांनी निर्माण केलेल्या आहेत, नैय्यायिकांनी त्या पद्धतींनी बुद्धीमध्ये निर्माण झालेले जे अपराध, दोष आहेत ते सगळे दोष दूर करायचे आहेत. त्या करता विचारांच फल म्हणजे बुद्धीतले दोष दूर करणं. ज्ञान हे तर विचारांनी होत नाही म्हणतात. विचार प्रमाण नाहीत. प्रमाण सहाय्यक असेल. परंतु विचार म्हणजे साक्षात प्रमाण नाही. प्रमाणाने ज्ञान होत.

म्हणून ज्ञान हे जर, निर्दुष्ट बुद्धी झाली, बुद्धीमध्ये असणारे दोष विचारांनी जर दूर झाले, तर तशा निर्दुष्ट बुद्धीने ईश्वरस्वरूपाचं ज्ञान होऊ शकत. तशी वाक्ये आहेतच. त्या वाक्यांपासून ज्ञान होत, आणि ते सफलही होत.

तर अशा दृष्टीन ***''भोक्तारं यज्ञ तमसां सर्वलोकमहेश्वरम्.....''*** अस ईश्वर स्वरूपासंबंधी भगवान सांगताहेत. ईश्वरस्वरूपाचं ज्ञान अशा प्रकारे झालं पाहिजे म्हणतात. म्हणजे केवळ परिच्छिन्नरूपाने ज्ञान होणसुद्धा उपयुक्त आहे म्हणतात. मूर्तीपूजन वगैरे परिच्छिन्नरूपाने अर्चन होण याचा उपयोग नाही असं नाही. पण त्याच्याही पुढं जायच आहे.

परिच्छेद जेवढा कमी कमी करता येईल, ईश्वरस्वरूपाबद्दल आपल्या बुद्धीची मर्यादा जितकी कमी कमी करता येईल तितकं ईश्वरस्वरूपाचं दर्शन अधिकाधिक स्पष्ट अशा स्वरूपाच होत आहे. नामदेव इतकी भक्ती करणारे, सगुण साक्षात्कार त्यांना झालेला असतानाही सर्व संतांनी त्यांना ''कच्च मडकं'' म्हटल ही ऐकतो आपण कथा.

नामदेव पांडुरंगांना म्हणाले, ''हे सर्व संत लोक कच्च मडकं

म्हणाले.'' पांडुरंग म्हणाले, ''होय. कच्च मडकं आहेस तू'' नामदेव म्हणाले, ''देवा तुम्ही माझ्याबरोबर बोलता चालता. मी घरुन ताट वाढून आणल्यावर तुम्ही जेवण करता. माझ्या घरी जेवायला येता. आता इतकं तुमच ज्ञान असताना आणखी कच्चेपणा कोणाचा? ईश्वरसाक्षात्कार होणं याच्यापेक्षा जास्त काय आहे?''

पांडुरंग म्हणाले, ''पांडुरंग फक्त राऊळातच आहे एवढच तुला माहिती आहे. पांडुरंग सर्वव्यापी आहे हे ईश्वरस्वरूपाचं ज्ञान अद्यापि तुला झालेल नाही.'' ते होण्याला नामदेवांना विलंब लागला नाही. हेही तितकच खरं आहे. सगुण साक्षात्काराचा काही उपयोग नाही असा त्याचा अर्थ नाहीये. सगुण साक्षात्कार झालेला आहे. त्यांच ते ईश्वरप्रेम इतक विलक्षण आहे म्हणून सद्गुरूंच्या नुसत जवळ गेल्यावर त्यांच्या नुसत्या बोलण्याने ''ज्या ठिकाणी शिवलिंग नसेल तिथ माझे पाय ठेव. एवढ नुसत म्हटल्या बरोबर सगळीकडे शिवलिंग दिसायला लागली. सगळं बुद्धीला ज्ञान झालेलं आहे. हे त्याच्या उत्कट भक्तीच, प्रेमाच फल मिळाल.''

पण त्याच्या पूर्वी अशी स्थिती झालेली आहे. सगुण साक्षात्कार झाला असताना आता काय राहिलय ज्ञान व्हायच, पक्कच आहे, असं स्वत: समजत होते नामदेव. तर हे ईश्वरस्वरूपाचं ज्ञान होण्याकरता निरनिराळ्या प्रकारचे उपाय त्यांनी सांगितलेले आहेत. कर्ममार्ग, बहिरंग कर्म. परंतु त्याच्या नंतर उपासना जी सांगितली आहे. त्या उपासनेमध्येसुद्धा अनेक प्रकार आहेत. निरनिराळ्या उपासना उपनिषदामध्ये सांगितलेल्या आहेत. साकाराची उपासना आहे. आवृत्तीची उपासना आहे त्या सगळ्याही उपासनांच्या

अभ्यासाने बुद्धीच निर्दोषत्व हे अधिकाधिक झालं पाहिजे. बुद्धीमध्ये दोष आहेत किंवा नाही हे बुद्धीला कळत नाही.

कारण कषाय म्हणून जो प्रकार आहे.-

*लय विक्षेप कषाय रसास्वादेभ्य:*
*रक्षितं चित्तं अविघ्नेन ब्रह्माणि अवस्थितं*
*भूयात् इति भवन्त: महान्त: अनुगृण्हन्तु ।*

विद्यारण्यमुनींनी काही तरी बावन्न प्रार्थना केलेल्या आहेत. -

*हिरण्यगर्भादि स्थावरान्तेषु शरीरेषु यद्*
*एकं चैतन्यं अस्ति तदेव अहमस्मि, इति*
*दृढज्ञानसिद्धि: भूयात् इति भवन्त: महान्त: अनुगृण्हन्तु ।*

श्रेष्ठ ज्ञानी महात्म्यांच्या जवळ ही प्रार्थना मुद्दाम केलेली आहे. त्यांनी आमच्यावर अनुग्रह करावा, अशा प्रकारचं ज्ञान आम्हाला मिळावं.

आचार्यांची ती कथा प्रसिद्ध आहे. काशीला ते गेले. एक दिवस भिक्षेला निघाले असता शंकर हे हरिजनाच्या वेषामध्ये आले. त्यावेळेला आचार्य त्यांना ''दूर हो, दूर हो'' म्हणाले. त्यांनी विचारलं, ''कोणाला दूर हो सांगताहात?'' तुमचा अन्नमय कोश आहे माझा अन्नमय कोश आहे. कोणाला दूर करता तुम्ही? साम्यवाद, हा खरा साम्यवाद आहे. त्यांनी अगदी तर्कशुद्ध मांडला आहे. ''दूर व्हायला मला सांगता तुम्ही, तुमच्या व माझ्या अन्नमय कोशात काय अंतर आहे? तेव्हां तुम्ही दूर होण्याला कोणाला सांगता? आणि आत्मस्वरूपाच्या दृष्टीन तुम्ही सांगत असाल तर तुमचा आत्मा आणि आमचा आत्मा भिन्न आहे का?'' अस जेव्हां त्यांनी विचारलं त्यावेळी आचार्य महाराजांचं उत्तर मोठं पहाण्यासारख आहे. -

*जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषुस्फुटतरा या संविदुजम्भवे*
*या ब्रम्हादिपिपीलिकान्ततनुषु प्रोताजगत्साक्षिणी ।*
*सैवाहंनचदृश्यवास्त्विति दृढ प्रज्ञा पिसस्यास्तिचेम्*
*चांडालोऽस्तु सतु द्विजोस्तु गुरूरित्येषामनीषा मम् ॥ २० ॥*

ही जी भावना आहे, भूमिका आहे, हे ईश्वर स्वरूपाचं खरं ज्ञान आहे. हे ज्ञान ज्याला झालेलं आहे त्याला मी गुरू समजतो असं आचार्य महाराज स्वत: सांगताहेत.

म्हणजे ईश्वरस्वरूपाच्या दर्शनाकरता कितीतरी आणखी पुढं प्रयत्न करायला पाहिजे. त्याच्याकरता टप्पे सांगितले आहेत. तर हे जे ईश्वरस्वरूपाचं प्रतिपादन ५ व्या अध्यायाच्या शेवटी, योगाभ्यास, ध्यानयोगाचा अभ्यास झाल्यानंतर त्याला हे कळून येत म्हणतात. *''भोक्तारं यज्ञतपसात् सर्वलोकमहेश्वरम्''* हे ईश्वरस्वरूपाचं ज्ञान, पूर्ण नियामक शक्ती, त्याचप्रमाणे सर्व कर्तृत्व आणि सर्व सहाय्यक अनुकूल म्हटलेल आहे. ईश्वराचं आमच्याकडे लक्ष नाही काही नाही म्हणून लोक आक्षेप घ्यायला लागले. त्यावेळी उद्धवजींना उपदेश करताना भगवान् सांगताहेत-

*नरदेमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवंसुकल्पं गुरूकर्णधारम् ।*
*मयानुकूलेन नभखतेरितं पुमान्भवाब्धिं न तरेत स आत्महा ॥*

हे कोणी दिल? मनुष्य देह कोणी दिला? आमच्या इच्छेने मनुष्य देह धरू शकतो, टाकू शकतो काही नाही. टाकणही आमच्या हातात नाही, धरणही आमच्या हातात नाही. महात्मे उपदेश करण्याकरता देह धारण करून येताहेत, सारखे फिरताहेत. परीक्षित राजाला उपदेश करण्याकरता शुकाचार्य महाराज स्वत: होऊन आले. ''काय

पाहिजे बाबा?'' शिवाय आहेच म्हणाले सहाय्यक मी अनुकूल आहे. अनुकूल हे फक्त कार्य करण्यापुरत नाही. अनुकूल हे भगवंताच एक नाव आहे. विष्णुसहस्त्रनामात -

*'अनुकूल: शतावर्त: पद्मीपद्म निभेक्षण:'*

असं ईश्वराचं एक नांव आहे. सार्थ नांव आहे. तर इतकी सगळी व्यवस्था जीवांच्या उद्धाराकरता मी केलेली असताना, जीव जर या भवसागरातून तरून जाण्याचा प्रयत्नच न करू लागला तर मी काय करणार त्याला. आत्मघात त्याचा त्याने करून घेतलेला आहे.

उपासकाने उपासनामार्गामध्ये ईश्वर आपल्याला नेहमीच अनुकूल आहे अशीच धारणा केली पाहिजे. ईश्वर आपल्यावर कधीही रागवत नाही. अशी नेहमी भावना असली तर त्याची उपासना व्यवस्थित होईल. जरा संसारातलं कमी जास्त झाला की लगेच ''इतक आम्ही केल ईश्वराचं आमच्याकडे लक्ष जाऊ नाही का? काय आम्ही इतकी सेवा केली, दानधर्म केला हेच आम्ही पुष्कळ रडगाण गातो. तर नेहमीच ईश्वर अनुकूल आहे.'' ''ठेविले अनंते तैसेची रहावे'' यांत तुकाराम महाराजांनी हेच सुचवलय. त्यात काही निष्क्रियतेचा उपदेश केलेला नाही, किंवा दैववादाचा उपदेश केला नाही. लोकमहेश्वरत्व यात व्यक्त केलेल आहे. अनंताने ठेवल तस रहावेच लागेल तुम्हाला, असा त्याचा अभिप्राय आहे . तुम्ही रहा असा नाही.

तर या दृष्टीनं संतांनी केलेल मार्गदर्शन, त्यांना आलेला ईश्वरस्वरूपाचा अनुभव, ईश्वरशक्तीची जाणीव त्यांना असल्यामुळे त्यांनी याप्रमाणे सगळं मार्गदर्शन केलेल आहे.

तेव्हां या श्लोकामध्ये आरंभाला त्यांनी ध्यानयोगाची दोन सूत्रे सांगितली आहेत त्याप्रमाणे योगाभ्यासाने आपल्या चित्ताला निर्दोष केल्यानंतर ईश्वरस्वरूप असं आहे, तो सर्व कर्मांचा भोक्ता आहे, तो सर्वांचा नियामक आहे आणि असं असूनसुद्धा तो सर्वांचा सुहृद आहे. हे ज्ञान त्याला होत. आणि निश्चित वृत्ती त्याची होऊन जाते. आणि शेवटी शांती प्राप्त होते असे ५ व्या अध्यायाच्या शेवटी सांगितलं आहे.

आता संपूर्ण विभूती अध्याय जो आहे १० वा याच्यामध्ये ईश्वराचं स्वरूप सांगितलं आहे. हे जे आणखी अंतर्यामी स्वरूप म्हणा किंवा सत्यं, ज्ञानं, अनंतं ब्रम्ह वगैरे जे प्रतिपादन केलय ते स्वरूप म्हणा त्याच ज्ञान एकदम होऊ शकत नाही. त्याच अगोदर ध्यान करायला पाहिजे. ध्यान हे ज्ञानाचं साधन आहे ना ! ध्यानानंतर समाधी आणि नंतर साक्षात्कार, धर्ममेध समाधी ज्याला म्हणतात. परमेश्वरस्वरूप सगुण असो किंवा निर्गुण असो त्या कोणत्याही स्वरूपाचा साक्षात्कार होण्याकरता त्या स्वरूपाचं ध्यान आधी झालं पाहिजे. आणि त्या ध्यानाचा परिपाक म्हणजे समाधी अवस्था.

सद्‌गुरू वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी एका ठिकाणी उल्लेख केला आहे. १२ दिवस कुंभक करायचा, इतकं दिवस कुंभक स्थिर होण म्हणजे कठीण आहे. १२ दिवस समाधी लागली पाहिजे. फार कठीण आहे.

तर ध्यानानंतर समाधी आणि तिच्या नंतर साक्षात्कार आहे. सूक्ष्म वस्तू आहे. पण सूक्ष्म वस्तूचासुद्धा साक्षात्कार होण्याकरता संयम म्हणून जे योगशास्त्रकारांनी साधन सांगितलेल आहे,

समाधीपर्यंत चित्तवृत्ती गेली तर त्या वस्तूचा साक्षात्कार त्याला होऊ शकतो. शरीरातल्या सर्व इंद्रियांच ज्ञान तरी कुठ आहे आपल्याला. प्रत्यक्ष काहीच नाहीये. स्थूल शरीरामध्ये आत काय काय आहे हे कुठ आम्हाला सर्व समजलय ! मग इंद्रिय तर बाजूलाच राहिली. इंद्रिय स्वत: तर अतींद्रिय आहेत. ज्या इंद्रियांवर प्रत्यक्ष प्रमाण, प्रत्यक्ष प्रमाण म्हणून जास्त विश्वास आमचा आहे ती इंद्रिय स्वत: गुप्त आहेत. डोळ्यांनीसुद्धा दिसत नाहीत. बाहेरचा आकार फक्त दिसतो. बाहेरचा आकार आंधळ्याला सुद्धा दिसतो. बहिऱ्यालासुद्धा बाहेरचे कान असतात. कान हेच जर श्रोत्रेंद्रिय म्हटले तर त्याला ऐकायला का येत नाही? म्हणजे श्रोतेंद्रिय म्हणून जी शक्ती आहे ती वेगळी आहे. ती अतींद्रिय आहे.

म्हणजे इंद्रिय स्वत:च जिथे अतींद्रिय आहेत, त्या इंद्रियांनी होणार ज्ञान आपण खरं मानतो आणि ते ज्ञान झालं नाही म्हणजे सगळ खोटं मानतो म्हणजे सर्व पदार्थ पहाण्याची शक्ती इंद्रियांजवळ आहे का? हा विचार आमच्या मनात येतो का?

ईश्वर विश्वरूप आहे. ''आता विश्वात्मके देवे'' अशीच दृष्टी संतांची आहे. तर त्या विश्वरूप झालेल्या परमात्म्याचं ज्ञान आपल्याला करून घ्यायचय. ''ईशावास्यमिदं सर्वम्'' म्हणून हाच उपदेश केला आहे. तर संपूर्ण जे विश्व ईश्वरस्वरूप कसं आहे ते समजून घेण्याकरता त्या ईश्वराचा विशेषरूपाने आविर्भाव कुठे कुठे झाला आहे हे अगोदर सांगताहेत - म्हणजे ईश्वराचे हे दृष्य स्वरूप नाहीये. विभूतीसुद्धा ईश्वराचं नित्यरूप नाही. परंतु हे रूप समजून घेण्याकरता म्हणून या स्वरूपाचं ध्यान करून त्या बुद्धीची एकाग्रता

साधायची आहे आणि नंतर त्या स्वरूपाचं पुढं ज्ञान करून घ्यायचय.

हे सांगत असताना इथ एक लोकमहेश्वर शब्द आला आहे, दहाव्या अध्यायात -

***यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् ।***
***असंमूढ: स मर्त्येषु सर्वपापै: प्रमुच्यते ॥३॥***

या श्लोकामध्ये ''लोकमहेश्वरम्'' शब्द मुद्दाम घातला आहे भगवंतांनी. आता इथ लोकमहेश्वरत्व कसं आहे हे सांगण्याकरता पुढचे श्लोक आहेत. जगामध्ये जे पदार्थ आपल्याला अत्यंत आवश्यक वाटतात, पाहिजे असे वाटतात, पण ते काही आपल्या प्रयत्नांनी मिळवता येण शक्य नाही अस त्यांनी दाखवल आहे. मीच एकदंर ते गुण आहेत, पदार्थ आहे.

***बुद्धिर्ज्ञानमसंमोह: क्षमा सत्यं दम: शम: ।***
***सुखं दु:खं भवाऽभावो भयं चाभयमेवच ॥४॥***
***अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयश: ।***
***भवन्ति भावा भूतानां मन्त एव पृथग्विधा: ॥५॥***

हे जे पदार्थ आहेत ते जीवाच्या प्रयत्नाने केव्हांही मिळवता येण शक्य नाही. असा स्पष्टच त्यांनी उल्लेख केलेला आहे. आता त्याच स्वरूप कसं आहे. बुद्धी. बुद्धी म्हणजे काय?

बुद्धीमध्ये अनेक प्रकारच्या शक्ती आहेत. ज्ञानशक्ती म्हणजे ग्रहणशक्ती आहे बुद्धीमध्ये. ग्रहण झालं तरी ते ज्ञान धारण करू शकत नाहीये त्यासाठी धारणाशक्ती वेगळी सांगितली आहे. प्रत्येक पदार्थाच्या वेगळ्या वेगळ्या अवस्था दाखवणारे शब्द संस्कृत भाषेमध्ये आहेत. इतकी शब्द संपत्ती दुसऱ्या कोणच्याही भाषेमध्ये

नाहीये. इतकी समृद्ध भाषा आज बाजूला पडलीये. नुसता आभरण झाला. मेघाला त्यावेळी वारीवाह शब्द आहे. आणि आता पाऊस पडणार आहे - पडायला सुरवात होणार आहे या अवस्थेमध्ये त्याला मेघ शब्द वापरला आहे. अशारीतीने प्रत्येक अवस्थांच स्पष्टीकरण करणारी शब्दसंपत्ती असलेली संस्कृत भाषा किती समृद्ध आहे. पण स्वराज्य मिळाल्यानंतर ह्या भाषेची उपेक्षा झालीये हे मोठे आश्चर्य आहे. असो.

बुद्धी शब्दाची व्याख्या करताना म्हणतात - अंत:करणस्य सूक्ष्मार्थ विवेक सार्थम् - सूक्ष्म पदार्थ जरी असला तरी त्याच विवेचन करण्याच सामर्थ्य बुद्धीमध्ये उत्पन्न होण याच नांव बुद्धी आहे. बुद्धी शब्दाचा अर्थ आहे ज्ञान. 'भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधा' ही बुद्धी, सूक्ष्मार्ध विवेचन सामर्थ्य बुद्धी ही ईश्वरानेच द्यावी.

ज्ञान शब्दाची व्याख्या करताना आणखी सांगताहेत - आत्म अनात्म सर्व विषय पदार्थ ज्ञानम् - केवळ ज्ञान म्हणजे सर्वज्ञत्वच आहे. आत्म आणि अनात्म या सर्व पदार्थांचा अनुभव म्हणजे ज्ञान. ही केवढी मोठी शक्ती आहे. अशक्य कशाकरता मानायच हे. बद्धिवादाने हे शक्यच नाही असा निर्णय कसा द्यायचा? हे आता प्रत्यक्ष भगवान सांगताहेत, त्यांची व्याख्या करणारे मोठे मोठे अनुभवी लोक आहेत. तर हे अशक्य का समजायच? तर आम्हाला हे शक्य नाही. आमच्या पैकी कोणीच समर्थ नाही म्हणून हे अशक्य का मानायच?

तर ज्ञान शब्दाची व्याख्या त्यांनी 'सर्व विषय ज्ञानम' तशी केली आहे. आत्मस्वरूप आहे. अनात्म स्वरूप आहे. सगळ्यांच

ज्ञान व्हाव. त्या जनक राजाच्या सभेमध्ये जनक राजाने मोठ्या मोठ्या ज्ञानी मंडळींना मुद्दाम बोलावून आणायच. तो स्वत: मोठा ज्ञानी होता. त्यांची योगक्षेमाची व्यवस्था करायची कारण त्या ऋषी मंडळींचे पुष्कळ विद्यार्थी असायचे. कुलपती होते ते. दहा दहा हजार विद्यार्थ्यांना अन्न वस्त्र पुरवायची. प्रत्येक विद्यार्थ्यावर त्याच्या बुद्धीवर कोणते संस्कार आहे पाहून तिचा तसा उपयोग करणारे कुलपती होते. आता कुलपती शब्द वेगळ्या अर्थाने वापरला जातो. तर अशा मोठ्या मोठ्या ऋषींच कार्य समाजालाही उपयोगी पडणारे आहे. ज्ञान समृद्धी ही यांच्यामुळे झालेली आहे ना.

अशा दृष्टीनं मोठ मोठ्या ऋषींना बोलावून त्यांना काही सहाय्य कराव म्हणून त्यांना गायी वगैरे राजाने द्याव्यात. सगळी ऋषीमंडळी येऊन बसल्या नंतर एक हजार गायी उभ्या केलेल्या आहेत. अंगावरती भरजरी वस्त्र आहेत. शिंगाला सुवर्णाने मढवले आहे. कोणाला चांदीने मढवलेल आहे. आणि त्या उपाध्यायांनी उठून सांगितलं, ''राजे साहेबांची अशी इच्छा आहे की जो ब्रह्मज्ञानी म्हणजे सर्व ज्ञानी आहे, त्याने या गायी घेऊन जाव्यात.''

अशी घोषणा ऐकल्या नंतर उठणार कोण? मी सर्वज्ञ आहे असे सांगणार कोण? बराच वेळ झाला कोणी काही उठल नाही काही नाही. मग याज्ञवल्क्यांनी आपल्या शिष्याला सांगितल, ''जा. ह्या गायी आपल्या आश्रमात घेऊन जा.''

मग सगळ्यांची खळबळ सुरू झाली. तुम्ही काय स्वत:ला ब्रह्मज्ञानी समजता काय? सर्वज्ञ समजता काय? त्यांनी सांगितलं, ''ब्रह्मज्ञानी लोकांना मी नमस्कार करतो. आमच्या जवळ पुष्कळ

विद्यार्थी आहेत. त्यामुळे आम्हाला गायी पाहिजेत म्हणून आम्ही घेऊन जातो.'' पुष्कळ वादविवाद त्या ठिकाणी झाला आहे. प्रसिद्ध आहे ती कथा उपनिषदामध्ये.

तर ***''आत्मानात्म सर्व विषय उपरोध:''*** ज्ञानी शब्दाची व्याख्या केलीये. हे जे ज्ञान आहे ते मात्र ईश्वरशिवाय होऊ शकत नाही. लोकमहेश्वरत्व दाखविण्याकरता मुद्दाम हा श्लोक सांगितला आहे उपनिषदामध्ये.

तिसरा पदार्थ फार महत्वाचा असंमोहा:. याची व्याख्या मधुसूधन सरस्वतींनी केलेली आहे. बोधव्य वस्तू आपल्याला जाणून घ्यायची आहे. काय जाणून घ्यायच आहे? त्या करता चित्त अव्याकूल पाहिजे. काही त्याची व्याकूलता उपयोगी नाही. किंवा कर्तव्य प्राप्त झालेलं असताना सुद्धा अव्याकूल चित्त राहिल पाहिजे. त्याच नाव असंमोहा:

महाभारतामध्ये यक्ष प्रश्नाच्या वेळी ही कथा आलेली आहे. धर्मराजांना तहान लागली म्हणून भीम पाणी आणायला गेला. त्यालाही तहान लागली होती. पाणी प्यायला जातो तो तलावावर समोर एक मोठा यक्ष बसलेला आहे. त्या यक्षाने सांगितले, ''माझ्या प्रश्नांची प्रथम उत्तरे दे आणि मग पाणी पी.'' भीम म्हणाला, ''पाण्यावर काय कोणाची सत्ता असते काय !''तो जरासा बुद्धिवादी होता. म्हणाला ''मला तहान लागली आहे मी पाणी पिणार.'' तत्वज्ञान कुठे सांगायच, कुठे सांगायच नाही याचाही विचार करायला पाहिजे. सत्ता ज्याची आहे त्याच्यासमोर तत्वज्ञान सांगून काय उपयोग आहे? त्याने सांगितलेल ऐकले पाहिजे. पण नाही. त्याने

पाणी प्यायल आणि तो मरून गेला. अर्जुन, नकुल, सहदेवांचीही तीच स्थिती झाली. शेवटी धर्मराज तिथे आले. त्यांनी पाहिल सर्व बंधू मरून पडलेले आहेत. यक्षाने त्यांना सांगितल, ''तुला पाणी प्यायच असेल तर माझ्या प्रश्नांची उत्तर अगोदर द्यावी लागतील. तर तुला पाणी मिळेल नाहीतर तुझ्या बंधूंसारखी तुझी स्थिती होईल.''

आता अशा वेळेला चारही बंधू गेलेले आहेत. कोणी शिल्लक राहीलं नाही. आपण आता पुढ काय करायच. बारा वर्षे झाली. तेरा वर्षानंतर पुन्हा दुर्योधनाजवळ जायच. साम, दाम, दंड, नीती, भेद काय असेल ते करून आपण राज्य मिळवू. हे विचार येणारच की मनात. आणि त्याला सहाय्य करणारे सगळेच गेले. अशा वेळेला काय परिणाम झाला असेल मनावर. ते म्हणाले, ''विचारा. मी सांगतो.'' मनामध्ये त्या परिस्थितीचा काही परिणाम नाहीये. दुःखेषु अनुद्विग्नमना: म्हणून जे म्हणतात तीच असंमोहाची स्थिती आहे. आणि अशा असंमोहाच्या स्थितीमध्ये यक्षाने विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांनी समाधानकारकरीत्या दिली. त्यामुळे तो यक्ष संतुष्ट झाला. साक्षात् यमधर्मच होते ते यक्षाच्या रूपाने आलेले.

हे बोधव्यविषयाबद्दल झाल. त्यांनी विचारायचे प्रश्न. त्या प्रश्नांचा विचार करायचा आणि त्याप्रमाणे उत्तर द्यायच आहे. त्यावेळेस चित्त किती आणखी अव्याकूल राहिल पाहिजे ! तर ही असंमोह स्थिती धर्मराजांची त्या प्रश्नांची उत्तरे देताना झालेली आहे. त्याच्या पुढची स्थिती अशी आहे - यमधर्म प्रसन्न झाले. आणि ''माझी उत्तर तू चांगली दिलीस बाबा. आता या चार बंधूपैकी तुझा कोणता बंधू जिवंत व्हावा अशी तुझी इच्छा आहे?''

आता कर्तव्य आलं. त्यावेळेलाही त्यांनी सांगितलं, ''तुम्ही नकुलाला जिवंत करा.'' यमधर्म म्हणाले, ''काय वेडा आहेस तू. तुला आता पुढं युद्धाचा प्रसंग येणार आहे. युद्धाला उपयोगी पडणारा अर्जुन म्हणा भीम म्हणा यांच्यापैकी कोणी जिवंत व्हावा अशी इच्छा व्यक्त करण्यापेक्षा नकुल जिवंत व्हावा अस म्हणतोस?''

धर्मराज म्हणाले, ''हो. मला दोन माता आहेत. एक माता सध्या जिवंत आहे. तिचा मी मुलगा आहे. दुसरी माझी माता स्वर्गवासी झाली आहे. तिंचाही पुत्र जिवंत झाला तर तिलाही समाधान वाटेल. म्हणून नकुल जिवंत व्हावा अशी मी इच्छा व्यक्त केली.'' त्यामुळे काय झाल तर यक्ष म्हणाला ''सगळेच तुझे बंधू जिवंत होतील.'' आणि त्या प्रमाणे सगळे त्याचे बंधू जिवंत झाले.

म्हणजे कर्तव्याच्या वेळेला सुद्धा चित्ताची व्याकूळता नाहीये. मोहाने म्हणा, पक्षपाताने म्हणा अर्जुन जिवंत व्हावा असं म्हटल असत तर एकच जिवंत झाला असता. पण ही कर्तव्यबुद्धी त्याने दाखवल्यामुळे त्याचे चारही बंधू जिवंत झाले. त्या शिवाय यमराजांचे वरदान मिळाले की या वेषाने जरी अज्ञातवासात तुम्ही हिंडलात तरी तुम्हाला कोणी ओळखणार नाही. म्हणजे तीही काळजी दूर झाली.

धर्मराजांच्या असंमोह, धर्मशील वृत्तीचा प्रभाव देवादिकांवरही पडलेला असल्यामुळे ते त्याच्या आज्ञेमध्ये वागत असत. पांडवांमध्ये कधी तरी आपसात तंटा झाला असेल पण धर्मराजांची शक्ती काही तरी मोठी आहे असे त्यांना वाटत होते.

प्रतापगडावरून खाली निघाले शिवाजीराजे. खाली तंबू

घातलेला आहे. अफजलखान भेटीला निघताना भगवतीची प्रार्थना केली. सर्वांना शांतपणे सांगितले. ''दगा फटका झाला नाही तर परत येतोच आम्ही नाही तर हा मुलगा लहान आहे याचे सगळं व्यवस्थित करा तुम्ही.'' निरवानिरव व्यवस्थितपणे करून खाली आले. पुढे सर्व कार्य नीट झाल. तर ही जी असंमोह स्थिती आहे ती फक्त धर्मराजांना मिळाली असं नव्हे. शिवाजी राजांनाही ती मिळाली होती. अशा मोठ्या मोठ्या लोकांना ती मिळते. म्हणून त्यांना सुद्धा विभूती म्हटलेल आहे. विभूतींच वर्णन भगवंतांनी संक्षेपानं केलं. कुठ कुठ विशेष आविर्भाव झाला म्हणून. ईश्वराचं स्वरूप कोणतं आहे ते प्रत्यक्ष विभूतीरूपाने समजावून दिल. तरीसुद्धा शेवटी सांगितल -

***यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ।***
***तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥***

म्हणजे विभूतीची ओळख करून घेण्याकरता हे सामान्य स्वरूपही सांगितल.

तर असंमोहा: हे जे मुद्दाम सांगितलय फार मोठा गुण आहे. ही स्थिती प्रयत्नांनी साध्य होण शक्य आहे का? बुद्धीला पटण्यासारखी स्थिती आहे. असंमोहाची पुष्कळ उदाहरण आहेत. मोठे मोठे नेते जे होऊन गेले त्यांची अशा प्रकारची असंमोहा: स्थिती असू शकते, कर्तव्याच्या वेळेला. तर ही असंमोहा: स्थिती आणखी प्राप्त कशी करून घ्यायची? त्याकरता ''मन्त एव पृथग्विधा:'' भगवान सांगताहेत. हे सगळ माझ्यापासूनच मिळू शकत.

त्याच्या नंतर क्षमा. निर्विकार चित्ताला क्षमा म्हणतात. निर्विकार चित्त रहाण. अपमान केला, निंदा केली, मारल कोणी तरीसुद्धा

निर्विकार चित्त राहाण, पदेशास्त्रींना ते कोणी तरी वाटेल तस बोलले म्हणतात. ''बर झालं माझं स्वरूप तुम्ही समजावून दिल'' असं उत्तर ह्यांनी दिल. म्हणजे ही निर्विकार चित्तवृत्ती जी आहे ती क्षमा वृत्ती आहे. ही काही सामान्यांना शक्य तरी आहे का ! शठम् प्रतिशाठ्य हाच मार्ग असला पाहिजे. त्याचच प्रतिपादन करणारी मंडळी आहेत. हाच व्यवहार मार्ग आहे. द्रौपदी आणि भीमसेन दोघांचही धर्मराजाला तेच सांगण असायच. पण धर्मराजांनी आपला मार्ग कधी सोडला नाही.

त्याच्या नंतर सत्यम्. सत्यम् हे सुद्धा ईश्वरदत्त असत. देणे ईश्वराचे, देणे ईश्वराचे म्हणून समर्थांनी पुष्कळ यादी घातली आहे. जे प्रमाणाने आपल्याला समजलेल आहे. त्याचप्रमाणे सांगायच. कोर्टाच्या तिथ गेल्यावर साक्षीदार तिथे मिळतात म्हणा. किती पैशांचा साक्षीदार तुम्हाला पाहिजे असही विचारतात म्हणतात. पण हे असे सत्य उपयोगी नाही. 'प्रमाणेन अवरूधस्य तथैव भाषणम्' म्हणून सत्याची व्याख्या सांगतात.

त्याच्या नंतर दम: शम: ही व्याख्या केली आहे. ***''बाह्येंद्रियाणाम् वृत्तिनिरोध:''*** हा दम शब्दाचा अर्थ आहे. ही जी बाह्य इंद्रिय आहेत. चक्षु इ. त्या त्या विषयापासून निवृत्त होण म्हणजे प्रत्याहार भूमिकेपर्यंत त्याला याव लागेल. त्याशिवाय दम सिद्ध होणार नाही. तर त्या त्या विषयांपासून इंद्रिय निवृत्त होताहेत, ज्या इंद्रियांची मूलत:च प्रवृत्ती बाह्य विषयांकडे आहे त्यांचा स्वभाव बदलण किती कठीण आहे ! म्हणून हा 'दम' सुद्धा ईश्वरदत्त मानला आहे.

आणि त्याच्या बरोबर शम: म्हणजे 'अंत:करणस्य बाह्य

विषयेभ्ये निवृत्ति: ।' केवळ 'दमा'ने भागत नाहीये. बाह्य इंद्रियांची निवृत्ती झालेली आहे असं समजू आपण. खरी झालीये की नाही कोणास ठाऊक पण शम जर नसेल तर

***कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसास्मरन् ।***
***इंद्रियार्थां विमूढात्मा मिथ्याचार: स उच्चते ॥***

म्हणून भगवंतांनी स्पष्ट असा त्याचा निषेध केलेला आहे. बाह्य कर्मेंद्रिय जरी आवरली तरी ते मिथ्या आहे. मनामध्ये जो पर्यंत इंद्रिय आहेत, विषय आहेत तो पर्यंत मिथ्याचार च समजला जातो.

म्हणजे शम आणि दम हे दोन्ही गुण प्राप्त होण्याकरता ईश्वराची आवश्यकता आहे. मीच त्यांना देतो. अशी प्रत्येक गुणाची व्याख्या त्यांनी केलेली आहे. अहिंसा, दया, क्षमा, यश: कोणच्याही प्राण्याला पीडा न करण हा अहिंसा शब्दाचा अर्थ त्यांनी सांगितला. समचित्त राहाण. अपरिग्रह साध्य होण्याकरता सगळे प्रयत्न चाललेले आहेत. सर्वत्र साम्य पाहिजे असं म्हणतात. पण हा जो अपरिग्रह आहे तो नुसत्या शासनाने किंवा कायद्याने होणार कसा?

मनामध्ये जो पर्यंत पाहिजे पाहिजे म्हणून लोभ आहे आणि त्याची स्थिती तशीच आहे. दारिद्रय असताना काही नाही म्हणून ताप आहे आणि मिळाल्या नंतर ***''लाभे लोभ: प्रवर्धते ''*** आचार्य महाराज सांगताहेत. दारिद्रय आहे म्हणून दु:ख आहे. आणि मिळाल्यानंतर लोभ उत्पन्न आणखी मिळाल नाही म्हणून दु:ख आहे. त्यामुळे अपरिग्रह सिद्ध होणार कसा ! मोठा गुण आहे. सर्व समाजाच कल्याण करील. सगळ मान्य आहे. पण नुसत्या कायद्याने तो अपरिग्रह सिद्ध होणार कसा?

म्हणून अर्थसाम्य वगैरे जे काही चाललेल आहे ज्या लोकांच. तेही म्हणतात हे आमचे प्रयोग चालू आहेत. अद्यापि ते सिद्ध झालं अस ते मानत नाहीत. तर त्या करता तुष्टी असणे आवश्यक आहे ती तुष्टीच नसेल तर तो अपरिग्रह सिद्ध होणार कसा? त्या करता काही शास्त्रीय प्रयोग सांगितले आहेत, प्रयत्न सांगितलेत. नुसत्या इच्छेप्रमाणे शोषणम् नाहीये.

दानाचीही व्याख्या त्यांनी मुद्दाम केलेली आहे. 'देशे, काले, यथाशक्ति सत्पात्र दानम्' अशी व्याख्या केली जाते. यथाशक्ती हे मुद्दाम घातलेल आहे त्यांनी. शास्त्रकारांनी काही सर्वच दान करायला सांगितल असं नाहीये. पण ती यथाशक्ती म्हणजे दुसऱ्याने ठरवून उपयोगी नाही. आपली शक्ती किती आहे हे पाहून आपण हे दान करू शकतो की नाही हे विचार करून ज्याचं त्यानं ठरवायच आहे. दुसऱ्यानेच त्याची शक्ती इतकी आहे, त्याने इतक दान केलं पाहिजे हा सल्ला देण याचा काही उपयोग नाही. याचा धर्मशास्त्राच्या दृष्टीने काही संबंध नाही.

बलीराजाला तीन पावलांच दान मागितल होत, वामनांनी. देतो, म्हणाला. पण शुक्राचार्य त्याचे हितचिंतक होते, गुरू होते. त्यांनी सांगितल, ''बाबा, हा काही कोणी सामान्य मनुष्य नाहीये, हा साक्षात विष्णु आहे. तीन पातल म्हणजे याची तीन पावल तू दान करू शकणार नाहीस. तुझी शक्ती नाही'' अस एखाद्या महात्म्याने सांगितलं म्हणजे हरकत नाही. शक्तीचा विचार ते करू शकतील. कारण त्यांनी ह्याच स्वरूप जाणलेल आहे. त्यामुळे ''तू भूमीदान करू शकणार नाहीस. तुझी शक्ती नाही'' अस जे त्यानी सांगितलं ते बरोबर आहे.

परंतु याच विचारण निराळं. मी माझ्या शक्तीप्रमाणे दान करू शकतो. दान शब्दाचा अर्थ काय आहे ! दान म्हणजे मम ममता. माझं माझं हे सुटण्याकरीता न मम, न मम असे दान सांगितले आहे. आत्मा असंग आहे हे अनुभवास येणे करता दान आहे. ही दानाची व्याख्या केली आहे त्यांनी दुसरी कडे. त्याप्रमाणे स्वत:च स्वत्व मी माझ्या बुद्धीन ठेवलेल आहे. ते माझं स्वत्व तुम्ही संपादन करा. हे एवढ दान पदार्थ आहे. दान पदार्थाच अत्यंत मोठ फल म्हणजे आत्मस्वरूप हे असंग आहे हे समजून येण्याकरता दान आहे. कशाशीही आत्मस्वरूपाचा संबंध नाही. कुठही संबंध नाही.

तर 'असंगोह्यर्म पुरूष: 'म्हणून जे उपनिषदामध्ये वर्णन केलेलं आहे, ते असंगत्व ज्ञान, आत्म्याच असंगत्व दाखवण्याकरता आणखी ज्ञानाची प्रक्रिया सांगितली आहे. प्रत्येक पदार्थाबद्दल जर ''न मम, न मम'' म्हणजे ममता जर बाजूला झाली तर माझा कशाशीच संबंध नाही. हे आत्मज्ञान या दृष्टीनं होण्याकरता ज्ञानाचा उपयोग आहे.

आणि तो बली राजा त्या भूमिकेवरून बोलतोय. मला ही शक्ती आहे मी दान करू शकतो. पण शुक्राचार्यांच म्हणण अस आहे की दान अस हे करता येत नाही. कोणचही दान करतानासुद्धा

***धर्माय यशसेऽर्थायह कामाय भोगाय स्वजनायचा ।***

***पंचधाविभनन वृत्त .................***

इहलोकांमध्येही सुख झालं पाहिजे आणि परलोकामध्ये सुख झालं पाहिजे. धनाचा उपयोग जो करून घ्यायचा, धर्माचरण जे करायच, ते धर्माचरण केवळ परलोकामध्ये सुख मिळण्यासाठी नसून इहलोकामध्येही आपण सुखी झालं पाहिजे. त्या इहलोकामध्येही

सुखी होण्याकरता त्यांच म्हणण असं आहे की सर्वस्व दान करण हे अयोग्य आहे. त्यांची भूमिका आहे ती. जो धीर महात्मा आहे तो सर्वस्व दानही करू शकतो. रामचंद्रांना कैकेयीन सांगितल सोडून जा, निघून गेले ते. राज्य गेल म्हणून त्यांना काही वाटल नाही.

त्याप्रमाणे त्यांनी दुसऱ्याला-सुग्रीवाला-राजा केल, बिभीषणाला राजा केलं. दुसऱ्याला राजा करणाऱ्याला आपल राज्य गेल असे वाटेल कशाला ! हे असे जे देवदत्त महात्मे आहेत, त्यांना काहीच त्याबद्दल वाटत नाही. परंतु इहलोकामध्ये सुख मिळवण्याची शुक्राचार्यांची दृष्टी आहे. एक पंचमांश भरण्याकरता दान कराव म्हणतात. सबंध दान करायच नाही. अर्थशास्त्राच्या दृष्टीने हे किती तरी उपयुक्त आहे. त्याग जो सांगितलेला आहे, वित्त जे मिळालेल आहे, वित्त संग्रह करावा. संग्रहाबद्दल काही म्हणण नाही संग्रह अवश्य करावा.

वैश्याच आणखी लक्षण सांगतात-स्मृतीकारांनी अर्थशास्त्रकारांनी सांगितलय-'अतुष्टिरर्थोपचयै: ।' पहा कितीही पैसा मिळाला तरी त्याच्या मनाचं समाधान कधीही होत नाही, तो उत्तम वैश्य आहे. हे सांगितलेल आहे. म्हणजे अर्थ संग्रह करायला हरकत नाही, असा त्याच्यातला अभिप्राय कोणी काढू नये. वेदशास्त्रकारांना हे मान्य नाही. पण त्याच्याच बरोबर त्यागाचही शिक्षण आहे.

तर हे सगळं जे सांगतात, धर्माकरता फक्त एक पंचमांश खर्च केला म्हणजे बाकीचा सगळा आपला शिल्लक राहिला म्हणजे इहलोकामध्ये आपण सुखी होऊ. म्हणजे धनानी सुखी होऊ. हा

कार्यकारण भाव लावून त्यांनी सांगितल.

त्याच्या नंतर 'यक्षसे.' आपली कीर्ती वाढण्याकरता पंचमांश खर्च करावा म्हणतात, शुक्राचार्य. लोकांसाठी निरनिराळ्या कारणांनी खर्च केला म्हणजे लोक स्तुती करतात - चांगल करतात, काही काटकसर करत नाहीत, इ. स्वत:च्या कीर्तीकरता म्हणून एक पंचमांश सांगितला आहे. त्याच्या नंतर अर्थाय शिल्लक पाहिजे थोडस. पंचमांश शिल्लक ठेवावा म्हणतात. स्वत:करता म्हणून एक पंचमांश ठेवावा. आणि सर्वांच्या करता.

अशा रीतीने वित्ताचे विभाग केल्या नंतर इहलोकातही सुख होत आणि परलोकातही सुख होत. कारण काही का होईना एक पंचमांश त्याने धर्माकरता खर्च केलाय. म्हणून सर्वस्वाचा त्याग करायचा हे बलीराजाच्या दृष्टीन तरी मान्य नाही. आपल्या शिष्याला ऐहिक सुख मिळाव अशी त्यांची इच्छा आहे. सर्वस्वाचा त्याग करायचा त्याचा अधिकार नाहीये म्हणून त्यांनी तशा प्रकारचा उपदेश केला आहे. पण राजाची भूमिका थोडी निराळी होती. प्रत्यक्ष परमेश्वर याचक होऊन येऊन मागतो आहे त्याला सर्वस्व देऊन टाकणे योग्य आहे. अशी संधी परत कधी मिळणार ! म्हणून त्याने दिल. परंतु

***क्रिडार्थमात्मन इदं त्रिजगत्कृतंते***
***स्वाप्यांऽ तत्र कुधियेऽ परईशकर्यु: ।***

असं त्याच्या बायकोने म्हटलं आहे.

''तिसरा पाय कुठ ठेवायचा ''अस वामनांनी विचारल्यानंतर तो म्हणाला, ''माझ शरीर अद्यापि शिल्लक आहे, ते शरीर मी देतो आपल्याला. माझ्या मस्तकावर तिसरा पाय ठेवा.'' हे त्याच्या

पत्नीला पसंत पडल नाही. ती म्हणाली ''अद्यापि त्याची बुद्धी सुधारली नाही. दान केल पुष्कळ. लोक दृष्टीनं हे मोठे ठरले. शुक्राचार्यांना मान्य झाल नाही. त्यांनी शाप दिला ते असू दे आपल्याला जे दान करायचय, आपल्या वर जी ईश्वराची कृपा आहे--'' त्या बलीच्या स्त्रीच्या दृष्टीनं अशी आहे ''संपूर्ण विश्व जे आपण निर्माण केलत त्यावर स्वामित्व आपलं आहे. विश्वामधल हे शरीरही अर्थात आपलच आहे. शरीरावरती स्वामित्व आपलं असल्याने हे आमचे राजेसाहेब 'माझं शरीर शिल्लक राहिलेल आहे ते मी तुम्हाला दान करतो असं म्हणताहेत.' ही बुद्धी चांगली नाही. साहंकार बुद्धी आहे ही. हे दान शुद्ध झालेलं नाही.'' अस त्याच्या स्त्रीन सांगितलेल आहे.

तर सर्वस्व दान करण्याची बुद्धी सुद्धा अशुद्ध राहिलेली आहे. इतक बुद्धीच निर्दोषत्व सिद्ध करण्याकरता किती प्रयत्न केला पाहिजे ! त्याशिवाय खरा ईश्वरस्वरूपाचा साक्षात्कार होऊ शकत नाही. तो पर्यंत संदेहादि दोष बुद्धीमध्ये उत्पन्न होत राहतात. म्हणून

***'भवन्ति भावा भूतानां मन्त एव पृथग्विधा: ।'***

म्हणून भगवान सांगताहेत. यश, अयश सगळं आणखी ईश्वराचं आहे.

***धर्मनिमित्ता लोकश्लाघा यश:***

***अधर्मनिमित्ता लोकनिन्दय अयश: ।***

म्हणून प्रसिद्धच म्हटल आहे मधुसूदन सरस्वतींनी. लोक प्रसिद्धी आणि लोकनिंदार्थक प्रसिद्धी. निंदाही प्रसिद्धीच मानली आहे त्यांनी. लोकांमध्ये कळल की नाही सर्वांना ! हा असा असा आहे म्हणून.

तर ते सगळही धर्माला प्रवृत्त करणं, त्याची प्रसिद्धी करणं हे सगळही ईश्वराच्या अधीन आहे. म्हणजे सकाम जरी भक्त असला

तरी त्या सकाम भक्ताने याच्यापैकी जे जे त्याला पाहिजे-यश पाहिजे आहे, द्रव्य पाहिजे आहे - ते मिळविण्या करता म्हणून ईश्वराची उपासना, ध्यान वगैरे अवश्य केले पाहिजे. आणि त्या ईश्वरस्वरूपाचं ध्यान करण्याकरता म्हणून संपूर्ण विभूती अध्याय त्यांनी सांगितला आहे. आरंभाला त्यानी जी विभूती लक्षण सांगितली -

*'अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थित: ।'*

अंतर्यामी हे स्वरूप माझं आहे म्हणून भगवान सांगताहेत. त्या अंतर्यामी स्वरूपाचं ध्यान करून आणि नंतर विश्वस्वरूपाचं ज्ञान करून घ्यायचं आहे.

तर अशा दृष्टीनं या विभूती अध्यायामध्ये ईश्वराचं लोकमहेश्वरत्व दाखविण्याकरता हे जे पाहिजे असलेले गुण- बुद्धी पाहिजे, ज्ञान पाहिजे, यश पाहिजे, सुख पाहिजे, वित्त पाहिजे - हे सगळेही त्यांनी यशामध्ये दाखिवले आहेत. 'सुखंदु:खंभवोभावा' वगैरे सुद्धा प्रयत्नसाध्य नाही म्हणताहेत ते. ते मीच देऊ शकतो. म्हणून ईश्वराची सिद्धी करण्या करता सद्‌गुरू वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी आपल्या युवाशिक्षा या ग्रंथामध्ये - उपासना योगा करता तो ग्रंथ लिहीला आहे - लोकाकरता कुमारशिक्षा, उपासनायोग दाखवण्याकरता युवाशिक्षा आणि ज्ञानयोगाकरता वृद्धशिक्षा असे ग्रंथ केले आहेत. त्या योगशिक्षेच्या आरंभीच त्यांनी लिहिल आहे-

***दृष्टे स्वस्याप्यनीशत्वे सुखादे: पारतंत्र्यत: ।***
***न सर्वज्ञेश इत्युक्तिर्माता वंध्या मर्मोतवत् ॥४॥***

आपण अनीश आहोत हे प्रत्येकाला माहीत आहे. सगळीकडे, एक व्यष्टी असो किंवा समष्टी असो. लोकशाही असो. सर्वांनी मिळूनही

असमर्थत्व आहे. एका व्यक्तीला तर असमर्थत्व तर आहेत आहे. असं असून सुद्धा कारण का तर 'सुखादे: पारतंत्र्यत:'. अनीशत्व का मानायच? कारण सुखदु:ख आपल्या स्वाधीन नाहीयेत. आपल्या इच्छेप्रमाणे आपण सुख मिळवू शकत नाही. दु:खनिवृत्ती करू शकत नाही.

या वरून ही सुखदु:ख कर्मरूप आहे, यांचा नियामक कोणीतरी आहे, हे समजून आलेल असतानासुद्धा परमेश्वर नाही असं म्हणण म्हणजे 'माता वंध्या ममेतिवत्'. अस म्हणण्यासारखं आहे. काहीतरी बोलायच म्हणाले. हा अनुभव येऊन आपण अनीश असून सुद्धा ईश्वर नाही म्हणण्याप्रमाणे आहे. तर्काने त्यांनी मांडलेल आहे तसं लोकांना ज्याची इच्छा आहे असे पदार्थसुद्धा आपल्या स्वाधीन नाहीयेत. हे आणखी भगवंतांनी मुद्दाम दाखवलेल आहे.

माझ्यापासून हे सर्व प्राप्त होईल म्हणजे मिळणार नाही असं नाही. पण आपल्या स्वाधीन नाहीये हे लोकमहेश्वरत्व ईश्वराचं आपल्या ध्यानामध्ये निरंतर राहाण्याकरता हे सांगितलय. म्हणून अर्जुनाला भगवंतांनी ध्यान करण्याच ईश्वराचं स्वरूप कोणचं आहे हे सांगताना ''स्थावराणां हिमालय:'' सांगताहेत विभूती अध्यायात. म्हणजे हिमालय परमेश्वराच स्वरूप आहे. तो आमचा आहे अशी भावना झाली तर त्याच संरक्षण होऊ शकणार. नुसत सैन्यावर अवलंबून राहून हिमालयाच संरक्षण होणार नाही. हिमालय हा ईश्वराची एक विभूती आहे आणि ती आमची आहे ही भावना जर मनामध्ये असेल तरच त्याच सरंक्षण होणार. तर व्यावहारिक दृष्टीनही याचा उपयोग होतो आहे.

परंतु अशा या अचेतन दिसणाऱ्या पदार्थांच्या ठिकाणीसुद्धा ध्येयबुद्धी उत्पन्न झाली आणि ध्यान घडल तर आणखी ईश्वराचा साक्षात्कार घडू शकतो. हे या विभूती अध्यायामध्ये भगवंतांनी मुद्दाम स्पष्ट केल आहे. ध्यानाकरता आणि ज्ञानाकरता. कोणाच ज्ञान करून घ्यायच ते ज्ञान करून घेण्याकरता ध्यान अगोदर केलं पाहिजे, असं सांगितलय. आता पुढे विश्वरूपाध्याय आहे जो तर मोठाच अध्याय आहे. साक्षात ईश्वराचं स्वरूप कसं आहे ते पहाण्याची, अर्जुनाला पहाण्याची इच्छा झाली, आणि शेवटी काय काय स्वरूप भगवंतांनी त्या ईश्वरभावामध्ये आणलेल आहे त्याचा थोडासा विचार उद्या करता येईल तेवढा करायचा. भागवतामध्ये पुष्कळ अवतारांच वर्णन आहे. व्यष्टीरूप आहे समष्टीरूप आहे. त्याच प्रमाणे निरनिराळ्या कथा वगैरे सांगितल्या आहेत. मोठ मोठ्या विभूतींची चरित्र सांगितली आहेत. प्रल्हादासारखा अल्पवयीन बालकांची सुद्धा चरित्र सांगितली आहेत. त्या विभूतींच स्वरूप भागवतामध्ये सुद्धा पुष्कळ दाखिवलेल आहे. अशा दृष्टीन भगवंतांनी उद्धवजींना जो उपदेश केला त्यातही विभूती अध्याय आलेला आहे. ''त्यावेळी अर्जुनाला पूर्वी सांगितल आता तुला सांगतो'' म्हणाले.

तर अशा दृष्टीनं ईश्वरस्वरूपाचं प्रतिपादन हे भगवद् गीतेमध्ये आणि भागवतामध्ये पुष्कळ ठिकाणी वारंवार आलेल आहे. तेव्हां त्या स्वरूपाचा विचार उद्याच्या एका दिवसामध्ये जेवढा करता येईल तेवढा करु.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरूदेवदत्त ॥**

बडोदा.

